(सभापतीस्थानी माननीय सभापती)

अधिवेशनाचा शुभारंभ " वंदे मातरम् " या गीताच्या समूह गायनाने झाला.

<u>सदस्यांचा परिचय व शपथविधी</u>

श्री.हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्य मंत्री) : सभापती महोदय, महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित सदस्य श्री.रामराजे प्रतापसिंह नाईक - निंबाळकर यांचा आपणास व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देतांना मला अतिशय आनंद होत आहे.

श्री.रामराजे प्रतापसिंह नाईक - निंबाळकर यांनी शपथ घेतली.

--

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित सदस्या श्रीमती शोभाताई माधवराव फडणवीस यांचा आपणास व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देतांना मला अतिशय आनंद होत आहे.

श्रीमती शोभाताई माधवराव फडणवीस यांनी शपथ घेतली.

--

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय ,विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित सदस्य श्री.दिवाकर नारायण रावते यांचा आपणास व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देतांना मला अतिशय आनंद होत आहे.

श्री.दिवाकर नारायण रावते यांनी शपथ घेतली

--

यानंतर श्री सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित सदस्य श्री. हुसेन उमर दलवाई यांचा आपणांस व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देताना मला अतिशय आनंद होत आहे.

श्री. हुसेन उमर दलवाई यांनी शपथ घेतली.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित सदस्या श्रीमती दिप्ती चवधरी यांचा आपणांस व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देताना मला अतिशय आनंद होत आहे.

श्रीमती दिप्ती चवधरी यांनी शपथ घेतली.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित सदस्य श्री. संजय सतीशचंद्र दत्त यांचा आपणांस व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देताना मला अतिशय आनंद होत आहे.

श्री. संजय सतीशचंद्र दत्त यांनी शपथ घेतली.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील :सभापती महोदय, महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित सदस्य श्री. विजय कृष्णाजी सावंत यांचा आपणांस व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देताना मला अतिशय आनंद होत आहे.

श्री. विजय कृष्णाजी सावंत यांनी शपथ घेतली.

श्री.हर्षवर्धन पाटील :सभापती महोदय, महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित सदस्य श्री.विनायक तुकाराम मेटे यांचा आपणांस व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देताना मला अतिशय आनंद होत आहे.

श्री. विनायक तुकाराम मेटे यांनी शपथ घेतली

श्री. हर्षवर्धन पाटील :महोदय, महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित सदस्य श्री. प्रकाश शंकर बिनसाळे यांचा आपणांस व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देताना मला अतिशय आनंद होत आहे.

श्री. प्रकाश शंकर बिनसाळे यांनी शपथ घेतली.

श्री. हर्षवर्धन पाटील :सभापती महोदय, महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित सदस्य श्री. धनंजय पंडितराव मुंडे यांचा आपणांस व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देताना मला अतिशय आनंद होत आहे.

श्री. धनंजय पंडितराव मुंडे यांनी शपथ घेतली.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2..

माननीय मंत्र्यांचा परिचय व माननीय सदस्यांच्या शपथविधीबाबत

सभापती : माननीय मुख्यमंत्री विधानसभेच्या कामकाजामध्ये व्यस्त आहेत. तसेच माननीय उप मुख्यमंत्रीही उपस्थित नाहीत. त्यामुळे माननीय मुख्यमंत्री विधानपरिषदेत उपस्थित होईपर्यंत मी माननीय मंत्र्यांच्या परिचयाचा विषय पुढे ढकलत आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, विधानपरिषदेचे 11 सदस्य नव्याने निवडून आले आहेत. त्यांचा शपथविधी होत असताना प्रथा व परंपरानुसार विधिमंडळाच्या प्रधान सचिवांनी विधानपरिषदेमध्ये उपस्थित रहावयास पाहिजे. पण ते या ठिकाणी उपस्थित दिसत नाहीत याची आपण गंभीरपणाने दखल घ्यावी.

सभापती : सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांचे म्हणणे बरोबर आहे. पण प्रधान सचिव देखील विधानसभेच्या कामकाजामध्ये व्यस्त आहेत. खालच्या सभागृहाचे कामकाज एक तास अगोदर सुरु होत असल्यामुळे ही अपवादात्मक परिस्थिती निर्माण झालेली आहे.

नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावा बाबत

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते व श्री. कपिल पाटील यांनी "बेस्ट ऑफ फाईव्ह" या विषयाच्या अनुषंगाने नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावा बाबतची सूचना दिलेली आहे.

आजच्या कामकाज पत्रिकेवर या विषयाच्या अनुषंगाने नियम 97 अन्वयेची अल्पकालीन चर्चा मान्य करण्यात आलेली आहे. या अल्पकालीन चर्चेच्या वेळी सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते आणि श्री. कपिल पाटील यांना बोलण्याची संधी देण्यात येईल.

यानंतर श्री. बरवड...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती .....

नियम 289 अन्वये दुसरा प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नाच्या अनुषंगाने दिलेला आहे. मी त्यांना यासंदर्भात थोडक्यात आपले म्हणणे मांडण्यास परवानगी देत आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, या सभागृहामध्ये गेल्या वेळेला सुध्दा सीमा प्रश्नाबाबत आणि तेथील मराठी जनतेच्या होणाऱ्या गळचेपीबाबत मी या सभागृहामध्ये चर्चा उपस्थित केली होती. केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयामध्ये जे ॲडिफेव्हिट सादर करावयाचे होते ते ॲफिडेव्हिट केंद्र सरकारने मराठी जनतेच्या विरोधात दिलेले आहे. म्हणून आज या ठिकाणी राज्य शासनाने केंद्र सरकारवर दबाव आणून कोणत्याही परिस्थितीमध्ये महाराष्ट्राची बाजू योग्य ठिकाणी योग्य प्रकारे सर्वोच्च न्यायालयात मांडली गेली पाहिजे यासाठी कठोर अशी भूमिका घेतली पाहिजे.

सभापती महोदय, काँग्रेसच्या सरकारने वेळोवेळी सीमा भागातील जनतेवर अन्याय केलेला आहे, सीमा भागातील जनतेच्या विरोधात भूमिका घेतलेली आहे. म्हणून या ठिकाणी मला संशय येतो की, जाणूनबुजून केंद्र सरकाने त्या ठिकाणी मराठी माणसाची, महाराष्ट्राची बाजू मांडण्यामध्ये मुद्दाम वेगळी भूमिका घेतलेली आहे. आज बेळगावमध्ये सर्व मराठी लोक एकत्र येऊन त्या ठिकाणी केंद्र सरकारचा धिक्कार करीत आहेत. महाराष्ट्रातील जनता त्यांच्या बाजूने आहे हे दाखविण्याची भूमिका आपण या ठिकाणी घेतली पाहिजे. म्हणून आजचे सभागृहाचे सर्व कामकाज बाजूला सारुन या प्रस्तावावर चर्चा करुन राज्य शासन या संदर्भात कोणती भूमिका घेणार आहे तसेच केंद्र सरकारने त्या ठिकाणी जी बाजू मांडली त्याबाबतीत राज्य शासनाच्या अधिकाऱ्यांनी कोणती भूमिका बजावली हे महाराष्ट्रातील 10 कोटी जनतेला समजले पाहिजे. म्हणून मी या ठिकाणी पुन्हा सांगू इच्छितो की, सीमा भागातील मराठी माणसांच्या बाजूने, बेळगाव-कारवारच्या जनतेच्या बाजूने महाराष्ट्र शासन आहे हे दाखविण्यासाठी सभागृहाचे आजचे सर्व कामकाज स्थगित करुन या विषयावर चर्चा करावी अशी मी मागणी करीत आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी नियम 289 अन्वये जो प्रस्ताव दिलेला आहे त्याचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे. बेळगाव-कारवारचा जो प्रश्न आहे त्यासंदर्भात तेथील मराठी जनता गेली 50 वर्षे झगडत आहे. या

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

विधिमंडळामध्ये अनेक वेळा ठराव झाले, एकमताने ठराव झाले आणि ते केंद्र सरकारकडे पाठविण्यात आले. यासंदर्भात अनेक वेळा आंदोलने झाली. लाठीमार झाले. त्या आंदोलनामध्ये अनेक लोक होरपळले गेले. केंद्र सरकारने आता नुकतेच सर्वोच्च न्यायालयामध्ये जे ॲफिडेव्हिट सादर केलेले आहे ते महाराष्ट्राच्या विरोधात, मराठी जनतेच्या विरोधात सादर केलेले आहे. केंद्र सरकार या राज्याच्या विरोधात आहे काय हे या ठिकाणी स्पष्ट झाले पाहिजे. या ठिकाणी राज्य सरकार ठराव करते, विधिमंडळ ठराव करते आणि एकमताने ठराव करुन ते केंद्राकडे पाठविले जातात. 800 ते 825 गावांचा प्रश्न आहे. तेथील मराठी माणसांच्या जीविताशी खेळण्याचा प्रकार चालू आहे. यासंदर्भात राज्य सरकार किती गंभीर आहे ? चार महिन्यापूर्वी मागच्या अधिवेशनामध्ये यासंदर्भात चर्चा उपस्थित झाली होती. आपणासह सत्ताधारी पक्ष तसेच विरोधी पक्षाच्या सदस्यांनी आझाद मैदानामध्ये बेळगाव मधील मराठी लोकांना भेटून त्यांना हिंमत दिली होती. त्यांचे सांत्वन करुन त्यांना सांगितले की, संपूर्ण महाराष्ट्र तुमच्या पाठीशी आहे. महाराष्ट्रात काँग्रेसचे राज्य आहे आणि दिल्लीमध्ये सुध्दा काँग्रेसचे राज्य आहे. असे असताना एका राज्याने एक भूमिका घ्यावयाची आणि केंद्र सरकारने वेगळी भूमिका घ्यावयाची ही न समजण्यासारखी बाब आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

म्हणून महाराष्ट्रातील जनतेला स्पष्टपणे समजले पाहिजे की, खऱ्या अर्थाने हे राज्य सरकार कोणाच्या बाजूने आहे, केंद्र सरकार कोणाच्या बाजूला आहे, काँग्रेस पक्ष कोणाच्या बाजूला आहे ? ही भूमिका स्पष्ट होण्यासाठी या विषयावर चर्चा होणे गरजेचे आहे. सभापती महोदय, पुन्हा एकदा सुप्रीम कोर्टाला विनंती करुन पुन्हा रिव्हिजन करुन पुन्हा एकदा सुप्रीम कोर्टामध्ये सिरियसली पोहोचविण्याची जरुरी आहे. म्हणून सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी अत्यंत ज्वलंत विषय मांडला आहे. या विषयावर पुन्हा एकदा चर्चा करुन दूध का दूध, पानी का पानी हे दाखवून दिले पाहिजे. महाराष्ट्रातील हे सरकार जर मराठी भाषिकांच्या पाठीमागे उभे असेल तर ते कोणत्या प्रकारे केंद्र सरकारवर दबाव आणणार आहे हे येथे स्पष्ट झाले पाहिजे. माननीय मुख्यमंत्र्यांची कोठपर्यंत जाण्याची तयारी आहे हेही आम्हाला समजले पाहिजे. म्हणून या सभागृहात या विषयावर चर्चा होणे गरजेचे आहे, त्याला आपण अनुमती द्यावी अशी मी विनंती करतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी सीमा प्रश्नासंबंधी नियम 289 प्रस्तावाची अन्वये सूचना देऊन सभागृहासमोरील आजचे कामकाज तहकूब करावे अशी विनंती केली आहे. या प्रश्नाला गांभीर्य आहे आणि तातडीही आहे. जेम्स लेन यांनी लिहिलेल्या पुस्तकामुळे छत्रपती शिवरायांचा अवमान झालेला आहेच. तो विषय नंतर येणार आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर हे बोलत असताना असे म्हणाले की, सीमा प्रश्नासंबंधी मुख्यमंत्र्यांची कोठपर्यंत जाण्याची तयारी आहे. मुळात माननीय मुख्यमंत्री आणि या सरकारला या प्रश्नासंबंधी गांभीर्य वाटते का हा प्रश्न या परिस्थितीतून निर्माण झालेला आहे. याच सभागृहात केंद्र सरकारला विनंती करणारा एकमताने ठराव मंजूर करुन पाठविला होता. गेल्या वेळी सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी असा ठराव मांडला होता की, सीमा प्रश्नाचा निर्णय लागेपर्यंत हा प्रदेश केंद्र शासित करावा. अशाप्रकारची भावना त्यांनी व्यक्त केली होती. त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी आम्हाला शब्द दिला की, या प्रश्नासंबंधी दोन्ही सदनाच्या भावना माननीय पंतप्रधानांच्या कानावर घालू आणि हा प्रदेश केंद्र शासित करण्याबद्दल आग्रह मांडू. हा

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

प्रश्न न्यायायालयामध्ये आहे. मागील अधिवेशन संपले. आजपासून हे अधिवेशन सुरु होत आहे. या अधिवेशनाच्या पहिल्या दिवशीच दुर्दैवाने आम्हाला याच विषयावर पुन्हा बोलण्याची पाळी येते. आमच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी कोठपर्यंत गेले पाहिजे हे त्यातून दिसून येते. मला राज्य मंत्रिमंडळाबद्दल प्रश्न पडलेला आहे. अनेक प्रश्नाबाबत हमरीतुमरीवर येणारे मंत्रिमंडळ आहे. प्रत्येक वेळी मंत्रिमंडळाच्या बैठकीत राज्यातील विविध मंत्र्यांच्या उखाळया पाखाळया काढल्या जातात. अशाप्रकारे हे मंत्रिमंडळ असताना मात्र माननीय मुख्यमंत्र्यांना कोणत्याही मंत्र्यांनी एकाही मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये या विषयासंबंधी जाब का विचारला नाही असाही प्रश्न आमच्यासमोर निर्माण होतो.

केंद्र सरकारने गेल्या वेळी चुकीचे ॲफिडेव्हिट दाखल केले होते. त्यावेळी ते परत घेण्यासाठी आपण सर्वांनी दबाव आणला होता. त्यावेळी श्री.शिवराज पाटील-चाकुरकर हे गृहमंत्री होते. त्यांनी ते परत घेतले होते. महाराष्ट्रातील केंद्रीय गृहमंत्री राज्याच्या विरोधातील ॲफिडेव्हिट सुप्रीम कोर्टात दाखल करतात. हे सुध्दा आपण पाहिलेले आहे. या सगळया प्रश्नामध्ये असे चित्र निर्माण झालेले आहे की, फक्त विरोधी पक्षाने रस्त्यावर उतरायचे, बोंबाबोंब करावयाची, आंदोलने करावयाची, आराडाओरड करावयाची. मग सरकारने या विधिमंडळामार्फत लोकांना असा संदेश द्यावयाचा की, वयं पंचाधिकमं, शतम्. परंतु एकदा का अधिवेशनाचे सूप वाजले, घंटा वाजली, शाळा सुटली तसे तुम्ही तुमच्या घरी, आम्ही आमच्या घरी. कोणाला या महाराष्ट्राच्या महत्वाच्या प्रश्नाचे गांभीर्य आहे की नाही असा प्रश्न कालच्या घटनेमुळे निर्माण झाला आहे. महाराष्ट्राच्या पाठीत केंद्र सरकारने 100 टक्के खंजीर खुपसला आहे. आम्ही माननीय पंतप्रधान यांना भेटण्यासाठी 14 तारखेला जाणार आहोत हे जाहीर केलेले आहे. पण गेल्या अधिवेशनानंतर यासंबंधी पावले का उचलली गेली नाहीत याचे उत्तर मिळाले पाहिजे. महाराष्ट्रावर आघात करणारे केंद्र सरकारचे भाष्य आहे. महाराष्ट्र सरकारच्या विरोधात व कर्नाटक राज्याच्या बाजूने निखालस असे ॲफिडेव्हिट सुप्रीम कोर्टात दाखल झाले त्यावेळी केंद्रात असलेले आमचे मराठी मंत्री काय करीत आहेत असे वाटले होते. माननीय पंतप्रधान यांना ते किमान तातडीने भेटतील आणि महाराष्ट्राचा तुम्ही घात करीत आहात याची जाणीव करुन देतील अशी अपेक्षा होती. तेही झालेले नाही. उलट इळी मिळी गुप चिळी याप्रमाणे मूग गिळून सर्वजण गप्प बसले आहेत.

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

आमच्यासाठी सत्ता हीच महत्वाची आहे. कर्नाटक सीमा प्रश्न आम्हाला महत्वाचा वाटत नाही. हे दाखवून दिल्याचे आम्हाला संकेत मिळत आहेत. मी आरोप करु शकत नाही. या प्रश्नासंबंधी आम्ही माननीय पंतप्रधान यांना भेटणार आहोत. पण गेल्या चार दिवसापासून संपूर्ण महाराष्ट्र ढवळून निघाला असताना केंद्रातील एकही मगरगट्ठा मराठी मंत्री आतापर्यंत केंद्र सरकारला वा माननीय पंतप्रधानांना जाऊन सांगू शकला नाही. हे या महाराष्ट्राचे दुर्दैव आहे.

यानंतर श्री.शिगम.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते....

त्याचप्रमाणे जेम्स लेन यांनी महाराष्ट्राचे दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा केलेला अवमान हा विषय देखील अत्यंत गंभीर असून हे दोन्ही विषय महाराष्ट्राच्या जीवाभावाशी, स्वाभिमानाशी आणि अस्मितेशी जोडलेले आहेत. म्हणून या दोन्ही विषयाची आपण दखल घ्यावी आणि आजचे कामकाज बाजूला ठेवून चर्चा घ्यावी अशी मी आपणास विनंती करतो.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी दुस-यांदा हा प्रश्न या सभागृहामध्ये उपस्थित केलेला आहे. मागच्या वेळी या प्रश्नासंबंधी सभागृहाने एकमताने ठराव पास केलेला आहे. या प्रश्नाबाबत आपले गांभीर्य कुठे तरी कमी पडतेय, आपला प्रभाव कमी पडतोय याची टोचणी मराठी जनतेला आणि महाराष्ट्रातील जनतेला आणि विशेष करुन सीमाभागातील जनतेला लागली आहे. खरे तर या प्रश्नावर सभागृहाच्या नेत्यांनी किंवा माननीय मुख्यमंत्र्यांनी सत्ताधारी पक्षाच्या वतीने भूमिका घेऊन, प्रस्ताव घेऊन चर्चा करायला हवी होती. आजचे कामकाज थांबविण्याची गरज यासाठी आहे की, या प्रश्नाशी राज्याच्या 10 कोटी जनतेच्या भावना निगडित आहेतच. परंतु केन्द्राकडून वारंवार जी फसवणूक होत आहे ती फसवणूक 60 वर्षे सहन करीत आलो असून आणखी पुढची किती वर्षे ती फसवणूक आपण सहन करायची हा प्रश्न आहे. सभापती महोदय, राज्याच्या प्रमुख नेत्यांचे शिष्टमंडळ घेऊन माननीय पंतप्रधानांना भेटण्याची घोषणा माननीय मुख्यमंत्र्यांनी केलेली आहे. त्या घोषणेचे मी स्वागत करतो. अशा प्रकारची शिष्टमंडळे आपण अनेक वेळा नेलेली आहेत. माझी आपणास विनंती आहे की, दोन्ही सभगृहाच्या सर्व सदस्यांना घेऊन आपण दिल्लीत जाऊन पोहोचलो तरच प्रभाव निर्माण होईल. अन्यथा सभागृहामध्ये ठराव पास होतात, काही लोक दिल्लीला जातात. त्यापलीकडे ही मंडळी काही करीत नाही अशी जी भावना जनतेमध्ये बळावते आहे तिला वावा द्यायचा नसेल आणि त्यांच्यामध्ये विश्वास निर्माण करायचा असेल तर दोन्ही सभागृहाचे कामकाज 14 जुलै रोजी बंद ठेवून दोन्ही सभागृहाच्या सन्माननीय सदस्यांना घेऊन दिल्लीला जावे अशी सूचना मी या निमित्ताने करतो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी महाराष्ट्र विधानपरिषद नियम 289 अन्वये आजचे सभागृहाचे कामकाज स्थगित करुन सध्या महाराष्ट्रामध्ये निर्माण झालेल्या प्रमुख अशा सीमाप्रश्नावर चर्चा सुरु करावी अशी मागणी केलेली आहे. सभापती महोदय, हा सीमाप्रश्न कोण्या एका व्यक्तीचा, जातीचा किंवा पक्षाचा नाही. हा संपूर्ण महाराष्ट्राचा आणि महाराष्ट्राच्या अस्मितेचा प्रश्न आहे. या प्रश्नाला अन्य पक्ष, अन्य नेते आणि व्यक्ती जेवढे महत्व देतात तेवढेच महत्व आणि गांभीर्य सत्ताधारी पक्षाच्या माननीय मुख्यमंत्र्यांपासून सर्वजणांना आहे. आपण सर्वच जण या प्रश्नाकडे गांभीर्याने पहात आहोत. सभापती महोदय, अशा प्रश्नाचे राजकारण करु नये अशा मताचा मी आहे. या महाराष्ट्राच्या विधानसभा आणि विधानपरिषदेमध्ये या प्रश्नाबाबत जेव्हा जेव्हा चर्चा झाली, ठराव झाले ते सर्व ठराव एकमताने पास झालेले आहेत. बेळगाव-कारवारसह सीमाभागातील 865 गावे महाराष्ट्रात विलीन व्हावीत अशी राज्याची भूमिका आहे. या गावांवर कर्नाटक सरकारकडून होणारा अन्याय ताबडतोबीने थांबवावा आणि 865 गावे महाराष्ट्रात विलीन व्हावीत अशा प्रकारची मागणी सातत्याने संयुक्त महाराष्ट्र झाल्यानंतर अजूनही होत आहे. या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी तेव्हा तेव्हाच्या मुख्यमंत्र्यांनी आणि त्या त्या वेळच्या विरोधी पक्षाच्या सर्व मंडळींनी आपापल्या परीने प्रयत्न केलेले आहेत. सुप्रीम कोर्टात दाखल केलेले पिटीशन केवळ महाराष्ट्र सरकारने दाखल केलेले नसून ते उच्चाधिकार समितीने दाखल केलेले आहे. या उच्चाधिकार समितीमध्ये सर्व पक्षाचे नेते आहेत. आपण वेगवेगळे मार्ग अवलंबून देखील आपणाला न्याय मिळत नाही म्हणून शेवटचा मार्ग म्हणून सुप्रीम कोर्टात जाण्याचे उच्चाधिकार समितीने ठरविले आणि त्याप्रमाणे सुप्रीम कोर्टात पिटीशन दाखल झाले.

...नंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / शीर्षकासाठी नाही

श्री.नारायण राणे.....

सभापती महोदय, तेथे कोणते वकील नेमावेत याबाबत वारंवार चर्चा होते. उच्चाधिकार समितीमध्ये सर्वपक्षीय नेतेमंडळी आहेत. त्यांच्याकडून ज्याप्रमाणे मार्गदर्शन केले जाते त्याप्रमाणे वकील नेमण्याचा निर्णय होतो, कामकाज केले जाते. हे काम सातत्याने सुरु आहे. केंद्र सरकारने सुप्रीम कोर्टामध्ये या केससंबंधी आता नव्याने प्रतिज्ञापत्र दाखल केले. यापूर्वीही प्रतिज्ञापत्र दाखल केले होते त्यासंबंधी काय झाले याबाबत सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी याठिकाणी उल्लेख केला. सन्माननीय श्री.शिवराज पाटील हे केंद्रीय गृहमंत्री असताना केंद्र सरकारने जे प्रतिज्ञापत्र सुप्रीम कोर्टात दाखल करण्यासाठी तयार केले होते तेव्हा लक्षात आले की, हे प्रतिज्ञापत्र महाराष्ट्राच्या विरोधातील आहे. त्यात बदल करणे आवश्यक आहे. त्यानुसार केंद्र सरकारला विनंती करण्यात आली होती. आताही मी सदनाला सांगू इच्छितो की, केंद्र सरकारने प्रतिज्ञापत्र तयार केल्यानंतर जी परिस्थिती महाराष्ट्रात आणि देशात निर्माण झाली, महाराष्ट्रातील सर्व राजकीय पक्ष, जनता यांनी ज्याप्रमाणे तीव्र भावना व्यक्त केल्या त्याचे गांभीर्य लक्षात घेऊन महाराष्ट्र सरकारने सुप्रीम कोर्टातील पिटिशनमध्ये दुरुस्ती करण्यासंबंधी जे प्रतिज्ञापत्र फाईल केले ते आज सकाळी सुप्रीम कोर्टाने स्वीकारलेले आहे. दुरुस्तीसाठी दाखल केलेले प्रतिज्ञापत्र सुप्रीम कोर्टाने स्वीकारले आहे. त्यामुळे राज्य सरकार काहीच करीत नाही असे म्हणणे योग्य नाही. सीमा प्रश्न असो, छत्रपती शिवाजी महाराजांविषयी जेम्स लेन यांनी केलेले लिखाण असो ही सगळी आपलीच प्रॉपर्टी आहे, आपलेच भांडवल आहे असे कोणी समजू नये. ही राज्याची प्रॉपर्टी आहे. हे प्रश्न राज्याचे आहेत. 11 कोटी जनतेचे प्रश्न आहेत. ही तीव्र भावना महाराष्ट्राची आहे. महाराष्ट्रातील सर्वांची ही भावना आहे. आम्ही सत्तेत आहोत. जेवढी तीव्र भावना विरोधी पक्षाची आहे तेवढीच राज्य सरकारची सुध्दा आहे. कदाचित एक टक्का आम्ही पुढे आहोत असे दाखविणारे लोक आहेत. त्यात त्यांचा काही त्यात हेतू असतो. राज्य सरकारला तसे दाखवायचे नाही. छत्रपती शिवाजी महाराजांचा प्रश्न असो, सीमा प्रश्न असो, सीमा भागातील 865 गावे महाराष्ट्रात विलीन होईपर्यंत आम्ही लढा देणार आहोत. सुप्रीम कोर्टातील खटला चालविण्यासाठी उत्तम वकील नेमणार आहोत. ज्याप्रमाणे मागणी केली जाते त्याप्रमाणे राज्य सरकार प्रयत्न करीत आहे. कोण कुठे कमी पडले, कोणी कशी बाजू मांडली, गांभीर्य लक्षात घेतले की नाही याचा विचार जरुर केला जाईल. परंतु प्रथम या खटल्यासंबंधी चांगले वकील

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे.....

नेमून हा खटला जिंकण्याचा प्रयत्न करु. हे केवळ सरकारचे नव्हे तर आपल्या सर्वांचे काम आहे. तेच आम्ही करीत आहोत. 14 जुलै, 2010 रोजी माननीय मुख्यमंत्री महोदयांनी माननीय पंतप्रधानांच्या भेटीची वेळ निश्चित केलेली आहे. या भेटीच्या वेळी सत्ताधारी पक्षाबरोबर विरोधी पक्षातील काही मंडळी असणार आहेत. त्या भेटीच्या वेळी राज्य सरकार ही मागणी करणार आहे की, केंद्र सरकारने जे प्रतिज्ञापत्र तयार केले त्यामध्ये कोणाची चूक झाली त्याबद्दल काय दुरुस्ती करणे आवश्यक आहे याची मागणी करणार आहोत. राज्य सरकार काही करीत नाही, फक्त विरोधी पक्षच जागरुक आहे असे दाखविण्याचा प्रयत्न होत आहे. या प्रयत्नामध्ये महाराष्ट्राचा स्वाभिमान आणि अस्मिता याऐवजी स्वार्थ दडलेला आहे, हे विरोधी पक्षाला लपविता आलेले नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आम्ही कोणतेही राजकारण आणलेले नाही.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, विरोधी पक्षाचे नेते भाषण करीत असताना आरोप करीत होते तेव्हा आम्ही गप्प बसलो होतो. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते भाषण करीत असताना प्रस्तावावर बोलले नाहीत. त्यांनी टीका केलेली आहे. मी कोणताही हेत्वारोप केलेला नाही. आमच्यावर टीका करण्यात आली. चर्चेची मागणी केली नाही. चर्चा करण्यास राज्य सरकार केव्हाही तयार आहे....(अडथळा).... राज्य सरकारची चर्चेला उत्तर द्यायची तयारी आहे. आम्ही कोणत्याही राष्ट्रपुरुषाच्या नावाने धंदा केलेला नाही. मार्केटिंग केलेले नाही. राष्ट्रपुरुषांचा आम्हाला अभिमान आहे. फक्त पेपर फाडून आणि जाळून अभिमान दाखविता येत नाही. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी भाषण करताना उल्लेख केला की, मंत्रिमंडळामध्ये वेगवेगळ्या विषयावर वाद निर्माण झाले. तो राज्य सरकारचा अंतर्गत प्रश्न आहे.....

(नंतर श्री.खर्चे....

अशुद्धित प्रत / परिपृच्छासाठी नाही

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य उभे असतात)

श्री. नारायण राणे .....

या महाराष्ट्राच्या अस्मितेच्या प्रश्नाबद्दल, सीमा प्रश्नाबद्दल सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी नियम 289 अन्वये जी चर्चा मागितलेली आहे ती घेण्यास आमची काहीच हरकत नाही. यापूर्वी देखील अशा चर्चा सभागृहात झालेल्या आहेत आणि आताही आम्ही ती चर्चा करण्यास तयार आहोत. कारण महाराष्ट्राच्या अस्मितेच्या प्रश्नाबद्दल नक्कीच विरोधी पक्षापेक्षा एका इंचाने आम्ही पुढे आहोत हे मी सांगतो. म्हणून अशा प्रकारे राज्याच्या प्रश्नावर हेत्वारोप करु नये आणि तसे केल्यास आम्ही सहन करणार नाही हे सांगून ठेवतो.

श्री. पांडुरंग फुंडकर : सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी सभागृहात प्रस्ताव मांडल्यानंतर त्यावर अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले. असे विचार व्यक्त करीत असताना कोणत्याही सन्माननीय सदस्यांनी त्यात राजकारण आणले नाही.

श्री. नारायण राणे : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते बोलले.....

श्री. दिवाकर रावते : महोदय, माझ्या भाषणात मी जे बोललो ते कृपया पहावे. मी फक्त "वयं पंचादिकंम् शतम्" असेच म्हणालो परंतु माननीय मंत्री महोदय उगाचच स्वत:चा ढोल वाजवित आहेत की हा विरोधी पक्षाचा धंदा आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, माननीय मंत्री महोदय श्री. नारायणराव राणे साहेबांबद्दल मी व्यक्तिगत बोलत नाही परंतु आपले सरकार जर नीट वागले असते, कोर्टात चांगल्या प्रकारे बाजू मांडली असती तर आज हे प्रश्न निर्माण झाले नसते. कोर्टात ॲफिडेव्हीट दाखल करताना डोळे उघडे ठेवून दाखल केले असते तर आज जेम्स लेनच्या प्रश्नाबाबत कोर्टाची चपराक राज्य शासनाला खावी लागली नसती. महाराष्ट्राचे आद्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांविषयी जेम्स लेनने जे छापले ते प्रकरण सुप्रीम कोर्टात गेले आणि आपल्या विरोधात निकाल लागला तो देखील लागला नसता. त्यानंतर "बेस्ट ऑफ फाईव्ह" बाबत देखील उच्च न्यायालयाचे ताशेरे आले नसते. अशा ज्या चुका शासनाकडून झालेल्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

आहेत त्या शासनाने मान्य कराव्यात. तसेच माननीय मंत्री महोदय म्हणाल्याप्रमाणे शासन जर विरोधी पक्षापेक्षा एक इंच जास्त पुढे असेल, या प्रश्नांबाबत शासनाच्या भावना अधिक तीव्र असत्या तर मुळात हे प्रकरणच घडले नसते. म्हणून शासन बेळगांव-कारवार सीमा प्रश्नाच्या बाबतीत सिरियस नाही, बेस्ट ऑफ फाईव्हच्या संदर्भात सिरियस नाही तसेच जेम्स लेन प्रकरणी देखील सिरियस नाही असेच मी म्हणणार आहे. कारण शासन जर अशा ज्वलंत प्रश्नांच्या बाबतीत सिरियस असते तर हे निकाल आपल्या विरोधात गेलेच नसते. बेळगांव-कारवार सीमा प्रश्नाच्या संदर्भात माझी विनंती आहे की, या प्रश्नाच्या माध्यमातून सभागृहात कोणीही राजकारण न आणता मराठी माणसाच्या भावनांचा आदर करुन सभागृहात या प्रश्नाच्या बाबतीत चर्चा झालीच पाहिजे.

श्री. नारायण राणे : महोदय, या भावनेचा आदर करुन चर्चा करण्याची शासनाची देखील तयारी आहे. माझी माननीय विरोधी पक्षनेत्यांना विनंती आहे की, ज्या सीमा प्रश्नाच्या संदर्भात आपण चर्चा करण्याचा आग्रह धरीत आहात तो सीमा प्रश्न हा कर्नाटकशी संबंधित आहे व कर्नाटक राज्यात भारतीय जनता पक्षाचेच सरकार आहे. या ठिकाणी आपण ज्याप्रमाणे तीव्र भावना व्यक्त करीत आहात तशाच भावनेने तेथे जाऊन सांगावे की, आमच्या मराठी लोकांना आपल्या सरकारकडून त्रास होत आहे.....

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

सभापती : नियम 289 अन्वये सभागृहासमोर आज दोन प्रस्ताव आलेले आहेत. ते दोन्ही प्रस्ताव महत्वाचे आहेत, तसेच त्या अनुषंगाने सभागृहात सदस्यांनी आपले विचारही मांडले आहेत. माझी सभागृहाला अशी विनंती आहे की, या दोन्ही प्रस्तावांबाबतच्या चर्चेला किती वेळ देता येईल यासाठी दोन्ही बाजूच्या नेत्यांसोबत माझ्या दालनात येऊन चर्चा करावी लागेल म्हणून मी सभागृहाचे कामकाज 15 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

(सभा□ृहाची बैठ□ दुपारी 1.39 ते 1.54 वाजेपर्यंत स्थ□□ित झाली)

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

सभापती : मी पुन्हा सभागृहाची बैठक 15 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 1.56 ते 2.10 वाजेपर्यंत स्थगित)

यानंतर श्री.भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगिती नंतर)

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

पृ.शी./मु.शी. : सभापती तालिका नामनिर्देशित करणे.

सभापती : मी महाराष्ट्र विधान परिषद नियमातील नियम 8 (1) अन्वये खालील सभासदांना सभापती तालिकेवर नामनिर्देशित करतो :-

श्री.मोहन जोशी

श्री.राम पंडागळे

श्री.परशुराम उपरकर

श्री.चंद्रकांत पाटील.

.....

पृ.शी./मु.शी. : उप-सभापतींच्या निवडणुकीच्या कार्यक्रमाची घोषणा.

सभापती : मंगळवार, दिनांक 13 जुलै 2010 हा दिवस उप-सभापतींच्या निवडणुकीसाठी निश्चित केला आहे. या निवडणूकीसाठी नामनिर्देशन पत्रे, प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई यांना सोमवार, दिनांक 12 जुलै 2010 रोजी, सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत पोहोचतील अशारितीने पाठविली पाहिजे.

.....

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी : म.वि.प.नियम 289 च्या प्रस्तावाबाबत.

सभापती : सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, सय्यद पाशा पटेल, यांनी जेम्स लेन यांच्या वादग्रस्त पुस्तकाबाबत सर्वाच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयासंबंधी म.वि.स.नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिली आहे. तो त्यांनी मांडावा. तो मांडून झाल्यानंतर कागदपत्रे सभागृहासमोर ठेवण्यात येतील.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, खरे म्हणजे हा प्रस्ताव सुरूवातीला यायला पाहिजे होता. सर्वात आधी सकाळी 9 वाजून 15 मिनिटांनी आम्ही प्रस्ताव दिला होता. आता बेळगाव सीमा प्रश्नासंबंधी चर्चा झाली आहे. बेळगाव सीमा प्रश्न महत्त्वाचा आहे. त्याही पेक्षा जेम्स लेन यांनी "शिवाजी, हिंदू किंग इन इस्लामिक इंडिया" नावाचे वादग्रस्त पुस्तक लिहिले आहे. या पुस्तकावर शासनाने बंदी घातली होती. मात्र, या पुस्तकावरची बंदी सर्वाच्च न्यायालयाने दिनांक 9 जुलै 2010 रोजी उठविली आहे. मानवी हक्काचा उदोउदो करणारे काही जण कोर्टात गेले. हायकोर्टात त्यांच्या बाजूने निर्णय लागला. त्यामुळे महाराष्ट्रामध्ये गदारोळ झाला. त्यामुळे शासनाला सुप्रीम कोर्टात जाणे भाग पडले. सरकार सुप्रीम कोर्टात गेले. श्री.राणे साहेब, मघा सांगितल्याप्रमाणे या गंभीर विषयासंबंधी लढायला पाहिजे होते, त्या पद्धतीने लढले गेले नाही. चांगल्या पद्धतीने बाब मांडली गेली असती तर या पुस्तकावरची बंदी उठविली गेली नसती. वकिलाने चांगल्या पद्धतीने बाजू मांडायला पाहिजे होती. या पुस्तकातील पान क्रमांक 93 वरील मजकूर छत्रपती शिवाजी महाराज, राष्ट्रमाता जिजाऊ यांचे चारित्र्यहनन करणारा आहे. अमेरिकन लेखकाने हिंदुस्थानाचे आराध्य दैवत असणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज यांना अपमानीत करणारे, चारित्र्यहनन करणारे लेखन केले असेल तर.....

यानंतर श्री.अजित....

अशुद्धलेख प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

हिंदुस्थानाचा स्वाभिमान कुठे गेला असा आमच्यासमोर प्रश्न येतो. हा विषय अत्यंत गंभीर आहे. माननीय सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला, त्या दिवसापासून संपूर्ण महाराष्ट्र पेटला आहे. संपूर्ण महाराष्ट्रात आंदोलने उभी राहिली आहेत. मंत्र्यांच्या गाड्या अडविल्या जात आहेत. मंत्र्यांना घेराव घातले जात आहेत. या विषयाच्या संदर्भात जनतेच्या भावना अतिशय तीव्र आहेत. तेव्हा उभा महाराष्ट्र पेटून उठल्याशिवाय राहणार नाही. छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव हिंदुस्थानात नव्हे तर जगभर झाले आहे. अशा छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्माबाबत काही लोक शंका घेतात ही अतिशय दुर्दैवी बाब आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा सन्मान राखला गेला पाहिजे. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, हा घटनेच्या बाजूला जाऊन निर्णय दिलेला आहे. इतके गंभीर प्रकरण असताना सरकार या प्रकरणी किती गंभीर होते ते सन्माननीय महसूल मंत्री श्री.नारायण राणेसाहेब दिसून येते. सरकार जागरुक असते तर हा निर्णय छत्रपती शिवाजी महाराजांच्या विरोधात गेला नसता. परंतु या प्रकरणी सरकारचे तसेच वकिलांचे दुर्लक्ष झाले. वकिलांना या पुस्तकावरील बंदी कायम राखता आली नाही तर निदान पुस्तकातील मजकूर काढून टाकावा असाही मुद्दा त्यांना मांडता आलेला नाही. आपण सर्वजण छत्रपती शिवाजी महाराजांना आराध्य दैवत मानतो. महाराष्ट्राची अस्मिता आणि स्वाभिमान यादृष्टीने आपण शिवरायांकडे पाहतो. त्यांच्याबद्दल अवमानकारक मजकूर छापून येणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. तेव्हा या विषयापेक्षा दुसरा महत्वाचा विषय असू शकत नाही. न्यायालयाने सरकारला "जेम्स लेन", "बेस्ट फाईव्ह" आणि "महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्न" या तिन्ही प्रश्नांबाबत चांगलीच चपराक दिलेली आहे, हे महाराष्ट्राच्या अस्मितेच्या दृष्टीने चांगले नाही. तेव्हा माझी आपणास विनंती आहे की, आजच्या दिवसाच्या कामकाजपत्रिकेतील कामकाज बाजूला सारुन या विषयावर चर्चा झाली पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितल्याप्रमाणे या विषयावरील चर्चा सुरुवातीस आली असती तर त्यास वेगळे महत्व राहिले असते. सीमा प्रश्नावर गेली 50 वर्षे चर्चा चालू आहे त्यावर आपणास नंतरही बोलता आले असते. परंतु छत्रपती शिवाजी महाराज महाराष्ट्राची तळपती अस्मिता आहे आणि त्या अस्मितेबाबत काही वावगे घडत असेल तर त्याबाबत प्रथम चर्चा करणे याशिवाय दुसरे महत्वाचे कोणतेही काम असू शकत नाही. आम्ही चर्चेच्या वेळी इतर मुद्दे उपस्थित करु. जेम्स लेन यांनी लिहिलेल्या मजकुराबाबत यापूर्वी या सभागृहात चर्चा झालेली आहे. आपण सर्वांनी मिळून त्या पुस्तकाचा निषेध केलेला आहे. सरकारच्या वतीने काय बोलले गेले ते चर्चेच्या वेळी आम्ही मांडू. जेम्स लेन यांनी लिहिलेल्या पुस्तकावर घातलेली बंदी सर्वोच्च न्यायालयाने उठविली. मुळात प्रश्न असा आहे की, या पुस्तकाच्या अनुषंगाने महाराष्ट्रात उसळलेला संताप पाहिल्यानंतर प्रकाशकाने त्या पुस्तकाचे प्रकाशन मागे घेतले होते. महाराष्ट्राची माफी मागितली होती. छत्रपती शिवाजी महाराजांबाबत मंत्रिमंडळातील सदस्यांना स्वाभिमान नाही असे माझे म्हणणे नाही. आजच्या चर्चेमध्ये हा निर्णय होणे गरजेचे आहे की, या संदर्भात दोषी असणाऱ्या अधिकाऱ्यांना कारवाई करणार नसाल तर याबाबतीत वृथा चर्चा करायची आमची इच्छा नाही. आज राज्यात ठिकठिकाणी जेम्स लेनचे पुतळे जाळले जात आहेत, परंतु ते पुतळे जेम्स लेनचे नसून सरकारच्या प्रतिकात्मक प्रवृत्तीचे पुतळे आहेत. आम्हाला सरकारच्या नाकर्तेपणाबद्दल चर्चा करायची आहे. या प्रकरणी सरकारला आलेल्या अपयशाबद्दल चर्चा करायची आहे. सर्वोच्च न्यायालयात महाराष्ट्राची बदनामी झाली आहे. काल माननीय मुख्यमंत्री म्हणाले की, आम्ही महाराष्ट्रात एकही पुस्तक विकू देणार नाही.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ...

माननीय मुख्यमंत्री महोदयांना मी असे विचारु इच्छितो की, की छत्रपती शिवाजी महाराज हे फक्त महाराष्ट्राचेच होते काय ? छत्रपती शिवाजी महाराज तर संपूर्ण देशाचे होते. तेव्हा संपूर्ण देशातील बदनामी थांबविण्यासाठी राज्य सरकार केन्द्र सरकारवर कोणत्या प्रकारचा दबाव आणणार आहे आणि हे पुस्तक संपूर्ण देशात विकले जाणार नाही यासाठी केन्द्र सरकारला काय सांगणार आहात याची आम्हाला माहिती पाहिजे आहे. या चर्चेमध्ये अत्यंत महत्वाचे असे घटनात्मक मुद्दे , आणि या प्रकरणात आपल्याला आलेले अपयश या संदर्भात कायद्याला धरुन असलेले महत्वाचे मुद्दे इत्यादी संबंधी आम्हाला चर्चा करावयाची असल्यामुळे सर्व कामकाज थांबविण्यात यावे आणि याच विषयावर चर्चा करण्यात यावी. जेम्स लेनने लिहिलेल्या पुस्तकाच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या अस्मितेचा आणि महाराष्ट्राच्या दैवताचा होणारा अवमान तातडीने थांबविण्यासाठी कोणती तातडीने पावले उचलण्यात येणार आहेत हे जाणून घेण्यासाठी या विषयावरील चर्चा तातडीने सुरु करण्यात यावी अशी मी आपल्याला विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, या निमित्ताने मला एकच मुद्दा असा मांडावयाचा आहे की, छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान होत असतांना महाराष्ट्रातील हजारो महिला आणि हजारो पुरुष कार्यकर्ते मला भेटले होते आणि ते आत्मदहनाच्या तयारीमध्ये आहेत. "जिजाऊ " बद्दल संपूर्ण महाराष्ट्रालाच नव्हे तर संपूर्ण् भारताला अभिमान वाटतो अशा कुंटुबाच्या संदर्भात अपप्रचार केवळ भारतभर केला जात नाही तर संपूर्ण जगभर केला जात आहे.त्यामुळे संपूर्ण् हिंदुस्थानमध्ये या पुस्तकावरील बंदी घालण्यासाठी सर्वोच्च न्यायालयासमोर आपली बाजू मांडली गेली पाहिजे. या विषयावर सभागृहात होणा-या अत्यंत महत्वाच्या चर्चेकडे संपूर्ण राज्यातील जनतेचे लक्ष लागलेले आहे.तेव्हा या विषयावर चर्चा करण्यासाठी आपण परवानगी द्यावी आणि निर्णायकपणे या पुस्तकावर कायम स्वरुपाच्या बंदीची अंमलबजावणी झाली पाहिजे इतकेच नव्हे तर जेम्स लेनला शोधून काढण्यासाठी गृह विभाग काय करणार आहे याची माहिती देखील सभागृहाला कळली पाहिजे तेव्हा या विषयावर तातडीने चर्चा करण्यात यावी अशी माझी आपल्याला विनंती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, विधान परिषद विरोधी पक्ष नेते श्री पांडुरंग फुंडकर यांनी नियम 289 अन्वये एक प्रस्ताव मांडला आहे.जेम्स लेन यांनी लिहिलेल्या पुस्तकात छत्रपती शिवाजी महाराजांच्या संदर्भात जे लिहिले होते त्या पुस्तकावर राज्य सरकारने बंदी घातली होती ती बंदी सुप्रीम कोर्टाने उठवली होती. त्याबाबतीत संपूर्ण महाराष्ट्रात आणि देशभर अत्यंत तीव्र भावना उमटल्या आहेत.त्या सबंधी सभागृहात चर्चा घडवून आणावी यासबंधीचा प्रस्ताव माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी मांडलेला आहे.त्या प्रस्तावाला सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते आणि सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी पाठिंबा दिलेला आहे.

सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराज हे आपल्या सर्वाचे दैवत आहे. केवळ महाराष्ट्राचेच नव्हे तर संपूर्ण देशाचे ते दैवत आहे. त्यामुळे त्यांच्या सबंधी जे काही लिखाण करण्यात आले होते त्याबद्दल तीव्र निषेध त्याच वेळी संपूर्ण राज्यभर नव्हे तर संपूर्ण देशभर करण्यात आला होता. ही बाब गांभीर्याने घेऊनच राज्य सरकारने त्यावेळी या पुस्तकावर बंदी घातली होती. हायकोर्टात आणि सुप्रीम कोर्टात त्याच्या विरुध्द अपील झाल्यानंतर या पुस्तकावरील बंदी उठविण्यात आली होती. या प्रक्रियेमध्ये सुप्रीम कोर्टात आपले वकील गेले होते या प्रक्रियेमध्ये कोर्टात लढणारे वकील कोठे कमी पडले का पडले याची चौकशी राज्यपातळीवर आज सुरु आहे. या बाबतीत सरकारने कोठेही दुर्लक्ष केलेले नाही. सुप्रीम कोर्टाने जे जज्जमेन्ट दिलेले आहे ते दुरुस्त करण्यासाठी आपल्याला काय करावे लागेल ? या संबंधी गेल्या दोन तीन दिवसापासून ॲडव्होकेट जनरल तसेच अन्य कायदे तज्ज्ञाबरोबर सरकार चर्चा करीत आहे तसेच या पुस्तकावरील बंदी उठविण्याच्या संदर्भात सुप्रीम कोर्टाने जो निर्णय दिलेला आहे त्यावर स्थगिती कशी मिळवता येईल या दृष्टीने राज्य सरकार प्रयत्नशील आहे. या विषयावर मी जास्त बोलणार नाही. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते, डॉ.नीलम गो-हे वा विरोधी पक्षाच्या अन्य सन्माननीय सदस्यांची या संदर्भात जी भावना आहे तीच भावना सत्तारुढ पक्षातील सर्व सन्माननीय सदस्यांची आहे. हा प्रश्न केवळ ठराविक लोकांचा नाही किंवा ठराविक पक्षाचा नाही. या राज्याच्या अस्मितेचा आणि आमच्या देवतांचा हा प्रश्न आहे. या विषयाच्या संदर्भात जरुर चर्चा करण्यात यावी. चर्चा करण्याच्या बाबतीत सत्तारुढ पक्षाची काहीही हरकत नाही. सभापती महोदय , आपण या विषयावर चर्चेसाठी जी वेळ ठरवून

4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

घ्याल त्या वेळी या विषयावर चर्चा होईल. आणि त्यावेळी सरकारकडून आपणास जरुर उत्तर मिळेल. परंतु सरकार या कामी कोठेही कमी पडलेले नाही. आमच्या परीने आम्ही बरेच प्रयत्न केले होते. त्या पुस्तकावर याच सरकारने बंदी घातली होती . त्या पुस्तकावरील बंदी उठविण्याचा निर्णय सुप्रीम कोर्टाने दिला असून यातून जी परिस्थिती निर्माण झाली आहे तिला कसे सामोरे जाता येईल याबाबतीत तुम्ही आम्ही एकत्र मिळून प्रयत्न करु या आणि शिवाजी महाराज हे आपले दैवत आहे त्या दैवताबद्दल आपणास जे प्रेम, आस्था व अभिमान आहे .....

नंतर अजित शिगम

अप्रुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नारायण राणे...

ते कायम स्वरुपी टिकले पाहिजे. आणि जेम्स लेन या लेखकाने केलेल्या लिखाणाचा निषेध केला पाहिजे. त्याचबरोबर या बाबत योग्य ती कारवाई व्हावी अशी जी माननीय सदस्यांची भावना आहे, त्या भावनेशी आम्ही देखील सहमत आहोत.

सभापती : मघाशी या सभागृहामध्ये नियम 289 अन्वये प्रस्ताव मांडण्यात आला. यासंबंधी मला खुलासा करावयाचा आहे की, माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर, माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, पाशा पटेल यांचा पहिला प्रस्ताव सकाळी 9.30 वाजता देण्यात आला. त्यानंतर माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते व माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांचे दुसरे प्रस्ताव अनुक्रमे 10.10 वाजता व 10.20 वाजता सादर करण्यात आले. त्यानंतर तिसरा प्रस्ताव माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी 11.05 वाजता सादर केला. अशा क्रमाने नियम 289 अन्वये प्रस्ताव सादर करण्यात आले असतांना थोडी नजरेत चूक झाल्यामुळे मी माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांचा प्रस्ताव मांडल्यानंतर माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांचा प्रस्ताव मांडला. यामध्ये झालेल्या गफलतीची चौकशी करुन असे पुन्हा कदापि होता कामा नये या दृष्टीने अत्यंत दक्ष राहण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

त्यानंतर, माझ्या दालनामध्ये माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर, माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते, माननीय महसूल मंत्री श्री. नारायण राणे साहेब आणि माननीय संसदीय कार्यमंत्री मंत्री श्री. हर्षवर्धन पाटील साहेब यांच्याबरोबर झालेल्या चर्चेअंती मी या निर्णयापर्यंत पोहोचलो आहे की, माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर, माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांचा पहिला प्रस्ताव आणि माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांच्या तिसऱ्या प्रस्तावाचे महत्व लक्षात घेऊन त्यावर आज या सदनामध्ये चर्चा घेण्याचे मी ठरविले आहे. त्यामुळे आजच्या कामकाज पत्रिकेमधील माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांची नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा उद्याच्या कामकाजामध्ये पहिल्या क्रमांकावर दाखविण्यात येईल. त्यानंतर सत्ताधारी पक्षाकडील प्रस्तावावर चर्चा घेण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MMP/

सभापती ....

सभागृहापुढील औपचारिक कामकाज संपल्यानंतर आणि शोकप्रस्ताव मांडल्यानंतर माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर व माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी नियम 289 अन्वये दिलेला पहिला प्रस्ताव चर्चेकरिता घेण्यात येईल. या प्रस्तावावरील चर्चेचा कालावधी 1 तास असून मंत्रिमहोदयांचे 15 मिनिटांचे उत्तराचे भाषण मिळून सव्वा तासामध्ये ही चर्चा संपली पाहिजे. त्यानंतर माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांच्या नियम 289 अन्वये प्रस्तावावरील चर्चा सुरु होऊन ती एक तासामध्ये संपविण्यात येईल. अशापध्दतीने मी आजचे कामकाज निश्चित केले आहे. बैठकीच्या शेवटी घेण्यात येणारी अर्धा तास चर्चा आज होणार नाही. बाकीचे सर्व कामकाज आजच आपणास संपवावयाचे आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी : मंत्र्यांचा परिचय

श्री. अशोक चव्हाण (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, श्री. रामराजे प्रतापसिंह नाईक-निंबाळकर यांचा जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ) मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

पृ.शी./मु.शी : अध्यादेश सभागृहासमोर ठेवणे

श्री. रणजित कांबळे (ग्रामविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2010 चा अध्यादेश क्रमांक 5 मुंबई ग्रामपंचायत (सुधारणा) अध्यादेश मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. बाळासाहेब थोरात (कृषी मंत्री) : सभापती महोदय, सन 2010 चा अध्यादेश क्रमांक 7 महाराष्ट्र कृषी विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजय वडेट्टीवार (संसदीय कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2010 चा अध्यादेश क्रमांक 6 - महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश, 2010 सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

डॉ. नितीन राऊत (पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय मंत्री) : सभापती महोदय, सन 2010 चा अध्यादेश क्रमांक 8 - महाराष्ट्र पशु आणि मत्स्यव्यवसाय विज्ञान विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश, 2010 सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ MMP/

पृ.शी./मु.शी.: सन 2010-2011 करिता पूरक विवरणपत्र सादर करणे

श्री. विजय वडेट्टीवार (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010-2011 करिता खर्चाचे पूरक विवरणपत्र सभागृहाला सादर करीत आहे आणि तसे करीत असताना मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 205 आणि 203 (3) मधील तरतुदीस अनुलक्षून मिळालेल्या अधिकारानुसार महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी सन 2010-2011 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा करण्याकरिता सभागृहाला शिफारस केली आहे.

सभापती : सन 2010-2011 मधील खर्चाचे पूरक विवरणपत्र सभागृहाला सादर झाले आहे. सदरहू पूरक विवरणपत्राच्या प्रती सदस्यांसाठी राखून ठेवलेल्या टपालखणांमध्ये वितरित करण्यात येत आहेत.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: विधेयकांना संमती व अधिसंमती

सभापती : विधानपरिषदेने संमत केलेल्या पुढील विधेयकांना विधानसभेकडून संमती मिळाल्याची आणि दोन्ही सभागृहांद्वारे पारित केलेल्या विधेयकांना राज्यपालांची अधिसंमती मिळाल्यासंबंधीची यादी प्रधान सचिव वाचून दाखवतील.

सह सचिव : विधानपरिषदेने पारित केलेली पुढील विधेयके विधानसभेकडून संमत करण्यात आली.

(1) सन 2010 चे विधानपरिषद विधेयक क्रमांक 6 - किमान वेतन (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक,2010.

(2) सन 2010 चे विधानपरिषद विधेयक क्रमांक 7 - महाराष्ट्र महानगरपालिका, नगरपरिषदा आणि महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन नगररचना (सुधारणा) विधेयक,2010.

राज्यपालांनी पुढील विधेयकांना अधिसंमती दिली आहे.

(1) सन 2009 चे विधानसभा विधेयक क्रमांक 17 - मुंबई करमणूक शुल्क (सुधारणा) विधेयक,2009.

(2) सन 2009 चे विधानसभा विधेयक क्रमांक 55 - मुंबई मुद्रांक (सुधारणा) विधेयक,2009.

(3) सन 2009 चे विधानसभा विधेयक क्रमांक 66 - मुंबई प्रांतिक महानगरपालिका, नागपूर शहर महानगरपालिका, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी, महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन आणि महाराष्ट्र (मोठया निवासी जागा असलेल्या) इमारतींवरील कर (पुन्हा अधिनियमित केलेला) (सुधारणा) विधेयक,2009.

(4) सन 2010 चे विधानसभा विधेयक क्रमांक 26 - मुंबई न्यायालय-फी (सुधारणा आणि त्या चालू राहणे) विधेयक,2010.

(5) सन 2010 चे विधानसभा विधेयक क्रमांक 27 - महाराष्ट्र (पुरवणी) विनियोजन विधेयक,2010.

..4..

सह सचिव ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(6) सन 2010 चे विधानसभा विधेयक क्रमांक 28 - महाराष्ट्र विनियोजन (लेखानुदान) विधेयक, 2010.

(7) सन 2010 चे विधानसभा विधेयक क्रमांक 29 - महाराष्ट्र वैद्यकीय सेवा-व्यक्ती आणि वैद्यकीय सेवा-संस्था (हिंसक कृत्ये व मालमत्तेची हानी किंवा नुकसान यांना प्रतिबंध) विधेयक,2010.

(8) सन 2010 चे विधानसभा विधेयक क्रमांक 31 - मुंबई पण कर (सुधारणा) विधेयक,2010

(9) सन 2010 चे विधानसभा विधेयक क्रमांक 32 - महाराष्ट्र मूल्यवर्धित कर (सुधारणा) विधेयक,2010

(10) सन 2010 चे विधानसभा विधेयक क्रमांक 40 - मुंबई ग्रामपंचायत व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, 2010.

(11) सन 2010 चे विधानसभा विधेयक क्रमांक 41 - मुंबई मोटार वाहन कर (सुधारणा) विधेयक,2010.

(12) सन 2010 चे विधानसभा विधेयक क्रमांक 45 - महाराष्ट्र करविषयक कायदे (कर बसविणे व सुधारणा) विधेयक,2010.

(13) सन 2010 चे विधानसभा विधेयक क्रमांक 50 - महाराष्ट्र विनियोजन विधेयक,2010.

(14) सन 2010 चे विधानपरिषद विधेयक क्रमांक 3 - महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ विधेयक,2010.

(15) सन 2010 चे विधानपरिषद विधेयक क्रमांक 4 - महाराष्ट्र कामगारांचा किमान घरभाडे भत्ता (सुधारणा) विधेयक,2010.

यानंतर श्री. बरवड...

अशुद्धीत पत्र / शोधनीसाठी नाही

पृ. शी. : आरोग्य विज्ञान विद्यापीठ (सुधारणा) विधेयक.

L. C. BILL NO. VIII OF 2010

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES ACT, 1998.)

प्रा. वर्षा गायकवाड (वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2010 चे वि. प. वि. क्रमांक 8- महाराष्ट्र राज्य आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, 1998 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागते.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

सभापती : अनुमती देण्यात आली आहे.

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे वि. प. वि. क्रमांक 8 मांडते.

सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ KGS

पृ. शी. : कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक.

L. C. BILL NO. IX OF 2010.

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA AGRICULTURAL PRODUCE MARKETING (DEVELOPMENTAND REGULATION) ACT, 1963.

श्री. हर्षवर्धन पाटील (पणन मंत्री) : सभापती महोदय, सन 2010 चे वि. प. वि. क्रमांक 9- महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, 1963 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

सभापती : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे वि. प. वि. क्रमांक 9 मांडतो.

सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ KGS

पृ. शी. : शोक प्रस्ताव

मु. शी. : श्री. भैरोसिंह शेखावत, माजी उप राष्ट्रपती, श्रीमती प्रभा आनंद राव, माजी वि. प. स.,मंत्री व मा.राज्यपाल, श्री. नरेंद्र महिपती तिडके, माजी वि. प. स. व मंत्री, सर्वश्री प्रभाकर गंगाराम दस्तुरकर, पद्माकर मल्लिकार्जून पाटील, ताबजीभाई मांडाभाई सोळंकी, विनोदकुमार छाजुराम गुप्ता, प्रा. ग. प्र. प्रधान, केशवराव व्यंकटेश राणे, माजी वि. प. स. यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव

श्री. अशोक चव्हाण (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, श्री. भैरोसिंह शेखावत, माजी उप राष्ट्रपती, श्रीमती प्रभा आनंद राव, माजी वि. प. स.,मंत्री व मा.राज्यपाल, श्री. नरेंद्र महिपती तिडके, माजी वि. प. स. व मंत्री, सर्वश्री प्रभाकर गंगाराम दस्तुरकर, पद्माकर मल्लिकार्जून पाटील, ताबजीभाई मांडाभाई सोळंकी, विनोदकुमार छाजुराम गुप्ता, प्रा. ग. प्र. प्रधान, केशवराव व्यंकटेश राणे, माजी वि. प. स. यांच्या निधनाबद्दल मी खालील शोक प्रस्ताव मांडतो.

"श्री. भैरोसिंह शेखावत, माजी उप राष्ट्रपती, श्रीमती प्रभा आनंद राव, माजी वि. प. स.,मंत्री व मा.राज्यपाल, श्री. नरेंद्र महिपती तिडके, माजी वि. प. स. व मंत्री, सर्वश्री प्रभाकर गंगाराम दस्तुरकर, पद्माकर मल्लिकार्जून पाटील, ताबजीभाई मांडाभाई सोळंकी, विनोदकुमार छाजुराम गुप्ता, प्रा. ग. प्र. प्रधान, केशवराव व्यंकटेश राणे, माजी वि. प. स. यांच्या दु:खद निधनाबद्दल हे सभागृह अतीव दु:ख व्यक्त करते."

सभापती महोदय, कै. भैरोसिंह शेखावत यांचा जन्म 23 ऑक्टोबर 1923 रोजी राजस्थान मधील सिकर जिल्ह्यातील खचरियावास येथे झाला.

कै. शेखावत यांनी सुरुवातीस काही काळ पोलीस खात्यात नोकरी केली व नंतर जनसंघाच्या माध्यमातून राजकीय कार्यास सुरूवात केली. 1952 पासून, 1972 ते 1977 हा अपवाद वगळता 2002 पर्यंत ते राजस्थान विधानसभा सदस्य म्हणून कार्यरत होते. या काळात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण .....

त्यांनी तीन वेळा राजस्थानचे मुख्यमंत्री व तीन वेळा विधानसभेतील विरोधी पक्ष नेते म्हणून मोठे कार्य केले. भारतीय जनता पक्षाचे ते राष्ट्रीय उपाध्यक्ष होते.

कै. शेखावत हे धर्मनिरपेक्ष व स्वच्छ चारित्र्याचे अजातशत्रु राजकारणी होते. गोरगरिबांबद्दल कणव असणारे नेते होते, जनतेच्या समस्यांची व इच्छा आकांक्षाची त्यांना उत्तम जाण होती. मुख्यमंत्रीपदी असताना त्यांनी सुरु केलेली "अंत्योदय" योजना देशभर किंबहुना आंतरराष्ट्रीय स्तरावरही गाजली. समाजातील 'नाहीरे वर्गाचा' आवाज उठविणारे नेते अशी त्यांची ख्याती होती.

कै. शेखावत 1974 ते 1977 या कालावधीत राज्यसभा सदस्य होते. ऑगस्ट 2002 मध्ये उप राष्ट्रपतीपदी ते निर्वाचित झाले. 2002 ते 2007 या कालावधीत भारताचे उप राष्ट्रपती व राज्यसभेचे सभापतीपद त्यांनी भूषविले.

अशा या ज्येष्ठ समाजसेवकाचे, खंबीर प्रशासक आणि कुशल राजकीय नेत्याचे शनिवार दिनांक 15 मे 2010 रोजी दु:खद निधन झाले.

सभापती महोदय, कै. प्रभा आनंद राव यांचा जन्म 4 मार्च 1935 रोजी, मध्यप्रदेशातील खांडवा येथे झाला. त्यांचे शिक्षण एम.ए. पर्यंत झाले होते.

कै. राव यांनी रोहणी ग्रामपंचायतीच्या व वर्धा जिल्हा परिषदेच्या सदस्या, वर्धा जिल्हा सहकारी बँकेच्या संचालिका व भूविकास बँकेच्या अध्यक्षा, पंजाबराव कृषी विद्यापीठ कोर्टाच्या सदस्या, महाराष्ट्र राज्य समाजकल्याण मंडळाच्या सदस्या तसेच, महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा म्हणूनही कार्य केले.

कै. राव यांनी तीन वेळा आंतरराष्ट्रीय महिला परिषदांत भारताचे प्रतिनिधीत्व केले. आंतरराष्ट्रीय महिला परिषदेचे उपाध्यक्षपद व पॅसिफिक विभागीय राष्ट्रांच्या महिला गटाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले होते.

कै. राव यांनी अखिल भारतीय काँग्रेस कार्यकारिणीच्या सदस्या व सरचिटणीस, शताब्दी समिती व प्रचार समितीच्या उपाध्यक्षा म्हणून कार्य केले. 1984-1989 व 2004-2008 या

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ KGS

श्री. अशोक चव्हाण

कालावधीत महाराष्ट्र काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्ष पदाची धुराही त्यांनी सांभाळली होती. करड्या शिस्तीच्या, खंबीर व तडफदार महिला नेत्या म्हणून त्यांचा पक्षात दबदबा होता.

कै. राव 1972, 1978, 1985 व 1995 अशा चार वेळा वर्धा जिल्ह्यातील पुलगांव मतदारसंघातून महाराष्ट्र विधानसभेवर, 1980 मध्ये महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारे महाराष्ट्र विधानपरिषदेवर तसेच, 1999 मध्ये वर्धा मतदार संघातून लोकसभेवरही त्या निर्वाचित झाल्या होत्या. महाराष्ट्र विधानसभेच्या विरोधी पक्ष नेतेपदी आणि राज्य मंत्रीमंडळात शिक्षण, नियोजन व उद्योग खात्याच्या राज्यमंत्री तसेच शिक्षण, क्रीडा, युवक कल्याण, सहकार आणि पर्यटन, महसूल व सांस्कृतिक कार्य या खात्यांच्या मंत्री म्हणून त्यांनी कार्य केले. हिमाचल प्रदेशचे राज्यपालपद त्यांनी भूषविले. राजस्थानच्या राज्यपालपदी त्या कार्यरत होत्या.

अशा या ज्येष्ठ समाजसेविकेचे सोमवार दिनांक 26 एप्रिल 2010 रोजी दु:खद निधन झाले.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अशोक चव्हाण....

कै. नरेंद्र महिपती तिडके यांचा जन्म 2 नोव्हेंबर 1920 रोजी नागपूर जिल्ह्यात, कळमेश्वर तालुक्यामध्ये साहुली येथे झाला. त्यांचे शिक्षण बी.ए., एलएल.बी. पर्यंत झाले होते.

कै. तिडके यांनी 1942 च्या स्वातंत्र्य लढ्यात भाग घेऊन कारावास सोसला. राष्ट्रीय मिल मजदूर संघाचे व बल्लारपूर पेपर मिल मजदूर संघाचे अध्यक्ष तसेच अनेक ट्रेड युनियन्सचे पदाधिकारी म्हणून त्यांनी कामगार क्षेत्रात मोठे कार्य केले. कामगारांसंबंधीच्या आंतरराष्ट्रीय परिषदांत त्यांनी भारताचे प्रतिनिधित्व केले. कामगार चळवळीचे ते प्रणेते होते. राज्यातील कामगार धोरणाला आकार देण्याचे काम त्यांच्याच कार्यकाळात झाले. नागपूर जिल्ह्यातील ग्रामीण भागात शिक्षण प्रसाराचे कार्य करणाऱ्या महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्थेचे सेक्रेटरी म्हणूनही त्यांनी कार्य केले.

कै. तिडके यांनी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष म्हणूनही कार्य केले. विदर्भ विभागाच्या विकासासाठी त्यांनी सर्वतोपरी प्रयत्न केले. कुशल संघटक व समन्वयवादी, मृदुभाषी नेते म्हणून त्यांची ख्याती होती. अजातशत्रु असे त्यांचे व्यक्तिमत्व होते.

कै. तिडके 1952 मध्ये भूतपूर्व मध्यप्रदेश विधानसभेवर सावनेर मतदारसंघातून निर्वाचित झाले होते. राज्य पूनर्रचनेनंतर 1956 मध्ये तत्कालिन मुंबईराज्य विधानसभेचे ते सदस्य होते. त्यानंतर 1957 मध्ये मुंबईराज्य विधानसभेवर रामटेक मतदार संघातून व 1962,1967 आणि 1972 मध्ये सावनेर मतदारसंघातून महाराष्ट्र विधानसभेवर ते निर्वाचित झाले होते. 1980 मध्ये महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा विधानपरिषदेवरही ते निर्वाचित झाले होते. 1960 पासून सुरुवातीस ग्रामीण विकास खात्याचे उपमंत्री व 1962 नंतर कामगार, ग्रामविकास, उद्योग, ऊर्जा, मुद्रणालये, संसदीय कार्य, नियोजन व सहकार अशा अनेक खात्यांचे मंत्रीपद त्यांनी भूषविले होते. त्यांच्या कामगार मंत्रीपदाच्या कार्यकाळात माथाडी कामगार आणि रोजगार हमीचा कायदा मंजूर करण्याकामी त्यांनी मोलाची भूमिका बजावली. संसदीय कार्य मंत्री म्हणूनही आपला ठसा त्यांनी उमटविला.

अशा या ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिकाचे व समाजसेवकाचे बुधवार, दिनांक 16 जून 2010 रोजी दु:खद निधन झाले.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अशोक चव्हाण.....

सभापती महोदय, कै. प्रभाकर गंगाराम दस्तुरकर यांचा जन्म 12 मार्च 1943 रोजी नांदेड जिल्ह्यात, हदगाव तालुक्यामधील खडकी येथे झाला. त्यांचे शिक्षण बी. एस्सी., बी.एड. पर्यंत झाले होते.

कै. दस्तूरकर यांनी शिवाजी हायस्कूल नांदेड येथे 37 वर्षे अध्यापनाचे कार्य केले. मराठवाडा जनता विकास परिषद व अंधश्रध्दा निर्मूलन समितीचे सदस्य, ग्राहक संघटनेचे सचिव, मराठवाडा शिक्षक संघटनेचे सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक महामंडळ, महाराष्ट्र राज्य सरकारी व निमसरकारी कर्मचारी संघटना तसेच, मराठवाडा रेल्वे संघर्ष समितीचे सदस्य म्हणूनही त्यांनी कार्य केले.

कै. दस्तूरकर यांनी खाजगी शाळांतील शिक्षकांचे पगार बँकेमार्फत मिळावेत, शाळा न्यायाधिकरण स्थापन करावे, मराठवाड्यात ब्रॉडगेज रेल्वे मार्ग व्हावेत तसेच, मराठवाडा वैधानिक विकास मंडळ व नांदेड येथे विद्यापीठ स्थापन करावे यासाठी प्रयत्न केले. शिक्षण व शिक्षकांच्या समस्या सोडविण्यासाठी ते सतत झटले. अनेक सामाजिक संस्थाशी त्यांचा निकटचा संबंध होता.

कै. दस्तूरकर 1992 मध्ये औरंगाबाद विभाग शिक्षक मतदार संघातून महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित झाले होते. सभागृहाच्या माध्यमातून अंधश्रध्दा निर्मूलन कायदा होण्यासाठी त्यांनी सतत पाठपुरावा केला.

अशा या समाजसेवकाचे मंगळवार दिनांक 27 एप्रिल 2010 रोजी दु:खद निधन झाले.

सभापती महोदय, कै. पद्माकर मल्लिकार्जुन पाटील यांचा जन्म 8 एप्रिल 1944 रोजी लातूर जिल्ह्यात अहमदपूर तालुक्यामधील सावरगाव-रोकडा येथे झाला. त्यांचे शिक्षण बी.एस्सी., बी.एड. पर्यंत झाले होते.

कै. पाटील यांनी अनेक वर्षे अध्यापनाचे कार्य केले. सोमेश्वर शिक्षक कर्मचारी पगारदार सहकारी संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष, बीड जिल्हा शिक्षक संघटनेचे सचिव, मराठवाडा शिक्षक संघटनेचे जिल्हा संघटक, विभागीय सचिव व सरचिटणीस, तसेच महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक महामंडळाचे सरचिटणीस म्हणूनही त्यांनी कार्य केले. शिक्षक संघटनांच्या माध्यमातून शिक्षकांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी त्यांनी सतत प्रयत्न केले.

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अशोक चव्हाण.....

कै. पाटील यांनी साक्षरता प्रसारासाठी प्रयत्न केले. बीड जिल्ह्यात शेतमजूर, हमाल, गुमास्ता तसेच औद्योगीक संस्था सुरु केल्या. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे ते निष्ठावंत कार्यकर्ते होते.

कै. पाटील 1998 मध्ये औरंगाबाद विभाग शिक्षक मतदार संघातून महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित झाले होते.

अशा या समाजसेवकाचे गुरुवार दिनांक 20 मे 2010 रोजी दु:खद निधन झाले.

सभापती महोदय, कै. ताबजीभाई मांडाभाई सोळंकी यांचा जन्म 15 जुलै 1920 रोजी मुंबई येथे झाला. त्यांचे शिक्षण एस्.एस्.सी. पर्यंत झाले होते.

कै. सोळंकी यांनी स्वातंत्र्य लढयात भाग घेतला होता. मुंबई महानगरपालिकेमध्ये त्यांनी काही काळ नोकरी केली. 15 वर्षे मुंबई महानगरपालिकेत नगरसेवक व आरोग्य समितीचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी कार्य केले. काँग्रेस सेवादलातही त्यांनी कार्य केले. मुंबई विभागीय काँग्रेसचे काही काळ ते उपाध्यक्ष होते.

कै. सोळंकी यांनी साक्षरता प्रसार, रात्र विद्यालये, ग्रंथालये, गरीब विद्यार्थ्यांना सहाय्य असे शैक्षणिक कार्य केले. व्यसनमुक्ती, अंधश्रध्दा निर्मुलन, अस्पृश्यता निर्मुलन, बालविवाह बंदी यासाठी त्यांनी सतत प्रबोधन कार्य केले. महाराष्ट्र समाजकल्याण विभाग समिती, गृहनिर्माण समिती, टेलिफोन सल्लागार समितीचे सदस्य म्हणूनही त्यांनी कार्य केले. त्यांच्या या सामाजिक कार्याची नोंद घेऊन शासनाने त्यांना **"दलित मित्र"** पुरस्काराने गौरविले होते. त्याचप्रमाणे **"मेघरत्न"**, **"हरिजन मित्र"** असे अन्य पुरस्कारही त्यांना प्राप्त झाले होते.

कै. सोळंकी 1990 व 1992 असे दोन वेळा मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था मतदारसंघातून विधानपरिषदेवर निर्वाचित झाले होते.

अशा या ज्येष्ठ समाजसेवकाचे रविवार दिनांक 23 मे 2010 रोजी दु:खद निधन झाले.

यानंतर श्री.शिगम....

अशुद्धित प्रत / शुद्धिपत्रिका नाही

श्री. अशोक चव्हाण....

कै. विनोदकुमार छाजुराम गुप्ता यांचा जन्म 1 जुलै 1930 रोजी राजस्थानमधील अलवर येथे झाला.

कै. गुप्ता यांनी विश्वहिंदू परिषदेचे सदस्य, भारतीय जनसंघाचे मुंबई विभागाचे कोषाध्यक्ष, महाराष्ट्र जनता पार्टीचे कोषाध्यक्ष, मुंबई टेलिफोन सल्लागार समितीचे सदस्य व श्री आदर्श रामलीला समितीचे संस्थापक सचिव म्हणून कार्य केले. आदिवासी व वनवासी लोकांच्या विकासासाठी त्यांनी सतत प्रयत्न केले. विविध सामाजिक संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध होता.

कै. गुप्ता 1978 मध्ये महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित झाले होते.

अशा या ज्येष्ठ समाजसेवकाचे मंगळवार दिनांक 25 मे 2010 रोजी दुःखद निधन झाले.

कै. प्रा. गणेश प्रभाकर प्रधान यांचा जन्म 26 ऑगस्ट 1922 रोजी पुणे येथे झाला. त्यांचे शिक्षण एम.ए. पर्यंत झाले होते.

कै. प्रा. प्रधान यांनी स्वातंत्र्य लढ्यामध्ये भाग घेऊन कारावास सोसला. राष्ट्रसेवादलात त्यांनी कार्य केले. पुणे येथील फर्ग्युसन महाविद्यालयात 20 वर्षे इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून त्यांनी अध्यापनाचे कार्य केले. साधना ट्रस्टचे विश्वस्त, महात्मा गांधी लोकसेवा संघाचे सदस्य, महाराष्ट्र आरोग्य मंडळ संस्थेचे अध्यक्ष, पुणे विद्यापीठाच्या सिनेटचे व कार्यकारिणीचे सदस्य, पुणे विद्यापीठ अध्यापक संघाचे अध्यक्ष तसेच, महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी कार्य केले. अनेक शैक्षणिक व सामाजिक संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध होता.

कै. प्रा. प्रधान यांनी सक्रिय राजकारणातून निवृत्त झाल्यानंतर "साधना" साप्ताहिकाच्या संपादक पदाची धुरा अनेक वर्षे सांभाळली. लोकप्रबोधन करण्यासाठी त्यांनी "साधना" साप्ताहिकातून तसेच विविध दैनिके, नियतकालिकांमधून आयुष्याच्या अखेरपर्यंत अनेकविध विषयांवर विपूल लिखाण केले. ते सिध्दहस्त व प्रभावी लेखक होते. त्यांनी अनेक ग्रंथ लिहिले, त्यापैकी "स्वातंत्र्य संग्रामाचे महाभारत", "साताउत्तराची कहाणी", "टॉलस्टॉयची पत्रे", "माझी वाटचाल", "सत्याग्रही गांधीजी", "लोकशाही आणि समाजवाद" ही मराठी तसेच "लोकमान्य टिळक-ए बायोग्राफी", "इंडियाज फ्रिडम स्ट्रगल", "लेटर्स टू टॉलस्टॉय" ही त्यांची इंग्रजी पुस्तके गाजली आहेत.

==2==

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण...

कै. प्रा. प्रधान यांनी सामान्य जनतेचे दु:ख हलके करण्यासाठी जीवनाच्या अखेरपर्यंत प्रयत्न केले. निरलस आणि व्रतस्थ वृत्तीने व साधेपणे सारे जीवन समाजासाठी व्यतीत करणारे महाराष्ट्रातील एक ज्येष्ठ विचारवंत अशी त्यांची सर्वदूर ख्याती होती. महान त्यागी असे ते व्यक्तिमत्व होते. राजकारण, समाजकारण, शिक्षण व साहित्य क्षेत्राला मार्गदर्शक ठरणारे ते ज्ञानयोगी होते.

कै. प्रा. प्रधान पदवीधर मतदार संघातून 1966, 1972 व 1978 असे तीन वेळा महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित झाले होते. महाराष्ट्र विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते म्हणूनही त्यांनी कार्य केले. विधानपरिषदेतील दीड तपाच्या कारकीर्दीत त्यांनी आपल्या कार्याची आगळीवेगळी मोहर उमटविली आहे. उत्तम वक्ते, अभ्यासू व आदर्श आमदार म्हणून त्यांनी उत्तुंग कार्य केले आहे.

अशा या ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिकाचे, ज्येष्ठ विचारवंताचे व व्रतस्थ लोकप्रतिनिधीचे शनिवार दिनांक 29 मे 2010 रोजी दु:खद निधन झाले.

कै. केशवराव व्यंकटेश राणे यांचा जन्म 15 नोव्हेंबर 1920 रोजी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कणकवली तालुक्यात वाघेरी येथे झाला. त्यांचे शिक्षण बी.ए., एलएल.बी. पर्यंत झाले होते.

कै. राणे यांनी सिंधुदुर्ग-रत्नागिरी एकत्रित जिल्हा परिषदेचे अध्यक्ष, एस.टी.महामंडळाचे सदस्य, कणकवली शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक व कोल्हापूर येथील शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे कार्यकारिणी सदस्य म्हणून कार्य केले. अनेक शैक्षणिक व सहकारी संस्थाशी त्यांचा निकटचा संबंध होता. कोकणच्या विकासासाठी अखेरपर्यंत त्यांनी सर्वतोपरी प्रयत्न केले.

कै.राणे 1952 व 1972 मध्ये कणकवली आणि 1980 मध्ये मालवण मतदार संघातून विधानसभेवर निर्वाचित झाले होते. 1988 मध्ये विधानसभा सदस्यांतर्फे निर्वाचित विधानपरिषदेचेही 1990 पर्यंत ते सदस्य होते.

अशा या समाजसेवकाचे रविवार, दिनांक 20 जून 2010 रोजी दु:खद निधन झाले.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते माननीय मुख्यमंत्री यांनी श्री. भैरोसिंह शेखावत, माजी उप राष्ट्रपती, श्रीमती प्रभा आनंद राव, माजी वि.प.स, मंत्री व माननीय राज्यपाल, श्री. नरेंद्र महिपती तिडके, माजी वि.प.स. व मंत्री, सर्वश्री प्रभाकर गंगाराम दस्तूरकर, पद्माकर मल्लिकार्जुन पाटील, ताबजीभाई मांडाभाई सोळंकी, विनोदकुमार छाजुराम गुप्ता, प्रा. ग.प्र.प्रधान, केशवराव व्यंकटेश राणे, माजी वि.प.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल हा जो शोकप्रस्ताव मांडलेला आहे त्यावर मी आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी उभा आहे.

भारताचे माजी उप राष्ट्रपती कै. भैरोसिंह शेखावत हे मूळचे राजस्थानचे होते.

....नंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

ते राजस्थानमधील सिकर जिल्हयातील रहिवासी होते. पोलीस खात्यामध्ये नोकरी स्वीकारुन त्यांनी आपल्या जीवनाची सुरुवात केली. सर्वसामान्य माणूस ते थेट उपराष्ट्रपती पदापर्यंत त्यांच्या जीवनाची वाटचाल झालेली आहे. कै.भैरोसिंह शेखावत यांनी भारतीय जनसंघाच्या काळापासून पक्षाची ध्येयधोरणे खालच्या स्तरापर्यंत पोहोचविण्यासाठी व पक्षाचा प्रभाव सतत वाढविण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. ते पक्षाचे सर्वात अनुभवी नेते होते. जनसंघाची स्थापना या देशामध्ये ज्यावेळी झाली त्यावेळेला जनसंघाच्या स्थापनेमध्ये जे संस्थापक सदस्य होते त्यापैकी कै.भैरोसिंह शेखावत हे एक होते. 1952 मध्ये ते पहिल्यांदा राजस्थान विधानसभेमध्ये निवडून गेले. तेव्हापासून 1972 चा अपवाद वगळता 2002 पर्यंत त्यांनी विधानसभेची प्रत्येक निवडणूक जिंकली होती. 1952 मध्ये त्यांच्या राजकीय कारकिर्दीला सुरुवात झाल्यानंतर 1954 मध्ये त्यांना एका अग्निदिव्याला सामोरे जावे लागले. पक्षाच्या धोरणाला प्राधान्य द्यायचे की आमदारकी शाबूत ठेवायची असा पेच त्यांच्यासमोर निर्माण झाला होता. त्यातून त्यांनी योग्य तो मार्ग काढला. पक्षाच्या तत्वाला त्यांनी तिलांजली दिली नाही. 1954 च्या सुमारास राजस्थान विधानसभेत 'कसेल त्याची जमीन' हे विधेयक येणार होते. संपूर्ण राजस्थानात मोठमोठ्या जमीनदारांचा पगडा होता. त्यामुळे साहजिकच त्यांचा या विधेयकाला विरोध होता. कै.शेखावत यांच्याबरोबर त्यावेळी जनसंघाचे सहा आमदार होते. त्यांनी दबावामुळे या विधेयकाला विरोध करण्याचे ठरविले. त्यांना त्या विचारापासून परावृत्त करण्यासाठी पक्षाने स्व.पंडित दिनदयाळ उपाध्याय यांना राजस्थानमध्ये पाठविले होते. परंतु स्व.पंडित दिनदयाळ उपाध्याय यांना या सहा आमदारांना परावृत्त करण्यात अपयश आले. शेवटी पक्षाने त्या सहा आमदारांना पक्षातून काढून टाकले. कै.भैरोसिंह शेखावत हे असे एक आमदार होते, ज्यांनी जमीनदारांपेक्षा जमिनीवर राबणा-या कष्टकऱ्यांबरोबर बांधिलकी ठेवली आणि पक्षादेश प्रमाण मानला. त्यांनी त्या विधेयकाचे समर्थन केले. त्यावेळेपासून कै.भैरोसिंह शेखावत म्हणजे 'आम आदमी का नेता' असे नेतृत्व तयार झाले. त्यानंतर राजस्थानचे मुख्यमंत्री म्हणून काम करीत असताना त्यांनी राबविलेल्या अंत्योदय योजनेला संपूर्ण देशभरात प्रसिध्दी मिळाली आणि त्यांच्या यशस्वी कारकिर्दीला वेगळी झळाळी प्राप्त झाली. कै.भैरोसिंह शेखावत म्हणजे जनसंघाचा त्या काळचा जबरदस्त असा एक आधार होता. आपल्या जीवनाच्या वाटचालीमध्ये हजारो कार्यकर्ते त्यांनी जोडले. सुदैवाने माझे पक्षाच्या माध्यमातून कै.भैरोसिंह

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

शेखावत यांच्याशी गेली 20 वर्षे संबंध जुळले होते. नुकतीच त्यांना भेटण्याची संधी लाभली होती. सहा महिन्यापूर्वी कॅन्सरवरील एका छोट्या शस्त्रक्रियेसाठी ते मुंबईत आले असताना सह्याद्री अतिथीगृहात त्यांच्याशी दहा मिनिटे भेटण्याची संधी मला प्राप्त झाली होती. कॅन्सरसारखा दुर्धर आजार झालेला असताना जणू काही घडलेच नाही अशा हसतमुख चेहऱ्याने त्यांनी आमच्याशी चर्चा केली. अशा पध्दतीने शेवटपर्यंत पक्षाच्या तत्वाशी कोणतीही तडजोड न करता आपले जीवन समर्पण भावनेने जगणारा नेता आज आपल्यातून निघून गेला आहे. मी त्यांना माझ्या वतीने व पक्षाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करतो.

सभापती महोदय, कै.प्रभाताई राव या आमच्या विदर्भातील कॉंग्रेस पक्षाच्या नेत्या होत्या. वर्धा या विनोबाजींच्या जिल्हयातील रोहणी ग्रामपंचायतीच्या सरपंच ते पक्षाध्यक्ष पदापर्यंत विविध स्तरावर त्यांनी पक्षाचे नेत्वृत्व केले. राजकीय कारकिर्दीची सुरुवात त्यांनी सरपंच पदापासून केली. 27 वर्षे त्या आमदार होत्या. चारवेळा महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात कॅबिनेटमंत्री म्हणून त्यांनी विविध विभागांचा कार्यभार सांभाळला होता. दोनवेळा त्या खासदार म्हणून निवडून आल्या होत्या. अलिकडच्या काळात हिमाचल प्रदेश आणि राजस्थान राज्याच्या राज्यपाल म्हणून त्यांनी कार्यभार सांभाळला होता. 1977 च्या लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत स्व.इंदिराजी गांधी यांना ज्यावेळी पराभव पत्करावा लागला, त्यावेळी अनेक जून्या कार्यकर्त्यांनी पक्षाला रामराम केला. त्या प्रतिकूल परिस्थितीत कै.प्रभाताई राव यांनी इंदिराजी गांधी आणि इंदिरा कॉंग्रेस पक्षाला विदर्भामध्ये भक्कमपणे साथ दिली. त्यामुळे त्यांच्यावर गांधी घराण्याचा वरदहस्त होता. स्व.इंदिराजी गांधी आणि स्व.राजीवजी गांधी यांनी त्यांच्यावर मोठी जबाबदारी सोपविली व ती त्यांनी यशस्वीपणे पार पाडली.

(नंतर श्री.खर्चे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

राजकारणाप्रमाणे विधायक कामात देखील त्यांना खूप रस होता. महिलांचे प्रश्न त्यांनी लावून धरले. महिला हक्काच्या त्या कडव्या पुरस्कर्त्या होत्या. प्रदेशाध्यक्ष म्हणून काम करताना त्यांनी अनेक कठोर निर्णय घेतले. आघाडी सरकारच्या मुख्यमंत्री पदावर जेव्हा राष्ट्रवादी पक्षाने दावा केला तेव्हा प्रभा राव यांनी त्याला ठामपणे विरोध केला व मुख्यमंत्रीपद काँग्रेस पक्षालाच मिळाले पाहिजे असे त्यांनी सोनियाजींना पटवून दिले. त्यामुळेच आज आघाडी सरकारचे मुख्यमंत्रीपद काँग्रेसकडे आहे. प्रभा राव यांच्या निधनाने राज्यातील एक प्रभावी नेतृत्व हरपले आहे.

राजकारणात मूल्याधिष्ठित आचार-विचारांचा प्रभाव रहावा यासाठी अखेरच्या श्वासापर्यंत प्रयत्न करणारे ग.प्र.प्रधान म्हणजे राजकीय दीपस्तंभ होते. प्रगल्भ विचारसरणी, निरलस नि:स्पृह सेवा अशी प्रधान सरांची अनेक गुणवैशिष्ट्ये होती. "साधना" चे संपादक म्हणून त्यांनी सतत 14 वर्षे काम पाहिले. 20 वर्षे प्राध्यापकी केली आणि 18 वर्षे निधानपरिषदेचे सदस्य म्हणून काम पाहिले. राष्ट्रसेवा दलात काम करताना त्यांची वैचारिक जडणघडण झाली. अनेक ग्रंथांचे वाचन करुन त्यांनी राष्ट्रसेवा दलातील अनेक तरुणांना देशासाठी निरलस सेवा करण्याची प्रेरणा दिली. सर्व जबाबदाऱ्या सांभाळत असताना "साठा उत्तराची कहाणी" "भाकरी आणि स्वातंत्र्य" "स्वातंत्र्य संग्रामाचे महाभारत" असे महत्वपूर्ण लेखनही त्यांनी केले. स्वातंत्र्यलढा, गोवामुक्ती संग्राम, संयुक्त महाराष्ट्राचा लढा, आणिबाणीविरुध्दचा लढा आदी प्रत्येक चळवळीत त्यांनी सक्रीय सहभाग घेतला. मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराच्या संघर्षातही ते तुरुंगात गेले होते. विधानपरिषद विरोधी पक्षनेता म्हणून त्यांनी काम केले, अशा या त्यागी, निरलस व तत्वनिष्ठ नेत्याचे निधन झाल्याने आपण राजकारणातील एक थोर तपस्वी गमावला आहे.

नरेंद्र महिपती तिडके हे सुध्दा विदर्भातील नेते होते. त्यांनी राज्याच्या राजकारणात अनेक वर्षे काम करीत असताना आपला ठसा उमटविलेला आहे. ओबीसीचे नेते तसेच कामगार चळवळीत काम करणारा विदर्भातील एक नेता म्हणून ते प्रख्यात होते. स्वत: कामगार चळवळीत काम करता करता विविध क्षेत्रातील कामगारांना संघटित करुन विदर्भात कामगार क्षेत्रात त्यांनी आपला ठसा उमटविलेला होता. त्याचप्रमाणे प्रभाकर दस्तुरकर, पद्माकर पाटील, ताबजीभाई सोळंकी, विनोदकुमार गुप्ता, केशवराव राणे या इतरही माजी विधानपरिषद सदस्यांचे गत कालावधीत निधन झाले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग पाटील .....

उपरोक्त नेत्यांपैकी विनोदकुमार गुप्ता यांच्याशी माझा जवळून संबंध आला आहे. ज्यावेळेस सन 1975 मध्ये या देशात आणिबाणीची परिस्थिती आली होती त्या काळात अनेक लोकांना तुरुंगात डांबले गेले. त्यामध्ये कै. विनोदकुमार गुप्ता हे सुध्दा होते. योगायोगाने विनोदकुमार गुप्ता आणि मी एकाच तुरुंगात होतो. त्या काळात ठाण्याच्या कारागृहात विनोदजींच्या सहवासात राहण्याची संधी मला मिळाली होती. विनोदकुमार गुप्ता हे सामाजिक क्षेत्रात तसेच अनेक क्षेत्रात काम करीत होते. विश्व हिंदू परिषदेचे पदाधिकारी म्हणून ते होतेच नंतर जनता पक्षाचा या देशात जन्म झाला तेव्हाही ते जनता पक्षाचे कोषाध्यक्ष होते. त्यानंतर भारतीय जनता पक्षात रुपांतर झाल्यानंतर त्या पक्षाचे कोषाध्यक्षपद सुध्दा विनोदजी यांनीच भुषविले होते. त्यांनी "शालीमार" नावाची एक संघटना त्या काळात काढली होती आणि वेश्या व्यवसाय करणाऱ्या तरुण मुलींना वेश्याच्या अड्डयावरुन बाहेर आणून घरपोच करण्याचा तसेच त्यांना सन्मानाने व स्वाभिमानाने उभे करण्याचाही त्यांनी प्रयत्न केला. "गोवंश" अबाधित राहिला पाहिजे म्हणून अनेक ठिकाणी त्यांनी गोशाळा काढल्या अशा प्रकारचा समाजसुधारक आपल्यातून निघून गेलेला आहे. या सर्वांना माझ्या पक्षाच्या वतीने आदरांजली वाहतो आणि माननीय मुख्यमंत्र्यांनी जो ठराव आणलेला आहे त्याचे समर्थन करुन माझे दोन शब्द पूर्ण करतो.

यानंतर श्री. जुन्नरे ....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखी नोंदी

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सन्माननीय सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय मुख्यमंत्री महोदयांनी जो शोकप्रस्ताव मांडलेला आहे त्यास समर्थन देण्यासाठी मी उभा आहे. कै. भैरोसिंह शेखावत यांनी भारताचे उपराष्ट्रपती पद चांगल्या पध्दतीने भूषवले होते. भारतीय जनसंघाचे आणि नंतर भारतीय जनता पक्षाचे आधारस्तंभ म्हणून त्यांनी काम केले होते. राजस्थानातील जनसामान्यांचे आणि प्रचंड लोकांचे पाठबळ असलेले नेतृत्व आज काळाच्या आड गेलेले आहे. कै. भैरोसिंह शेखावत हे भारतीय जनता पक्षाचे असतांना सुध्दा त्यांनी राज्यसभेचे सभापती व लोकसभेचे उपाध्यक्ष पद भूषवले होते. आजपर्यंत प्रथा परंपरेप्रमाणे विरोधी पक्षाकडे उपाध्यक्ष आणि उपसभापती पद असते व त्याप्रमाणे कै. भैरोसिंह शेखावत यांना उपराष्ट्रपती पद प्राप्त झाले आणि त्यांनी हे पद अत्यंत गौरवशलीपणाने भूषवले होते. या ठिकाणी माननीय मुख्यमंत्री महोदयांनी जो शोकप्रस्ताव मांडलेला आहे त्यासंदर्भात मला असे सूचवावयाचे आहे की, दुय्यम पदावर पोहचण्याचा सन्मान लोकशाहीने विरोधी पक्षाला दिलेला आहे त्या प्रथेचा विचार मा. मुख्यमंत्री महोदयांनी करावा अशी विनंती आहे. मी माननीय मुख्यमंत्रीमहोदयांना विनंती करतो की, कै.भैरोसिंह शेखावत यांना श्रध्दांजली वाहत असतांना लोकशाहीची प्रथा परंपरा महाराष्ट्रात सुरु केली तर लोकशाहीचा आदर होईल व कै.भैरोसिंह शेखावत यांना ख-या अर्थाने श्रध्दांजली वाहिल्या सारखे होईल. त्यामुळे मी कै. भैरोसिंह शेखावत यांना अत्यंत नम्रपणे श्रध्दांजली वाहतो.

कै. प्रभा आंनद राव हे महाराष्ट्रातील जनतेला मान्य असलेले जबरदस्त असे व्यक्तिमत्व होते. मी मंत्री होतो त्यावेळेस एकदा वर्धा जिल्हयाच्या दौ-यावर होतो त्यावेळेस त्या माझ्या दौ-यामध्ये सामील झाल्या होत्या. शिवशाही राज्यातील मंत्री आलेला असतांना सुध्दा त्या माझ्या कार्यक्रमात सहभागी झाल्या होत्या व त्यामुळेच त्यांचा आणि माझा थेट परिचय झाला होता. त्या नेहमी मायेने, आपुलकीने बोलत असत परंतु राजकारणात त्या तेवढयाच कणखरपणे बोलत असत. त्या महाराष्ट्राच्या काँग्रेसच्या अध्यक्षपदी असतांना त्यांनी त्यांचा कणखरपणा दाखवून दिलेला आहे. महाराष्ट्र काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षा झाल्यानंतर त्यांचे नाव संपूर्ण महाराष्ट्राला जास्त परिचित झाले. कारण मंत्री पदाचे कार्य हे त्या त्या विभागापुरते असते परंतु एखाद्या पक्षाचे नेतृत्व करीत असतांना

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

त्यांचे लक्ष सर्व पक्षाकडे जात असते. कै. प्रभा राव यांनी त्यांच्या कारकिर्दीत काँग्रेसला एकदा सत्ता जिंकून दिली होती. परंतु खंबीर महिलाचे नेतृत्व काँग्रेस पक्षाला सोसले नाही त्यामुळे त्यांची हिमाचल प्रदेशच्या राज्यपालपदी तसेच राजस्थानच्या राज्यपाल पदी नियुक्ती करण्यात आली. कै. प्रभा राव यांचा गांधी घराण्याशी चांगला संबंध होता. कै. प्रभा राव हया राज्यपाल पदी असतांना त्या जग सोडून गेल्या. त्यांनी त्यांच्या शेवटच्या काळात सुध्दा कधीही आळस केला नाही. त्यांनी संपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढला होता अशा कै. प्रभा राव आज आपल्यातून निघून गेलेल्या आहेत. त्यांनी आपल्या भाच्यावर चांगले संस्कार घडवलेले आहेत. सन्माननीय मंत्रीमहोदय श्री. रणजित कांबळे हे कै.प्रभा राव यांचे भाचे आहेत. श्री. रणजित कांबळे यांचे पूर्ण शिक्षण परदेशात झालेले असतांना देखील ते या सदनात परदेशात शिकल्याची छाप न दाखवता मराठीतूनच सर्व माहिती देत असतात. माहिती देत असतांना चुकले तरी सुध्दा ते मराठीतूनच सर्व माहिती या सदनाला देत असतात. त्यामुळे कै. प्रभा राव यांनी भाच्याला चांगल्या प्रकारे घडविल्याबद्दल मी कै.प्रभा राव यांना विनम्र श्रध्दांजली वाहतो.

सभापती महोदय, आम्ही जेव्हा शाळेत जात होतो तेव्हा कै. नरेंद्र तिडके हे काँग्रेस पक्षाचे नेते होते. 1952 मध्ये ते मध्यप्रदेशात होते त्यानंतर ते महाराष्ट्रात आले. कै. नरेंद्र तिडके 1980 मध्ये विधान परिषदेवर निवडून आले होते. कणखर नेतृत्वाला काँग्रेस कधीही बाजूला ठेवत नाही अशी चांगली पंरपरा काँग्रेस पक्षात आहे. 1972 च्या निवडणुकीत त्यांचा पराभव झाल्यानंतर त्यांना विधानपरिषदेमध्ये काँग्रेस पक्षाने स्थान दिले होते. ज्याचे कर्तृत्व चांगले असते अशा व्यक्तीस पक्षाला सांभाळावेच लागत असते कारण कर्तृत्वाला मोल हे असतेच.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

त्यावेळचे ते सुज्ञ कामगार नेते होते. कामगारांना भरीस न पाडता, कामगारांना बेकार न करता, कामगारांसाठी योग्य लढा देणारा नेता म्हणून श्री.तिडके यांच्याकडे पाहिले जात होते. जुन्या मातोश्रीवर श्री.नरेंद्र तिडके भेटायला यायचे हे मला आठवते. त्यावेळी अनेक नेते यायचे. त्यांना मी पाहिल्याचे मला आठवते. त्यांच्याशी शिवसेनाप्रमुख संवाद साधायचे. त्यावेळी आम्ही त्यांना पहायचो. एक कामगार नेते म्हणून ते तेथे यायचे. माथाडी कामगार कायदा हा त्यांच्या काळात झाला हे फार मोठे गौरवास्पद आहे. ज्यांना आपण हमाल म्हणायचो तो माथाडी झाला. त्याला कामगार म्हणून सन्मान मिळाला. हा सन्मान त्यांच्या काळात झाला आहे. त्यांच्या जीवनातील फार मोठे काम त्यांनी माथाडी कामगारांसाठी केले आहे. रात्रंदिवस राबणाऱ्यांसाठी हे काम त्यांनी केले आहे. अशा प्रकारे श्री.नरेंद्र तिडके हे महाराष्ट्रामध्ये ठसा उमटवून गेलेले आहेत.

श्री.प्रभाकर गंगाराम दस्तुरकर सर हे आमच्या मराठवाड्यातील नांदेडमधील. ते नेहमी माझ्याकडे यायचे. बसायचे. बोलायचे. एक टर्मच ते या सदनाचे सदस्य होते. शिक्षकांची बलाढ्य अशी संघटना ते चालवायचे. मराठवाड्यातील शिक्षकांमध्ये त्यांचा प्रचंड दबदबा होता. पण का कोण जाणे ते दुसऱ्या टर्मच्या निवडणुकीच्या वेळी ते पडले. त्या निवडणुकीत मी सक्रीय होतो. त्या निवडणुकीत त्यांच्या प्रबळ असलेल्या पक्षात फूट पडली. त्यामुळे ते पराभूत झाले. त्यानंतर श्री.दस्तुरकर अत्यंत फ्रस्टेशनमध्ये होते. शेवटी-शेवटी श्री.दरस्तूरकर मला जाहीरपणे सांगायचे की, मला जगण्याची इच्छा नाही. ते मला सांगायचे माझे काही राहिले नाही, मला जगायची इच्छा नाही. मराठवाड्यातील शिक्षकांकरिता फार मोठे कार्य त्यांनी केले आहे. मला खात्री आहे की, मराठवाड्यातील सर्व शिक्षकांना आज श्री.दस्तुरकर सरांची आठवण येत असेल. एवढे काम त्यांनी त्या संघटनेमध्ये केले आहे. श्री.दस्तुरकर गेल्यामुळे मला मनापासून वाईट वाटले. कारण ते नेहमी मला भेटायचे. बोलायचे आणि मन मोकळे करायचे.

श्री.पद्माकर मल्लिकार्जून पाटील हे श्री.दस्तुरकरांच्या जागी निवडून आले. संघटनेच्या फुटीमुळे एक शिक्षक प्रतिनिधी पडला व दुसरा प्रतिनिधी म्हणून निवडून आला. ते ही आता कालवश झाले आहेत. ते सतत शिक्षकांमध्ये फिरत असायचे. दस्तुरकरांना पर्यायी कोण तर श्री.पद्माकर पाटील. पण आज ते देखील आपल्यामध्ये राहिले नाहीत. त्यांच्या दु:खद निधनानिमित्त मी शोक व्यक्त करतो. 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

श्री.ताबजीभाई सोळंकी हे आमच्या मुंबई महानगरपालिकेत होते. त्यांच्या कार्याचा ठसा तेथे होता. मुंबई महानगर पालिकेतील चतुर्थ श्रेणी कामगारांचे नेतृत्त्व श्री.ताबजीभाई सोळंकी यांनी केले. श्री.शरद राव पेक्षा श्री.ताबजीभाई सोळंकींना चतुर्थ श्रेणी कामगार मानायचे. उंचीने बुटके, वर्णाने काळे, गोल चेहऱ्याचे. लेंगा आणि शर्ट असा त्यांचा पेहराव असायचा. ते गोरगरिबांकरिता राबायचे. ते नगरसेवक देखील होते. आमच्या काळात देखील ते महानगरपालिकेत यायचे. त्यांच्याकडे सदैव चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांच्या समस्यांसंबंधातील कागद असायचा. बाकी त्यांना कशाचे देणे, घेणे नसायचे. श्री.ताबजीभाई सोळंकी यांनी केलेल्या सामाजिक कार्याची नोंद घेऊन त्यांना 'दलितमित्र', 'हरिजन मित्र' या पुरस्काराने गौरविण्यात आले. आजही माझ्या डोळ्यासमोर त्यांची बटुवामन मूर्ती येते. सातत्याने कामगार, गोरगरीब, सर्वसामान्य यांच्याकरिता कार्य करणारे श्री.ताबजीभाई सोळंकी मला आठवत आहे. ते देखील आपल्यातून आज निघून गेले आहेत. त्यांच्या दु:खद निधनानिमित्त मी शोक व्यक्त करतो.

श्री.विनोदकुमार गुप्ता यांचे देखील दु:खद निधन झाले आहे. प्रा.ग.प्र.प्रधान यांचे कामकाज आम्ही पाहिले नाही. पण त्यांचे काम ऐकून आहोत. आमचा त्यांच्याशी परिचय झाला नसला तरी त्यांच्या कार्याचा परिचय सतत ऐकायला मिळतो. काहीही घडले तरी सदनामध्ये श्री.ग.प्र.प्रधान यांची आठवण कळत नकळत काढली जाते. सभागृहाच्या बाहेर जरी आम्ही बसलो असलो आणि आगळी-वेगळी घटना घडली की, श्री.ग.प्र.प्रधानांची आठवण काढली जात असे. मी आयुष्यात एकदाच राजदंड उचलला. पुन्हा राजदंड उचलणार नाही. मी चूक केली. मी राजदंड उचलल्यानंतर किती जणांनी राजदंड उचलला यासंबंधीची माहिती घेतली. त्यावेळी श्री.ग.प्र.प्रधान यांनी राजदंड उचलल्याचे मला कळले. ग.प्र.प्रधान सरांनी राजदंड उचलला याचा अर्थ विरोधी पक्षातील सदस्याची टोकाची भावना होती. त्यामागे राजदंडाचा अवमान करण्याची भाषा नसते. काहीच इलाज राहिला नसल्यामुळे राजदंड उचलून हे कामकाज थांबवावे असे सांगतो. ही त्या मागची भावना असते. राजदंड उचलल्याचे माझ्या मनाला खूप लागले होते. पण प्रधान सरांनी राजदंड उचलला आहे असे समजल्यानंतर टोकाची भावना निर्माण होते हे माझ्या लक्षात आले. त्यावेळी सज्जनातील सज्जन व्यक्ती देखील त्या टोकापर्यंत जाऊ शकते हे माझ्या निदर्शनास आले.

यानंतर श्री.अजित....

अशुद्धलिखित प्रत / शीघ्रलेखी नोंदी

श्री.दिवाकर रावते..

प्रा.ग.प्र.प्रधान यांच्याबद्दल बोलण्यासारखे भरपूर आहे. या सभागृहातील ज्येष्ठ सन्माननीय सदस्य त्यांच्याबद्दल खूप काही बोलू शकतील. ज्येष्ठ सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी त्यांची पूर्ण कारकीर्द पाहिलेली आहे. प्रा.ग.प्र.प्रधान यांनी विरोधी पक्ष नेते पद संयमाने आणि तेवढ्याच कणखरपणे भूषविले. सरकारवर मृदू शब्दात कसे घाव घालावेत हे त्यांच्या भाषणातून दिसून येते. तसे घाव आम्हाला घालता येतील असे वाटत नाही. प्रा.ग.प्र.प्रधान हे साहित्यिक होतेच. परंतु त्यांनी या विधिमंडळात त्यांनी एक वेगळा ठसा उमटविला आहे. प्रा.प्रधान हे पदवीधर मतदारसंघातून निवडून येत असत. त्यांची एक निवडणूक पाहिली आहे. त्यावेळच्या जनसंघामधून ते निवडणूक लढवायचे त्यावेळी आम्ही त्यांना मदत करीत असायचो. प्रा.प्रधान हे ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी होते, व्रतस्थ होते. त्यांच्या निधनाने आपण विधिमंडळातील एक आदर्श गमावला आहे.

कै.केशवराव व्यंकटेश राणे हे सिंधूदुर्ग जिल्ह्यातील असून ते दोन वेळा विधानसभेवर निवडून आले होते तर एकदा विधानपरिषदेवर निर्वाचित झाले होते. त्यांचे दिनांक 20 जून 2010 रोजी दु:खद निधन झाले.

माननीय मुख्यमंत्री महोदयांनी मांडलेल्या प्रस्तावाला मी अनुमोदन देऊन सर्व दिवंगत सन्माननीय सदस्यांना आदरांजली अर्पण करुन माझे दोन शब्द पूर्ण करतो.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख (अमरावती विभाग पदवीधर) : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री महोदयांनी जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर माझ्या सहभावना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

कै.भैरोसिंह शेखावत हे एका राष्ट्रीय पक्षाचे राष्ट्रीय नेते होते. भारताचे उपराष्ट्रपती होते. एक प्रदीर्घ अशी संसदीय कारकीर्द लाभलेले ते एक ज्येष्ठ नेते होते. सन 1952 पासून, 1972 ते 1977 हा अपवाद वगळता 2002 पर्यंत ते राजस्थान विधानसभा सदस्य म्हणून कार्यरत होते. या काळात त्यांनी तीन वेळा राजस्थानचे मुख्यमंत्री व तीन वेळा विधानसभेतील विरोधी पक्षनेते म्हणून काम केले. त्यांनी राज्यसभेचे सदस्य म्हणून काम केले. त्यांनी उपराष्ट्रपती म्हणून विशेषत: राज्यसभेचे सभापती म्हणून अतिशय चांगले काम केले हे आपण सर्वांनी पाहिले आहे. पक्षाभिनिवेष बाजूला ठेवून सर्व स्तरातील लोकांशी संपर्क ठेवण्यामध्ये हातखंडा असलेल्या राष्ट्रीय पातळीवरील व्यक्तींमध्ये त्यांचा समावेश होता.

श्रीमती प्रभा राव यांच्या दु:ख निधनाने विदर्भ, महाराष्ट्र तसेच देशाचे नुकसान झाले आहे. अनेकांना कदाचित माहीत नसेल की, श्रीमती प्रभा राव या महाविद्यालयीन जीवनामध्ये उत्तम अशा खेळाडू होत्या. त्या आतंरपीठ स्पर्धांमध्ये विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व करीत असत. त्यांना प्रदीर्घ अशी संसदीय कारकीर्द लाभली. सतत चारवेळा त्या विधानसभेवर निवडून आल्या. त्या विधानपरिषदेच्या सदस्य होत्या तसेच त्या लोकसभेच्या सदस्य देखील होत्या. विधानसभेत त्यांनी विरोधी पक्ष नेता म्हणून देखील काम केले. त्यांचे वैशिष्टय असे की, विदर्भाच्या, महिलांच्या प्रश्नांबाबत त्या सातत्याने जागरुक असायच्या. त्यांनी अनेक खात्यांची मंत्रिपदे भूषविली. विशेषत: शिक्षणमंत्री असताना त्यांच्या प्रश्न सोडविण्याच्या रितीमुळे त्यांचा आणि माझा परिचय झाला.

विदर्भातील आणखी एक ज्येष्ठ नेते कै.नरेंद्र तिडके. कामगार चळवळीतून आयुष्याला सुरुवात केलेला मनुष्य इतका मृदू असू शकतो यावर कोणी विश्वासू ठेवू शकणार नाही. कारण प्रत्येक चळवळीचा एक साचा असतो. कामगार चळवळीच्या साचाशी विपरित नरेंद्र तिडके यांचे वर्तन होते. मी सभागृहात असे ऐकलेले आहे की, प्रा.एन.डी.पाटील हे संसदीय कामकाज मंत्री म्हणून काम करीत असताना त्यांनी मुख्यमंत्र्यांना विनंती केली होती की, आपण कोणालाही आमच्याकडे पाठवा परंतु श्री.नरेंद्र तिडके यांना आमच्याकडे पाठवू नका. कारण त्यांना पाठविले की, ते आम्हाला कन्व्हीन्स करणार." इतका त्यांचा स्वभाव मृदू होता.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख ...

परंतु ते आपल्या विचारावर ठाम असावयाचे. विचाराच्या बाबतीत ठामपणा हा त्यांचा महत्वाचा गुणविशेष मी या सभागृहात सदस्य म्हणून पाहिलेला आहे तसेच मंत्री म्हणून त्यांच्या कारकिर्दीतही पाहिलेला आहे. कामगार मंत्री या नात्याने दोन अतिशय महत्वाच्या कायद्याचे पौरोहित्य करण्याची संधी त्यांना मिळाली होती याचा अनेकदा कै. न.म.तिडके उल्लेख करीत असावयाचे त्याचबरोबर आम्ही देखील उल्लेख करीत असावयाचो. माथाडी कामगारांच्या संदर्भातील कायदा आणि रोजगार हमी योजनेचा कायदा असे दोन्हीही कायदे घडवून आणण्यामध्ये महाराष्ट्रातील अनेक नेत्यांचा सहभाग असला तरी त्याचे पौरोहित्य कामगार मंत्री म्हणून कै. न.म.तिडके यांनी केले होते.

सभापती महोदय, या सभागृहात काम केलेले मराठवाडयातील ज्येष्ठ शिक्षक नेते कै. पी.जी.दस्तुरकर यांचे दु:खद निधन झाले आहे ते आमचे सभागृहातील सहकारी होते सुरुवातीच्या काळात मराठवाडयाच्या शिक्षक चळवळीमध्ये त्यांनी मोठे काम केले आणि शेवटपर्यंत ते या चळवळीमध्ये काम करीत राहिले.शिक्षक मतदार संघ हा फक्त शिक्षकाचा असतो आणि मतदारसुध्दा शिक्षकच असतात त्यामुळे शिक्षकांच्या प्रश्नापुरताच आपला सहभाग मर्यादित ठेवावा असा विचार काही लोक मांडतात आणि काही प्रतिनिधी त्याचे उत्तमरीतीने आचरणही करतात. परंतु सामाजिक प्रश्नामध्येही आपला सहभाग असला पाहिजे याची तीव्र जाणीव असलेल्या अतिशय मोजक्या शिक्षक नेत्यामध्ये कै. पी.जी.दस्तुरकर यांचा समावेश होतो असे माझे स्वत:चेही मत आहे आणि या सभागृहातील त्यांचे काम त्यासंबंधीचे पुरावे आहेत.

सभापती महोदय, या सभागृहामध्ये नांदेड विद्यापीठाच्या संदर्भातील पहिला ठराव कै. पी.जी. दस्तुरकर यांनी मांडला होता . त्याचबरोबर अंधश्रध्दा निर्मूलनासबंधीचे विधेयक या सभागृहामध्ये कै.पी.जी.दस्तुरकर यांनी मांडले होते. त्यावेळी हे विधेयक मंजूर झाले होते आणि चांगल्या प्रकारची आश्वासने त्यावेळी त्यांना सभागृहात देण्यात आली होती. भारतीय संविधानातील 371(2) कलमाची व्यवस्था महाराष्ट्रात स्थापित व्हावी यासाठी अनेक जणांनी आग्रह धरला होता पण मराठवाडयातील ज्येष्ठ नेते कै. गोविंदभाई श्रॉफ यांना त्या कामात शेवटचा घाव घालण्याची संधी "मराठवाडा विकास परिषदेच्या" निमित्ताने मिळाली होती. कै.पी.जी.दस्तुरकर हे

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख ...

मराठवाडा विकास परिषदेचे निष्ठावान कार्यकर्ते होते असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.त्याचबरोबर ब्रॉडगेज रेल्वे लाईनच्या प्रश्नाच्या संदर्भात मराठवाडयात अनेक आंदोलने करण्यामध्ये सुध्दा त्यांचा सहभाग होता. सुरुवातीच्या काळात मराठवाडा आणि विदर्भ मिळून शिक्षकांचा एकच मतदारसंघ होता. अशा प्रकारे हा मतदारसंघ एकत्र होता 13-14 जिल्हे त्या मतदारसंघामध्ये होते मराठवाडयाच्या अस्मितेकडे लक्ष दिले जात नव्हते त्यामुळे तो वेगळा झाला पाहिजे यासाठी त्यावेळी ज्या लोकांनी पुढाकार घेंऊन काम केले होते त्यामध्ये कै.पी.जी. दस्तुरकराचा मोठा सहभाग होता. त्याचबरोबर अनेक सामाजिक कामामध्येसुध्दा त्यांचा सहभाग होता. मराठवाडयात भूकंप झाल्यानंतर कै. पी.जी.दस्तुरकर जोपर्यंत या सभागृहात सदस्य म्हणून होते तोपर्यंत भूकंपाच्या बाबतीत त्यांनी प्रश्न मांडले नाहीत असे एकही अधिवेशन गेले नाही.भूकंपाच्या बाबतीत काय काय उपाययोजना केल्या पाहिजेत . कोणकोणत्या पक्ष्यांना प्रथम भूकंपाची चाहूल लागते येथपर्यंतची बारकावे ते सांगत होते त्याचबरोबर कोण कोणती यंत्रे बसविली पाहिजेत याही बाबतीत ते सातत्याने सांगत होते .भूकंपाच्या संदर्भात त्यांच्या इतकी उठाठेव या सभागृहात दुसरी कोणी केली असेल असे मला वाटत नाही.

कै.प.म.पाटील यांचे सुध्दा दु:खद निधन झालेले आहे ते सुध्दा शिक्षक चळवळीतील नेते होते. सीपीआयएम या पक्षात ते कार्य करीत होते. त्याचबरोबर शिक्षक चळवळीमध्येसुध्दा ते काम करीत होते. त्या भागात या लोकांनी शिक्षक चळवळ किती मजबूत केली होती याचे मी या ठिकाणी एक उदाहरण देऊ इच्छितो. कै.पी.जी.दस्तुरकर आणि कै. प.म.पाटील यांच्यामध्ये मतभेद झ ाल्यानंतर दुस-या वेळी कै.पी.जी.दस्तुरकर निवडणुकीस उभे राहिले होते कै. पी.जी.दस्तुरकर हे संघटनेचे अध्यक्ष होते आणि कै.प.म.पाटील संघटनेचे सचिव होते . पहिल्या नंबरवर कै. प.म.पाटील होते आणि दुस-या नंबरवर कै. पी.जी.दस्तुरकर होते. दोघांमध्ये 100- 200 मतांचा फरक होता. त्यावेळी कै..प.म.पाटील निवडून आले होते. त्यांची जी राजकीय विचारसरणी होती त्यामुळे शिक्षकांच्या प्रश्नाबरोबरच इतर सामाजिक प्रश्नाच्या बाबतीतसुध्दा त्यांनी चांगला सहभाग घेतला होता.

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख ...

कै.ग.प्र.प्रधान यांचे दु:खद निधन झाले असून त्याबद्ल या ठिकाणी शोक प्रस्ताव मांडण्यात आला आहे. त्यांच्याबद्दल काय बोलावे अशी परिस्थिती आहे. अत्यंत सात्विक भाव त्यांच्या चेह-यातून सतत पाझरत असत. विरोधी पक्ष नेते म्हणून जरी त्यांनी काम केले असले तरी चेह-यावरील हे भाव त्यांना बदलता आला नाही . तसेच त्यांचे वागणे देखील त्यांना बदलता आले नाही. समाजवादी चळवळीतील निष्ठावान आणि विचाराने अत्यंत ठाम असलेले ते एक नेते होते.

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी. देशमुख...

पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयामध्ये इंग्रजी विषयातील निष्णात असे प्राध्यापक होते. या सभागृहामध्ये मला त्यांचा जितका सहवास मिळाला नाही तितका सहवास मी या सभागृहामध्ये येण्यापूर्वी शिक्षक चळवळीतील त्यांच्या कामामुळे मला मिळाला. ते इंग्रजीचे उत्तम प्राध्यापक होते असे त्यांचे सांगण्यासारखे वैशिष्टय आहे. त्याचप्रमाणे जवळ जवळ 18 वर्षे ते या सभागृहाचे सदस्य होते, थोर स्वातंत्र्यसेनानी होते. समाजवादाच्या विचारांवर शेवटपर्यंत अढळ निष्ठा ठेवणारा दुर्मीळ नेता म्हणून प्रा. ग.प्र. प्रधानांचा उल्लेख करावा लागेल. त्यांनी विपुल लिखाण केले, त्यांची लिखाणाची भाषा अतिशय उत्तम, ओघवती व सहज समजणारी असल्याचे आपल्याला दिसून येईल. ते नेहमी आपल्या विचारांवर ठाम असायचे. त्यांच्या आत्मचरित्रामध्ये लिहिलेला एक प्रसंग मला या निमित्ताने आठवतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव मराठवाडा विद्यापीठाला द्यावे असा दोन्ही सभागृहानी एकमताने संमत केलेला ठराव अंमलात येऊ शकला नाही. एखाद्या गोष्टीला तुम्ही पाठिंबा दिल्यानंतर जर ती गोष्ट अंमलात आली नाही तर लोक स्वाभाविकपणे म्हणतात की, तुम्ही काय करता? या संदर्भात मराठवाडा विभागामधील काही लोकांनी ग.प्र. प्रधानांवर टिका केली की, तुम्ही हा ठराव कां मांडीत नाही? त्यानंतर प्रा. ग. प्र.प्रधानांनी 1983-84 मध्ये तो ठराव या सभागृहामध्ये पुन्हा मांडला. तत्कालीन माननीय मुख्यमंत्र्यांचा तो ठराव मंजूर करावयास विरोध होता. ज्यावेळी तो ठराव सभागृहामध्ये चर्चेला आला, त्यावेळी माननीय श्री. दादासाहेब गवई हे या सभागृहाचे ज्येष्ठ सदस्य होते. त्यांनी जाहीरपणे आपल्या भाषणामधून प्रा. ग. प्र. प्रधानांना विनंती केली की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव मराठवाडा विद्यापीठाला देण्यासंबंधी या सभागृहामध्ये एकदा ठराव मंजूर झालेला असतांना आपण दुसऱ्यांदा हा ठराव कां मांडीत आहात? या ठरावाला सत्ताधारी पक्षाकडून विरोध आहे. हा ठराव नामंजूर होणे योग्य होणार नाही. त्यामुळे प्रा. ग.प्र. प्रधानांनी हा ठराव मागे घ्यावा अशी विनंती दादासाहेब गवई यांनी या सभागृहामध्ये केली. त्यावेळी प्रा.ग.प्र. प्रधानांनी या सभागृहामध्ये केलेल्या भाषणामध्ये असे विचार मांडले की, ठराव मागे घेणे ही गोष्ट आता उचित होणार नाही. त्यावेळी माननीय श्री. दादासाहेब गवई आपल्या आसनावरुन उठून खाली "वेल"मध्ये बसले आणि म्हणाले की, आपण हा ठराव मागे घेणार नसाल तर मी खाली बसून सत्याग्रह सुरु करीन. अशाप्रकारची आग्रहाची भूमिका माननीय श्री. दादासाहेब गवई यांनी घेतली. प्रा. ग.प्र. प्रधानांनी त्या ठरावावरील उत्तराचे भाषण करीत असतांना असे सांगितले की,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ KTG/

प्रा. बी. टी. देशमुख....

"विचारांवर ठाम श्रध्दा हा माझ्या जीवनाचा स्थायिभाव आहे, मी विचारपूर्वक हा ठराव मांडलेला आहे, माननीय श्री. गवई यांचा आग्रह हा माझ्या मनाला भेदून जाणारा असला तरी मला हा ठराव मागे घेता येणार नाही. सभापती महोदय, माझ्या या ठरावावर सभागृहाने निर्णय घ्यावा." खरे म्हणजे त्या दोघांचे वैयक्तिक संबंध स्नेहाचे होते . प्रा. ग. प्र. प्रधान हे आपल्या विचारांवर किती ठाम असत हे या सभागृहाच्या कार्यवृत्तामध्ये नोंदविण्यात आलेले एक उदाहरण म्हणून या ठिकाणी सांगण्याचा मोह मला आवरता आलेला नाही. अशाप्रकारची माणसे दुर्मीळ झालेली आहेत. ती विचारांवर ठाम राहून आपले राजकीय जीवन जगत आहेत. त्यांना मी मनापासून श्रध्दांजली अर्पण करतो.

सभापती महोदय, त्याचप्रमाणे या सभागृहाचे माननीय सदस्य कै.श्री. ताबजीभाई सोळंकी कै. श्री. विनोद गुप्ता, कै. श्री. केशवराव राणे यांच्याही बाबतीत मी सदभावना व्यक्त करुन माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री श्री. अशोक चव्हाण साहेबांनी या सदनामध्ये मांडलेल्या शोकप्रस्तावावर माझ्या सहवेदना व्यक्त करण्यासाठी मी याठिक्राणी उभा आहे.

सभापती महोदय, श्री. भैरोसिंह शेखावत, माजी उप राष्ट्रपती, श्रीमती प्रभा आनंद राव, माजी वि.प.स., मंत्री व माननीय राज्यपाल, श्री. नरेंद्र महिपती तिडके, माजी वि.प.स. व मंत्री, सर्वश्री प्रभाकर गंगाराम दस्तुरकर, पद्माकर मल्लिकार्जून पाटील, ताबजीभाई मांडाभाई सोळंकी, विनोदकुमार छाजुराम गुप्ता, प्रा. ग. प्र. प्रधान, केशवराव व्यंकटेश राणे, माजी वि.प.स.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे...

यांच्या दु:खद निधनाबद्दल सभागृहामध्ये शोकप्रस्ताव मांडण्यात आला आहे. या सर्वच सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या कालावधीमध्ये या सदनामध्ये अत्यंत चांगल्या पध्दतीने काम केलेले आहे.

सभापती महोदय, श्रीमती प्रभा राव यांचे दु:खद निधन झालेले आहे. त्यांनी ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, सहकारी क्षेत्रातील बँकां,कृषि विद्यापीठ तसेच महाराष्ट्र समाज कल्याण मंडळाच्या सदस्या अशी अनेकविध प्रकारची पदे त्यांच्या कालावधीमध्ये भूषविलेली आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावरील महिला परिषदेमध्ये त्यांनी भारताचे नेतृत्व केले. श्रीमती प्रभा राव यांचा या राज्यातच नाही तर देशामध्येसुध्दा नावलौकीक आहे. विशेषत: अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या महासचिव असताना त्यांनी अनेक राज्यांमध्ये संघटन मजबूत करण्याच्या दृष्टिकोनातून पाऊले टाकलेली आहेत तसेच कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केलेले आहे. आजही त्या ठिकाणचे कार्यकर्ते आणि नेते त्यांचे नांव घेतात. अत्यंत चागल्या पध्दतीने काम करणाऱ्या श्रीमती प्रभा राव या आमच्या राज्याच्या प्रभारी नेत्या होत्या असे सांगतात. त्यांनी अत्यंत चांगल्या पध्दतीने देशामध्ये काम केलेले आहे. त्यांच्या कामाच्या संदर्भात आपल्या सर्वांना माहीत आहे. या राज्यामध्ये पक्षाचे नेतृत्व करीत असताना अत्यंत चांगल्या पध्दतीने संघटन बांधण्याचे काम श्रीमती प्रभा राव यांनी केलेले आहे. त्यांनी त्यांच्या कालावधीमध्ये पक्षाला शिस्त लावण्याचे काम केलेले आहे. पक्षाला विजय मिळवून देण्याच्या दृष्टिकोनातूनसुध्दा श्रीमती प्रभा राव यांचा सिंहाचा वाटा होता. त्या अत्यंत कार्यकुशल होत्या. जी जबाबदारी त्यांच्यावर टाकण्यात आली ती अत्यंत कणखरपणे पार पाडण्याचे धाडस त्यांच्यामध्ये होते. शासनामध्ये त्या ज्या खात्याच्या मंत्री राहिल्या त्या खात्यामध्ये सुध्दा त्यांनी आपली छाप पाडली आणि त्यांचा नावलौकीक संपूर्ण राज्यामध्ये झाला. त्या चार वेळा विधानसभेमध्ये निवडून गेल्या तसेच लोकसभेमध्येसुध्दा त्या दोन वेळा निवडून गेल्या. अशा पध्दतीने त्यांनी या राज्यामध्ये आणि देशस्तरावर काम केलेले आहे. विशेषत: पक्षाच्या दृष्टिकोनातून देशपातळीवरील आणि राज्य पातळीवरील जबाबदारी त्यांनी पार पाडली. अशा श्रीमती प्रभा राव आपल्यातून निघून गेल्या याचे तीव्र दु:ख आपणा सर्वांना आहे.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे....

सभापती महोदय, कै. नरेंद्र महिपती तिडके यांनी स्वातंत्र्य लढयामध्ये भाग घेतला होता. विदर्भामध्ये कार्यकर्त्यांनी कशा पध्दतीने कार्य केले पाहिजे या दृष्टिकोनातून सामाजिक कार्याची आवड निर्माण करुन देण्याची त्यांची पध्दत वाखाणण्यासारखी होती. सर्वांना जवळीक दाखविणारे श्री. नरेंद्र तिडके हे संपूर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये परिचित आहेत. या राज्यातील प्रत्येक नेत्याला अत्यंत जवळून जाणणारे विदर्भातील एक कर्तृत्ववान नेतृत्व त्यावेळी सर्वांनी जवळून पाहिलेले आहे. संसदीय कार्य मंत्री असताना ते जेव्हा सभागृहात बोलण्यासाठी उभे रहात किंवा एखादा विषय मांडीत असत त्यावेळी त्यांच्या मताचा विरोधी पक्षातील आणि सत्ताधारी पक्षातील सर्व सन्माननीय सदस्य सन्मान करीत असत, अशा प्रकारचे त्यांचे व्यक्तिमत्व होते. ते प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष होते. संघटन बांधत असताना त्यांनी कामगार क्षेत्रात ज्या पध्दतीने काम केलेले आहे त्याचा उल्लेख या ठिकाणी सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी केलेला आहे. कामगार क्षेत्रात काम करीत असताना कणखर किंवा तशा प्रकारचे वक्तव्य कधीही न करता अत्यंत समंजसपणे कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी ते प्रयत्नशील राहिले आणि त्यांना त्यामध्ये यश मिळाले. कामगारक्षेत्रामध्ये या राज्यामध्ये जे नेतृत्व निर्माण झालेले आहे ते त्यांच्या माध्यमातून आणि त्यांच्या प्रशिक्षणातून निर्माण झालेले आहे.

यानंतर श्री. बरवड....

अशुधारित प्रत / शीघ्रलिपी नोंद

श्री. माणिकराव ठाकरे .....

मुंबई शहरातच नव्हे तर महाराष्ट्रामध्ये कामगार तसेच औद्योगिक क्षेत्रामध्ये जी प्रगती झाली त्यामध्ये कामगार क्षेत्राचा जो वाटा आहे त्यामध्ये श्री. नरेंद्र तिडके यांचा सिंहाचा वाटा आहे असे म्हटले तर वावगे होणार नाही. सामाजिक क्षेत्रामध्ये, सहकार क्षेत्रामध्ये, कामगार क्षेत्रामध्ये तसेच पक्षाच्या दृष्टीकोनातून त्यांनी अलौकिक काम केले. त्याचे दुःखद निधन झालेले आहे. त्यांना आपण या सदनामध्ये श्रध्दांजली वाहात आहोत.

सभापती महोदय, काही व्यक्ती आपल्यामधून निघून गेल्या त्यांची खऱ्या अर्थाने आपल्याला आठवण होते. सेवा दलाचे श्री. ताबजीभाई सोळंकी यांनी आपल्या संपूर्ण जीवनामध्ये समाजकार्य केले. त्यांनी स्वातंत्र्य लढ्यामध्ये सहभाग घेतला होता. सामान्य कार्यकर्ता म्हणून सातत्याने त्यांनी काँग्रेस पक्षामध्ये काम केले. सेवा दलामध्ये काम करीत असताना मुंबई काँग्रेसमध्ये सुध्दा पदाधिकारी म्हणून त्यांनी काम केले. विधान परिषदेचे सदस्यत्व देऊन पक्षाने सुध्दा त्यांचा सन्मान केला. अशा प्रकारे काँग्रेस पक्षामधील चळवळीमध्ये, सेवादलामध्ये काम करीत असलेला कार्यकर्ता विधान परिषदेपर्यंत आला. त्यांच्या चांगल्या पध्दतीच्या कामामुळे त्यांच्याबद्दल सभागृहातील प्रत्येक सन्माननीय सदस्यांच्या मनामध्ये आदराची भावना आहे. त्यांचे दुःखद निधन झाले. त्यांना मी श्रध्दांजली वाहतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. ग. प्र. प्रधान यांची भाषणे मी सुरुवातीच्या काळामध्ये मंत्री असताना ऐकत होतो. त्यांची भाषणे आणि त्यांचे वक्तृत्व अत्यंत उच्च दर्जाचे होते. सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांनी उल्लेख केला. ज्या विचारांवर त्यांचा विश्वास होता त्याच्याशी त्यांनी कधी तडजोड केली नाही. समोर कोणीही उभा राहिला, मंत्री उभे असले तरी केवळ विरोधक आहे म्हणून मंत्रिमहोदयांना अडचणीत आणण्याचा प्रयत्न न करता जे योग्य असेल तसेच उत्तर मिळवून घेण्याच्या दृष्टीने त्यांचा प्रयत्न असावयाचा. त्या पध्दतीने त्यांचा सन्मान सभागृहातील प्रत्येक सन्माननीय सदस्यांच्या मनामध्ये आहे. शासन स्तरावरुन सुध्दा मंत्रिमहोदयांकडून तशा प्रकारचा सन्मान त्यांना मिळाला. अशा प्रकारचे त्यांचे चांगले नेतृत्व होते. त्यांनी अत्यंत चांगले काम केले. त्यांना मी श्रध्दांजली अर्पण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे .....

सभापती महोदय, इतर जे सन्माननीय सदस्य आपल्यातून निघून गेले त्यांनी त्यांच्या काळामध्ये अत्यंत चांगल्या पध्दतीने काम केले आहे. त्यांच्या संदर्भातील उल्लेख या ठिकाणी झाला. श्री. पी.जी.दस्तूरकर यांच्या संदर्भात या ठिकाणी उल्लेख झाला. पूर्वी मी विधान परिषदेचा सदस्य नव्हतो परंतु मंत्री म्हणून बऱ्याच वेळा विधान परिषदेमध्ये उपस्थित राहात होतो. येथील सन्माननीय सदस्यांचे विद्वतापूर्ण वक्तृत्व, चांगली भाषणे तसेच प्रश्न चांगल्या पध्दतीने मांडण्याची कला या सर्व गोष्टी सन्माननीय सदस्यांकडून शिकण्यासारख्या आहेत. चांगल्या पध्दतीचे वक्तृत्व त्यांच्याकडून नेहमीच ऐकावयास मिळत असते. हे सदस्य आपल्यामधून निघून गेले आहेत आणि या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी त्यांच्या दु:खद निधनाबद्दल आपल्याला सहवेदना व्यक्त कराव्या लागत आहे. मी पक्षाच्या वतीने आणि माझ्या वतीने सर्व दिवंगत सदस्यांना आदरांजली व्यक्त करतो आणि माननीय मुख्यमंत्र्यांनी जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे त्याला अनुमोदन देतो.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ SBT/

डॉ. पतंगराव कदम (वन मंत्री) : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहामध्ये जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. देशाचे माजी उप राष्ट्रपती श्री. भैरोसिंह शेखावत, माजी वि.प.स., मंत्री व माजी राज्यपाल श्रीमती प्रभा राव, माजी सदस्य श्री. केशवराव राणे, 1952 पासूनचे आमदार व ज्येष्ठ नेते श्री. नरेंद्र तिडके साहेब, माजी सदस्य श्री. ग. प्र. प्रधान व अन्य दिवंगत सदस्यांच्या शोक प्रस्तावाला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, श्री. भैरोसिंह शेखावत हे राजस्थानचे मास लिडर होते. समाजातील शेवटच्या माणसापर्यंत पोहोचणारा आदर्श नेता कसा असावा, मुख्यमंत्री कसा असावा असे ते नेते होते. ते तीन वेळा मुख्यमंत्री झाले. ते विरोधी पक्षाचे नेते झाले. ते उप राष्ट्रपती पदापर्यंत पोहोचले. अशा पध्दतीचे श्री. भैरोसिंह शेखावत हे लोकनेते होते.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.पतंगराव कदम.....

सभापती महोदय, कै.केशवराव राणे हे 1952 साली विधानसभेमध्ये निवडून आले होते. कै.पी.के.सावंत यांच्यानंतर कोकणातील एक सुसंस्कृत नेता, प्रशासनावर जबरदस्त पकड असणारा नेता अशाप्रकारचे नेतृत्व त्यांनी निर्माण केले. त्यावेळी रत्नागिरी व सिंधुदूर्ग हा एकत्र जिल्हा होता. अशा एकत्रित रत्नागिरी जिल्हा परिषदेचे 10 वर्षे अध्यक्ष होते. 1968 ते 1973 या काळामध्ये त्यांनी आणि मी एस.टी.महामंडळाचे सदस्य म्हणून काम केले होते. त्यावेळी एस.टी.महामंडळामध्ये केवळ 7 सदस्य होते. त्या काळात एस.टी.महामंडळाचे जबरदस्त काम झाले. जिल्हा तेथे डिव्हिजन, तालुका तेथे डेपो आणि रस्ता तेथे एस.टी. अशी भूमिका कै.राणे यांच्या नेतृत्वाखाली घेऊन काम केले होते. अशा एका सुसंस्कृत नेत्यांचे दु:खद निधन झाले आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी शासकीय इतमामानाने त्यांचे अंत्यसंस्कार करण्यास खास बाब म्हणून परवानगी दिली, त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. अशाप्रकारचा नेता, सर्वसामान्य लोकांमध्ये काम करणाऱ्या एका आदर्श नेत्याचे दु:खद निधन झाले आहे.

सभापती महोदय, कै.नरेंद्र तिडके यांचे आणि माझे घनिष्ठ संबंध होते. कै.तिडके हे 1952 सालापासून विधिमंडळाचे सदस्य होते. सन्माननीय विरोधी पक्ष नेते यांनी म्हटल्याप्रमाणे ते नेमके काय व कोणाच्या बाजूने बोलत आहेत ते कित्येक वेळा समजत नसे. त्यामुळे त्यांना परराष्ट्र मंत्री करावे अशी भूमिका त्यांच्याबद्दल मांडली जात असे. कै.नरेंद्र तिडके हे कामगार नेते होते. ते आपल्यातून निघून गेलेले आहेत.

कै.ग.प्र.प्रधान यांनी फर्ग्युसन कॉलेजमध्ये 20 वर्षे काम केले होते. 1975 साली नवा विद्यापीठ कायदा राज्यात अस्तित्वात आला. धुळे, जळगांव, नाशिक, अहमदनगर व पुणे या जिल्हयातून पदवीधर मतदार संघातून मी निवडणुकीला उभे राहिल्यावर मास्तरांना भेटण्यासाठी गेलो होतो. ते मला म्हणाले होते की, तू पहिला मराठा तरुण आहेस. झेड.पी. व आमदारकीच्या नादाला न लागता विद्यापीठाच्या नादाला लागला आहेस. अशा पध्दतीने श्री.ग.प्र.प्रधान यांचे आगळेवेगळे व्यक्तिमत्व होते. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी कराडला कॉलेज काढण्याचे ठरविले होते त्यावेळी शिवाजी विद्यापीठ नव्हते. श्री.पाटील यांनी श्री.ग.प्र.प्रधान यांना हा विषय सांगितला

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.पतंगराव कदम.....

होता. त्यावेळी विद्यापीठाच्या बाबतीत सरकारकडे अधिकार नव्हते. कॉलेज मंजूर करण्याचा सर्व अधिकार विद्यापीठाकडे होता. बहुजन समाजाचे शिक्षण झाले पाहिजे, पुणे विद्यापीठ ख-या अर्थाने बाहेर गेले पाहिजे, अशी सामान्य कार्यकर्त्याची भूमिका घेणारे ते कार्यकारिणीचे सदस्य होते. त्यांनी संपूर्ण आयुष्यभर साधना साप्ताहिकाचे संपादक म्हणून काम केले होते.

सभापती महोदय, आमच्या नेत्या व प्रदेश काँग्रेस पक्षाच्या तत्कालीन अध्यक्षा आणि हिमाचल प्रदेशच्या राज्यपाल श्रीमती प्रभाताई राव यांची कारकीर्द महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये विशेषत: काँग्रेस पक्षाच्या इतिहासामध्ये न विसरण्यासारखी झालेली आहे. अतिशय खंबीरपणे आपली भूमिका सोडत नव्हत्या. कितीही अडचणी आल्या तरी त्या तत्वाशी कधीही प्रतारणा करीत नव्हत्या. त्यांच्याबरोबर कोषाध्यक्ष म्हणून मला काम करण्याची संधी मिळाली होती. श्री.विलासराव देशमुख मुख्यमंत्री असताना श्री.विलासराव देशमुख, आमच्या जनरल सेक्रेटरी मार्गारेट अल्वा, प्रभाताई आणि मी अशी चौघांची दर महिन्याला बैठक होत असे. श्रीमती प्रभा राव या किती कणखर नेत्या आहेत, त्यांची भूमिका किती स्वच्छ व स्पष्ट आहे हे मी अनुभवले आहे. अशाप्रकारची त्या पदाची प्रतिष्ठा व आपली ज्येष्ठता त्यांनी कधीही सोडली नाही. अशाप्रकारच्या त्या नेत्या होत्या. त्यांच्या निधनामुळे महाराष्ट्राचे व काँग्रेस पक्षाचे प्रचंड असे नुकसान झालेले आहे. राज्य मंत्रिमंडळात महसूल मंत्री, शिक्षण मंत्री म्हणून त्यांनी प्रभावीपणे काम केले होते.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / परिपत्रकासाठी नाही

(डॉ. पतंगराव कदम....

ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या माध्यमातून त्यांनी अनेक राज्याचे काम पाहिले. या ठिकाणी असा उल्लेख करण्यात आला की त्यांनी काँग्रेसमध्ये काम केले पण त्यांना न्याय मिळाला नाही. न्याय मिळणे न मिळणे हे महत्वाचे नाही. पण ज्या ज्या राज्यामध्ये आणि ज्या ज्या ठिकाणी त्या गेल्या त्या त्या ठिकाणी त्यांनी उत्तम आणि प्रभावी असे काम केले आणि आपल्या व्यक्तिमत्वाचा आगळा वेगळा ठसा राजकारणामध्ये, समाजकारणामध्ये आणि शासनामध्ये उमटविला. अशा महान नेत्यांचे दु:खद निधन झाले.

सभापती महोदय माननीय मुख्यमंत्र्यांनी हा जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे त्याला पाठिंबा देतो आणि दिवगंत सदस्यांना आदरांजली वाहून मी माझे दोन शब्द संपवितो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री श्री. अशोक चव्हाण यांनी दिवंगत नेते श्री. भैरोसिंह शेखावत, माजी उप राष्ट्रपती, श्रीमती प्रभा आनंद राव, माजी वि.प.स. मंत्री व माननीय राज्यपाल, श्री. नरेंद्र महिपती तिडके, माजी वि.प.स. व मंत्री, सर्वश्री प्रभाकर गंगाराम दस्तूरकर, पद्माकर मल्लिकार्जून पाटील, ताबजीभाई मांडाभाई सोळंकी, विनोदकुमार छाजुराम गुप्ता, प्रा. ग.प्र.प्रधान, केशवराव व्यंकटेश राणे, माजी वि.प.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोकप्रसताव मांडलेला आहे त्यावर माझ्या सहवेदना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

कै. भैरोसिंह शेखावत हे एक राष्ट्रीय नेते होते. भारतीय जनता पक्षाचे आणि त्या आधी जनसंघाचे ते देशातील प्रमुख नेते होऊन गेले. त्यांनी तीन वेळा राज्यस्थानचे मुख्यमंत्री म्हणून आणि तीन वेळा विरोधी पक्षनेता म्हणून काम केले. त्यांची राज्यसभेचे सभापती आणि उपराष्ट्रपती म्हणून कारकीर्द चांगली राहिली. त्यांचे दु:खद निधन झालेले आहे. मी त्यांना आदरांजली वाहतो.

कै. प्रभाताई राव यांच्याकडून आम्ही काही मंडळीनी काँग्रेसमध्ये असताना धडे घतलेले आहेत. मला आठवते की, प्रा. एन.एम.कांबळे हे प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष होते त्यावेळी प्रभाताई राव या सरचिटणीस होत्या. प्रा. एन.एम.कांबळे यांच्यानंतर प्रभाताई राव महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या अध्यक्ष झाल्या. काँग्रेस पक्षाच्या शताब्दी कार्यक्रमाच्या वेळी त्या प्रदेश काँग्रेस कमिटीच्या अध्यक्ष होत्या आणि आम्ही मंडळी त्यांच्या बरोबर काम करीत होतो. त्यांनी विधानसभा आणि विधानपरिषदेमध्येही काम केले. मंत्री म्हणूनही त्यांनी कित्येक वर्षे काम केले. शिक्षणमंत्री म्हणून त्यांची कारकीर्द चांगली राहिली. अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या अध्यक्ष तसेच हिमाचल प्रदेश आणि नंतर शेवटी राजस्थानचे राज्यपाल म्हणून त्या काम करीत होत्या. त्यांचे दु:खद निधन झालेले आहे. त्यांच्या निधनाबद्दल मी शोक व्यक्त करतो.

कै. प्रभाकर गंगाराम दस्तुरकर यांच्या संबंधी बोलताना सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख यांनी सांगितले की ते मराठवाडयातील शिक्षक मतदारसंघातून निवडून येत होते. त्यांनी मराठवाड्यात शिक्षक संघटनेमध्ये अतिशय चांगेल काम केले. त्यांनी आपल्या उत्कृष्ट भाषणांनी कित्येक वेळा सभागृह गाजविलेले आहे. कै. प्रभाकर दस्तुरकर यांच्या स्मृतीला मी अभिवादन करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ॲड. गुरुनाथ कुलकर्णी...

कै. पद्माकर मल्लिकार्जून पाटील व ताबजीभाई मांडाभाई सोळंकी यांचे दु:खद निधन झालेले आहे. कै. ताबजीभाई सोळंकी हे स्वातंत्र्य सैनिक. एक सफाई कर्मचारी आणि दलितवस्तीमध्ये राहाणारा एक कार्यकर्ता. वर्षानुवर्षे काँग्रेस पक्षामध्ये त्यांनी प्रामाणिकपणे काम केले. मुंबई महानगरपालिकेमध्ये नगरसेवक म्हणून त्यांनी अनेक वर्षे काम केले. त्यांनंतर त्यांना मुंबई महानगरपालिकेमधून विधानपरिषदेवर निवडून येण्याची संधी प्राप्त झाली.

...नंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुळकर्णी.....

त्यांनी सुध्दा अत्यंत चांगल्या प्रकारचे काम केले. स्वातंत्र्यसैनिक म्हणून कै.ताबजीभाई सोळंकी यांच्याकडे पाहिले जात होते. लेंगा, झब्बा आणि डोक्यावर गांधी टोपी अशा वेशामध्ये ते सदैव सभागृहात आणि सभागृहाबाहेरही दिसत असत. त्यांच्या निधनाबद्दल मी शोक व्यक्त करीत आहे.

सभापती महोदय, प्रा.ग.प्र.प्रधान हे आपल्यातून निघून गेले आहेत. प्रा.ग.प्र.प्रधान, ना.म.जोशी, ना.ग.गोरे, प्रा.सदानंद वर्दे, वसंत बापट ही सर्व मंडळी राष्ट्र सेवादलाच्या मुशीतून तयार झालेली होती. स्वातंत्र्य संग्रामानंतर राष्ट्र सेवादलाच्या माध्यमातून तयार झालेली समाजवादी विचाराची जी माणसे होती त्यांचे म्होरके हे प्रा.ग.प्र.प्रधान होते. साने गुरुजींच्या बरोबर प्रामाणिकपणे काम करणारी देशातील आणि या राज्यातील जी माणसे होती त्यामध्ये प्रा.ग.प्र.प्रधान यांचा समावेश होता. प्रा.ग.प्र.प्रधान हे साने गुरुजींचे शिष्य व कर्मठ कार्यकर्ते म्हणून काम करीत होते. त्यांच्या निधनाबद्दल मी शोक व्यक्त करीत आहे.

सभापती महोदय, सन्माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम यांनी उल्लेख केल्याप्रमाणे कै.केशवराव राणे हे कोकणाचे भूषण होते. 1952 ला जी पहिली सार्वत्रिक निवडणूक झाली त्या निवडणुकीत मालवण मतदारसंघाचे त्यांनी नेतृत्व केले. आता मतदारसंघांची रचना बदललेली आहे. पूर्वी मालवण-कणकवली हा एकच मतदारसंघ होता. कै.केशवराव राणे यांनी चारवेळा या मतदारसंघाचे नेतृत्व केलेले होते. या सभागृहाचे सुध्दा ते सदस्य होते. विभाजनापूर्वी एकत्रित असलेल्या रत्नागिरी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष म्हणून त्यांनी काम केले होते. रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केले होते. 1981 साली रत्नागिरी जिल्हयाचे विभाजन होऊन सिंधुदूर्ग जिल्हा निर्माण झाला. सिंधुदूर्ग जिल्हा सहकारी बँकेच्या पहिल्या अध्यक्षपदाची जबाबदारी त्यांच्याकडे सोपविण्यात आली होती. 1967 मध्ये एस.टी.महामंडळाची निर्मिती करण्यात आली व एस.टी. जाळे संपूर्ण महाराष्ट्रामध्ये पसरविण्यात आले. गाव तेथे एस.टी. सुरु करण्यात आली. सर्वसामान्य माणसाला प्रवासाचे साधन म्हणून एस.टी.ला महत्व प्राप्त झाले. 1967 साली कै.केशवराव राणे यांनी एस.टी.महामंडळाचे संचालक म्हणून काम केले होते. त्यांच्या कार्यकाळात कणकवली येथे एस.टी.महामंडळाचा डेपो उभारण्यात आला आणि कोकणातील हजारो तरुणांना चालक व वाहकाची नोकरी उपलब्ध करुन देण्याचे काम

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कै.केशवराव राणे यांनी केले. या सर्व महानुभवांना माझ्या पक्षाच्या वतीने मी श्रध्दांजली अर्पण करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

सभापती : शोकप्रस्तावावर सभागृहाचे नेते माननीय मुख्यमंत्री, माननीय विरोधी पक्षनेते आणि त्यानंतर गटनेते यांनी विचार मांडावेत एवढ्या मर्यादेपर्यंत जाण्याचा आपण प्रयत्न करतो. काही वेळेला अपवाद म्हणून काही माननीय सदस्यांना जरुर आपल्या भावना मांडण्याची संधी दिली जाते. माझ्याकडे सन्माननीय सदस्य सर्वश्री उल्हास पवार, हुसेन दलवाई, भाई जगताप, विक्रम काळे, अरुण गुजराथी व डॉ.नीलम गोऱ्हे यांनी विचार मांडण्यासाठी संधी मिळावी म्हणून विनंती केलेली आहे. या व्यतिरिक्त कोणाला बोलण्याची संधी दिली जाणार नाही. आता सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार हे आपले विचार मांडतील.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार (विधानसभेने निवडलेले) : माननीय सभापती महोदय, सन्माननीय मुख्यमंत्री महोदयांनी जो शोकप्रस्ताव मांडला आहे त्या शोकप्रस्तावासंबंधी सहवेदना व्यक्त करण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, भारताचे माजी उपराष्ट्रपती कै.भैरोसिंह शेखावत यांच्या निधनामुळे भारतीय राजकारणातील आणि राजस्थानमधील एक लोकप्रिय नेता आपल्यातून निघून गेला आहे. तीनवेळा त्यांनी राजस्थान राज्याचे मुख्यमंत्रीपद भूषविले होते. विधीमंडळ, लोकसभा व राज्यसभा या सर्व ठिकाणी एक उत्तम संसदपटू, एक विचारवंत, तत्वज्ञ आणि तत्वचिंतक अशी त्यांची ख्याती होती.

(नंतर श्री.खर्चे.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार .....

राजस्थानमधील अतिशय लोकप्रिय मुख्यमंत्री म्हणून तीन वेळा आणि विधानसभेच्या निवडणुकीत सन 1972 चा अपवाद वगळता सातत्याने ते निवडून आले होते. आळंदीच्या एका समारंभात त्यांच्या बरोबर उपस्थित राहण्याची मला संधी मिळाली त्यावेळी भारतीय अध्यात्म, समाजकारण आणि राजकारण यांच्या विचारांचा संगम कसा असावा असे व्यक्तिमत्व मला कै.भैरोसिंह शेखावत यांच्या रुपाने पहायला मिळाले. त्यांच्या निधनामुळे भारतीय राजकारण, समाजकारणातील थोर विचारवंत आपल्यातून निघून गेला आहे. त्यांना मी भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील काँग्रेसच्या एक थोर नेत्या की ज्यांनी विधानसभा, विधानपरिषद, राज्यसभा, लोकसभा, पक्ष संघटनेच्या पातळीवर आणि राज्यामध्ये विविध खात्याचे मंत्री म्हणून अतिशय समर्थपणे तसेच खंबीरपणे आपली कारकीर्द गाजविली त्या प्रभा राव. प्रभा राव या प्रदेश काँग्रेसच्या अध्यक्ष असताना त्यांच्या नेतृत्वाखाली उपाध्यक्ष म्हणून काम करण्याची मला संधी मिळाली. अत्यंत कणखरपणे भूमिका मांडणाऱ्या, आपल्या भूमिकेपासून तसुभरही न ढळणाऱ्या आणि काँग्रेस तसेच इंदिराजींवर अपार निष्ठा असणाऱ्या नेत्या म्हणून त्यांची आठवण सातत्याने होत राहील. मघाशी सन्माननीय ज्येष्ठ सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांचे वडील हे विदर्भातील एक थोर विचारवंत तसेच समाजसुधारकाच्या विचारांचे प्रतिनिधी होते. त्या काळात, ज्याचे वर्णन प्रा.बी.टी.देशमुख यांनी केले. ते म्हणजे महाविद्यालयीन जीवनात पन्नास एक वर्षापूर्वी खेळाच्या मैदानात त्या पोषाखामध्ये येणे आणि विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व करणे,या गोष्टी त्यांनी केल्या. ॲथलॅटिक्समध्ये सुध्दा त्यांचे उत्तम नाव होते. त्याच काळात प्रभा राव यांना समाजकारणाचे धडे मिळाले त्यामुळे आंतरजातीय विवाह करण्याची भूमिका त्यांनी आणि त्यांच्या वडिलांनी त्यावेळी अमलात आणली. खऱ्या अर्थाने गांधी-विनोबाजींचे विचार अमलात आणण्याचे काम त्यांनी केले आणि त्याचे प्रतीक म्हणून प्रभाताई या आदर्श म्हणून डोळ्यासमोर उभ्या राहतात. त्या केवळ राजकारणी म्हणून, मंत्री म्हणूनच नव्हे तर अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या सरचिटणीस, इंदिराजींच्या नंतर अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या सदस्या अशा सर्वोच्च ठिकाणी त्यांनी काम केले आहे. अशा सर्व कामांचा आढावा घेत असताना मला नम्रपणे सांगितले पाहिजे की, प्रभा राव या कला, साहित्य, नाट्यसंगीत, चित्रकला या विषयाच्याही अत्यंत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार .....

रसिक होत्या. त्या संगीत विशारद होत्या. संगीत विषय घेऊन त्या एम.ए. झालेल्या होत्या. अभिजात शास्त्रीय संगीताचे अतिशय त्यांना उत्तम ज्ञान होते. मी त्यांच्याबरोबर एक शास्त्रीय संगीताचा कार्यक्रम ऐकायला गेलो असता त्यावेळेस मला हे सर्व जाणवले. त्यावेळेस त्या म्हणाल्या की, उल्हास मी संगीत विशारद आहे. अशा प्रकारे शिक्षण मंत्री तसेच सांस्कृतिक कार्य विभागाचे मंत्री असताना त्यांनी या राज्यामध्ये आपल्या कार्याचा एक वेगळाच प्रभाव उमटविला. त्यांच्या नेतृत्वाखाली उपाध्यक्ष म्हणून काम करण्याचा मान मला मिळाला होता. पुण्यामध्ये सन 1972 मध्ये कॉंग्रेस फोरम फॉर सोशल ॲक्शनच्या अधिवेशनाला त्या आल्या होत्या. त्या अधिवेशनाचा मी निमंत्रक होतो त्यामुळे त्यांच्याशी माझे अत्यंत जिव्हाळयाचे नाते निर्माण झाले होते. त्यानंतर राजस्थान व हिमाचल प्रदेशच्या राज्यपाल म्हणूनही त्यांनी उत्तम काम केले. अशा प्रकारे रसिक व्यक्तिमत्व, राजकारणी व्यक्तिमत्व, प्रखर आणि तत्वनिष्ठ व्यक्तिमत्व आज प्रभाताईंच्या रुपाने आपल्यातून निघून गेले आहे.

महाराष्ट्रातील दुसरे ज्येष्ठ नेते नरेंद्र तिडके यांनी जवळजवळ 16-17 वर्षे राज्याच्या मंत्रिमंडळात मंत्री म्हणून काम केले. प्रदेश कॉंग्रेसचे अध्यक्ष असताना नेहमी टिळक भवनातच त्यांचा मुक्काम असायचा. मी सुध्दा जवळपास 8 ते 10 वर्षे टिळक भवनातच राहिलो होतो. त्यांच्यावर विनोबाजी, गांधीजी, राष्ट्रसंत तुकडोजी आणि गाडगे बाबाच्या विचारांचा प्रभाव होता.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार....

हे त्यांनी एका दिवाळी अंकात सांगितले होते. त्यांची ध्येयनिष्ठा, राहणी आणि विचार सरणी अत्यंत साधी होती. कै. प्रभा राव यांनी आंतरजातीय विवाह केला होता त्या काळात कै.नरेंद्र तिडके यांचा प्रेमविवाह झाला होता. त्यांच्या पत्नीच्या उपस्थितीमध्ये त्यांनी आनंदाने आमचा प्रेम विवाह झालेला आहे असे आम्हा कार्यकर्त्यांना सांगितले होते. कै. नरेंद्र तिडके यांनी कामगार मंत्री म्हणून जे काम केलेले आहे त्याबाबत मला या ठिकाणी उल्लेख करावयाचा आहे. मी मॅफको कामगार संघटनेचा अध्यक्ष असतांना 57 कामगारांना कामावरुन काढून टाकले होते. त्यावेळी त्या कामगारांच्या सहया देखील घेतल्या व त्यांना त्यांच्या कामाचे पैसे देखील दिले होते. हे 57 कामगार शासकीय सेवेतून 2 वर्षे घरी बसले होते. त्या काळात कै. तिडके हे कामगार मंत्री होते त्यावेळी मी सर्व कामगारांना त्यांच्याकडे घेऊन गेलो होतो. या कामगारांना पुन्हा कामावर घेणे कोणालाही शक्य झाले नसते असे काम कै. तिडके यांनी केले होते. जे कामगार 2 वर्षे घरी बसले होते अशा 57 कामगारांना त्यांनी पुन्हा मॅफकोच्या सेवेत घेतले होते. हे सर्व कामगार आजही कै. तिडके यांची आठवण काढत असतात हे मला या ठिकाणी विनम्रपणे सांगितले पाहिजे. एक ध्येयवादी आणि सर्वांना आदर्श असणारे व्यक्तिमत्व आपल्यातून निघून गेलेले आहे त्यामुळे मी भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

कै. ग.प्र.प्रधांना यांचा उल्लेख या ठिकाणी सन्माननीय मंत्रीमहोदय श्री. पंतगराव कदम आणि सन्माननीय सदस्य ॲड. गुरुनाथ कुलकर्णी यांनी केलेला आहे. कै. ग.प्र.प्रधान यांना मी फार जवळून पाहिलेले आहे. पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमध्ये ते इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून काम करीत होते. त्या काळात ते खूप मोठया प्रमाणात विद्यार्थी प्रिय होते. इतर महाविद्यालयातील विद्यार्थी चोरुन फर्ग्युसन महाविद्यालयात कै. प्रधान यांचे लेक्चर अटेंड करीत असत. राष्ट्र सेवादल, साने गुरुजी, महात्मा गांधी या सर्वांच्या विचाराचा पगडा कै.ग.प्र.प्रधान यांच्यावर होता. सानेगुरुजींच्या कल्पनेतील धडपणा-या मुलांपैकी ते एक होते. सानेगुरुजींचा आशीर्वाद आणि सानिध्य कै. ग.प्र.प्रधान यांना लाभले होते. मला अनेक वेळा कै. ग.प्र.प्रधान साहेबांना भेटण्याची संधी मिळाली होती. कॉ.अहिल्या रांगणेकर हया कै. प्रधान यांच्या आत्तेबहिण होत्या. आमचे सर्व घराणे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार....

राजकारणात कसे प्रभावी आहे याबाबत ते मला नेहमी सांगत असत. कै. ग.प्र.प्रधान यांचा मला सहवास आणि जवळीक आणि मार्गदर्शन लाभले होते. त्यांनी आपल्या मृत्यूपत्रामध्ये स्वत:चे घर साधना आणि जनमहिला संघटनेला अर्पण केले होते. असे मृत्युपत्र अलीकडच्या काळात आपल्याला शोधूनही सापडणार नाही. कै. ग.प्र.प्रधान यांच्या घराची आजची किंमत दोन अडीच कोटी रुपये आहे असे असतांना त्यांनी आपले घर साधना आणि जनमहिला संघटनेला अर्पण केलेले आहे. कै. ग.प्र.प्रधानांचे लग्न झाल्यानंतर त्यांच्या पत्नी डॉक्टर झाल्या होत्या. त्यांच्या पत्नी रात्री जेव्हा अभ्यास करीत असत तेव्हा कै. ग.प्र.प्रधान हे त्यांना चहा बनवून देत असत. स्त्री-पुरुष समानता आणि एकमेकाचा आदर अशी भूमिका आपण मानतो ती भूमिका कै. ग.प्र.प्रधान साहेबांनी आपल्या कृतीमधून दाखवून दिली होती. त्या काळातील साने गुरुजीचा धडपडणारा एक मुलगा, एक थोर स्वातंत्र्य सेनानी, विचारवंत, ध्येयनिष्ठ असे व्यक्तिमत्व होते. आदर्श कोणाचा ठेवावा अशी वेळ येते तेव्हा कै. ग.प्र.प्रधान यांच्याकडे आपल्याला पाहता येईल. त्यामुळे कै. ग.प्र.प्रधान साहेबांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

कै. ताबजीभाई मांडाभाई सोळंकी हे हरिजन सेवक संघटनेत कै. एच.एन.त्रिवेदी यांच्या बरोबर काम करीत असतांना महाराष्ट्राचे हरिजन सेवक संघाचे अध्यक्ष कै.बाळासाहेब भारदे होते व त्यावेळी मी उपाध्यक्ष होतो. मी कै. ताबजीभाई यांना फार जवळून पाहिलेले आहे. सफाई कामगार असलेला माणूस नगरसेवक म्हणून कसे काम करतो हे मी फार जवळून पाहिलेले आहे. महापालिकेतून विधानपरिषदेवर निवडून येणे अवघड असतांना सुध्दा ते दोनदा विधानपरिषदेवर निवडून आले होते. अत्यंत गरीब माणूस, सफाई कामगार असतांना दोन वेळा मुंबई महापालिकेच्या मतदारसंघातून विधान परिषदेवर निवडून येणे हे त्या विचारांच्या महतीमुळेच शक्य झाले होते असे मला वाटते. त्यामुळे मी कै.ताबजीभाई सोळंकी यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

सभापती महोदय, कै.प.म.पाटील, कै. प्रभाकर दस्तूरकर, कै. केशवराव राणे, कै. विनोदकुमार गुप्ता हे सर्व या सदनाचे सदस्य होते. कै.विनोद गुप्ता अतिशय तडफेने आपली भूमिका मांडत असत. त्यांची एक आठवण मी आपल्याला सांगू इच्छितो की, ज्या मुलींचे अपहरण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार....

करुन, फसवून ज्या मुलींना वेश्याव्यवसायात ढकलले जात होते अशा मुलींना सोडवून आणण्यासाठी कै. विनोद गुप्ता हे रात्रीचा दिवस करीत असत. आज या ठिकाणी शोकप्रस्तावाच्या प्रसंगी सर्व दिवंगत सदस्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

यानंतर श्री. भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हुसेन दलवाई (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी जो शोक प्रस्ताव मांडला आहे, त्याला पाठिंबा देण्यासाठी आणि त्यावर माझ्या भावना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

श्री.भैरोसिंह शेखावतजी जेव्हा जनता पार्टी निर्माण झाली होती तेव्हा भारतीय पातळीवर काम करीत होते. भारतीय जनता पक्षाचे, जनसंघाचे ते नेते असूनसुद्धा सर्व पक्षातील कार्यकर्त्यांशी त्यांचा संपर्क होता. इतके सर्वसमावेशक, समजूतदार नेतृत्त्व त्या पक्षामध्ये कसे काय राहिले, याचे नेहमी आश्चर्य वाटायचे.

श्रीमती प्रभा राव यांच्या सान्निध्यात मी पाच वर्षे काम केले आहे. त्या 1972 मध्ये वर्धा जिल्ह्यातील पुलगाव मतदार संघातून महाराष्ट्र विधानसभेवर निवडून आल्या होत्या. त्यावेळी मी येथे पत्रकार म्हणून काम करायचो आणि तेव्हा 2-3 तरूण मंडळी पुढे येत होती. त्यात श्री.पवार साहेब होते. श्रीमती प्रभा राव होत्या. तेव्हा सहजतेने वाटायचे की, ह्या महाराष्ट्राच्या मोठ्या नेत्या होणार आणि ते खरे झाले. त्यांचे आपल्या विभागावर जबरदस्त नियंत्रण होते. त्यांना विषयाची माहिती अतिशय चांगली असायची. कुठल्याही प्रश्नाला नेमके उत्तर देणे हे आम्ही त्या काळापासून पहात आलो आहोत. त्यानंतर त्या महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या अध्यक्ष झाल्या. तेव्हा उपाध्यक्ष म्हणून मी काम करीत होतो. अतिशय शिस्तबद्ध काम करणाऱ्या त्या होत्या. कुणीही आले, कसेही गेले, कसेही बोलले हे त्यांना आवडायचे नाही. दरवाजावर टक-टक केल्यानंतर त्यांनी आत येण्याचा आदेश दिल्यानंतरच आत जावे लागत असे. त्याकाळी आम्ही पदाधिकारी म्हणून काम करायचो. त्यावेळी आम्हाला त्यांची भीती असायची. कसेही काम केलेले त्यांना मुळीच आवडायचे नाही. तथापि, त्या रागावल्यानंतर देखील त्यांच्या मनामध्ये काहीच नसायचे. दुसऱ्या क्षणाला तितक्याच नितळपणे त्या कार्यकर्त्यांशी बोलत असत. आणीबाणीच्या काळात काँग्रेस पार्टी सत्तेतून गेली. त्यावेळी काँग्रेस पार्टीचा उदय खऱ्या अर्थाने विदर्भात झाला. हा उदय घडवून आणण्यामध्ये इंदिरा गांधी नंतर कोणाचा हात असेल तर तो म्हणजे श्रीमती प्रभा राव यांचा. त्यांनी श्रीमती इंदिरा गांधी यांच्या दौऱ्याचे आयोजन केले होते. पूर्ण दौऱ्यामध्ये त्या इंदिरा गांधी बरोबर राहिल्या होत्या. श्री.राजीवजी यांच्या बरोबर देखील त्यांचे संबंध अतिशय चांगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हुसेन दलवाई....

होते. श्री.राजीवजी जेव्हा केंद्रात पंतप्रधान होते तेव्हा त्या महाराष्ट्राच्या प्रदेशाध्यक्षा होत्या. त्या दोन वेळा प्रदेशाध्यक्ष राहिल्या होत्या. सोनिया गांधीजींच्या काळात देखील त्या प्रदेशाध्यक्ष झाल्या होत्या. सन 2004 मध्ये महाराष्ट्रामध्ये विचित्र परिस्थिती निर्माण झाली. त्या काळाचा उल्लेख येथे कोणी तरी केला. त्या काळामध्ये पुन्हा मुख्यमंत्री हा काँग्रेसचा असला पाहिजे हा अट्टाहास त्यांनी पूर्ण केला. ज्या गोष्टी त्या बोलायच्या त्यासाठी जी किंमत लागेल ती देण्याची त्यांची तयारी असायची.

मी येथे सगळ्यांच्या बद्दल बोलणार नाही. श्री.प्रभाकर दस्तुरकर माझे मित्र होते. अनेक वेळा अनेक प्रश्नावर ते येथे बोलायचे. त्यांचे सदस्यत्व संपल्यानंतर देखील ते कार्यरत राहिले होते.

प्रा.ग.प्र.प्रधान सर यांच्या बद्दल मी असे म्हणेन की, प्रधान सरांचे व्यक्तिमत्त्व कमालीचे नितळ होते. अतिशय साध्या स्वभावाचा माणूस. कमालीचा त्याग करण्याची कुवत असलेले असे प्रधान सर होते. महाराष्ट्रातील अनेकांना गणेश प्रभाकर प्रधान हे नाव देखील माहीत नसेल. त्यांना ग.प्र.प्रधान असे म्हणायचे किंवा प्रधान मास्तर असे म्हणायचे.

यानंतर श्री.अजित...

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हुसेन दलवाई..

प्रा.ग.प्र.प्रधान यांच्याकडे कोणताही कार्यकर्ता कोणत्याही वेळी जाऊन प्रबोधन घेऊ शकत असे, त्यांच्याशी चर्चा करु शकत असे आणि मुख्यत: त्यांच्याशी वैचारिक संघर्षही करु शकत असे. एकदा मी त्यांच्याशी बोलत असताना ते काहीतरी बोलले. तेव्हा मी त्यांना म्हणालो, "सर, आपले विधान चुकलेले आहे". तेव्हा त्यांनी लगेच स्वत:चे कान पकडले आणि म्हणाले,"माझे विधान चुकीचे झालेले आहे." स्वत:ची चूक कबूल करण्याचा मोठेपणा त्यांच्याकडे होता.

सभापती महोदय, याठिकाणी नामांतराचा उल्लेख करण्यात आला. नामांतराच्या संदर्भात त्यांनी ठराव मांडावा असा आग्रह नामातरांमध्ये असलेल्या आमच्या सारख्या कार्यकर्त्यांनी केला होता. नामांतरासंदर्भातील ठराव मांडू नये यासाठी त्यांच्यावर तत्कालीन मुख्यमंत्री श्री.शरद पवार तसेच श्री.गवई साहेब यांचा दबाव येऊन सुध्दा त्यांनी त्यांना स्पष्टपणे सांगितले की, "नामांतरवादी कार्यकर्त्यांनी सुचविले आहे की, मी हा ठराव मांडावा आणि मी तो ठराव मांडणार आहे, ज्यांना विरोध करायचा असेल त्यांनी विरोध करावा." इतकी कणखर भूमिका त्यांनी त्यावेळी घेतली होती. त्यावेळी अनेकजण म्हणाले होते की, प्रधान सर म्हणजे समन्वयी विचाराचे, इतका आग्रह कसा काय धरु शकतात ?

प्रधानसर तीन वेळा या सभागृहाचे सदस्य राहिले होते. विरोधी पक्ष नेता म्हणून कसे काम करावे याचा एक चांगला आदर्श प्रधानसरांनी घालून दिलेला आहे.ज्यांना विरोधी पक्ष नेता म्हणून या सभागृहात काम करायचे असेल त्यांनी प्रधानसरांची भाषणे वाचवीत. त्यांच्या भाषणात कधीही आक्रस्ताळेपणा नसायचा. ते भाषण करताना कधीही मुद्दा सोडायचे नाहीत. सर्व गोष्टी अभ्यासपूर्ण मांडायच्या. विरोधी पक्ष नेता म्हणून काम करीत असताना त्यांच्याकडे कार्यकर्त्यांची प्रचंड रीघ असायची. त्यांच्याकडे अगदी सामान्यातला सामान्य आणि गरिबातला गरीब माणूस असायचा. त्या सर्वांची दु:खे ते ऐकून घ्यायचे. एकदा ते म्हणाले होते की, मी अजूनपर्यंत पुस्तकातून समाजवाद वाचला, परंतु प्रत्यक्षात समाजामध्ये गेल्यानंतर समाजाची दु:खे वेगळी असतात, ती समजून घेणे आणि मग त्या अर्थाने आयडॉलॉजी निर्माण करणे ही वेगळी गोष्ट आहे, हे मी आता जाणून घेतले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हुसेन दलवाई..

प्रधानसरांच्या त्यागाबाबत अनेक सन्माननीय सदस्यांनी येथे उल्लेख केला. कोणत्याही थराला जाऊन त्यांची त्याग करण्याची प्रवृत्ती होती. साधना साप्ताहिकासाठी स्वत:चे घर दिले. आपल्याकडे असलेले पैसे विविध संस्थांना दान देण्यासाठी त्यांनी मृत्युपत्र केले होते. नंतर त्यांच्या असे लक्षात आले की, आपल्या मृत्युनंतर कशासाठी दान करायचे, त्यापेक्षा आपल्या हयातीच दान का करु नये असे म्हणून त्यांनी केलेले मृत्युपत्र फाडले आणि त्यांची जी प्रॉपर्टी होती ती वेगवेगळ्या संस्थाना दान केली. आपले घरदार आणि प्रॉपर्टी दान केल्यानंतर प्रधानसर साने रुग्णालयात शेवटपर्यंत राहिले. खऱ्या अर्थाने ते साने गुरुजींचे शिष्य होते. साने गुरुजींची जी लाडके मुले होती त्यातील प्रधानसर हे एक होते. अशा या महान व्यक्तीचे दिनांक 29 मे, 2010 रोजी दु:खद निधन झ ाले. त्यांना तसेच इतर दिवंगत सन्माननीय सदस्यांना मी आदरांजली अर्पण करतो आणि दोन शब्द पुरे करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले): अध्यक्ष महाराज, माननीय मुख्यमंत्री श्री.अशोक चव्हाण यांनी मांडलेल्या शोकप्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

कै.भैरोसिंह शेखावत आपल्या विधान भवनात येऊन गेले. मी विधानसभेचा अध्यक्ष असताना व माननीय प्रा.ना.स.फरांदे हे सभापती असताना आम्ही विधान भवनात एक कार्यक्रम घेतला होता. त्या कार्यक्रमास आम्ही त्यांना निमंत्रित केले होते. मोठ्या पदावर गेलेला माणूस साधा कसा राहू शकतो याचे अत्यंत चांगले उदाहरण शेखावत यांच्या माध्यमातून आम्हाला पहावयास मिळाले. सर्वपल्ली डॉ.राधाकृष्णन यांना फिलॉसॉफर किंग म्हटले जाते. मी देखील भैरोसिंह यांना वेगळ्या अर्थाने फिलॉसॉफर किंग म्हणतो. भैरोसिंह यांनी प्रथम "अंत्योदय" योजना आणली. अंत्योदय योजना संपूर्ण हिंदुस्थानामध्ये आणून विकासाचा पाझर शेवटचा माणसापर्यंत गेला पाहिजे हा विचार त्यांनी दिला.

कै.श्रीमती प्रभा राव यांच्यासोबत मला काम करण्याची संधी मिळाली.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी ..

त्यांची पक्षावर, समाजावर , देशावर , राष्ट्रावर निष्ठा होती त्याचबरोबर ज्या पदावर त्या असतील त्या पदाला न्याय देण्याची भूमिका कै. प्रभा राव यांनी कायम स्वरुपी स्वीकारली होती .

सभापती महोदय, कै. न.म.तिडके यांचे दु:खद निधन झाले असून त्यांचा शोक प्रस्ताव या ठिकाणी मांडण्यात आला आहे. त्यांच्या बाबतीत बोलत असतांना या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी असे सांगितले गेले की, 20 - 22 वर्षे मंत्री राहिल्यानंतर सुध्दा त्यांच्या संपूर्ण राजकीय कारकिर्दीत कोठेही धक्का लागला नाही. "It is simple to be happy but it is difficult to be simple.". जीवनात साधेपणा हा अत्यंत महत्वाचा आहे परंतु साधे राहणे अत्यंत कठीण आहे. कै. न.म.तिडके यांचे राहणे अत्यंत साधे होते. अशा प्रकारे कै. न.म. तिडके यांचे एक चांगले व्यक्तिमत्व होते.

कै. ताबजीभाई सोळंकी यांचे देखील दु:खद निधन झाले असून त्यांच्या निधनाबद्दल या ठिकाणी शोक प्रस्ताव मांडण्यात आला आहे. त्यांच्याबद्दल बोलत असतांना दोन तीन सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी आपले विचार मांडले होते. त्यांची उंची पाच फूट होती आणि त्यांचे वजन 35 किलो होते. मुंबई महानगरपालिके पासून ते विधान परिषदेपर्यंत त्यांनी काम केले होते. सफाई कामगारांमधील ही व्यक्ती कॉग्रेस पक्षाच्या माध्यमातून संधी मिळाली म्हणून किती काम करु शकते याचे हे एक चांगले उदाहरण आहे. अशा प्रकारची माणसे पुन्हा या सभागृहात दिसतील काय ? चांगल्या विचाराचे , चांगल्या प्रवृत्तीचे , चांगल्या सिध्दांताचे ते होते अशाच प्रकारे त्यांचा उल्लेख करावासा वाटतो.

सभापती महोदय,कै.ग.प्र.प्रधान यांचे देखील दु:खद निधन झाले असून त्यांच्या निधनाबद्दलचा शोक प्रस्ताव मांडण्यात आला आहे. या ठिकाणी विरोधी पक्ष नेता असतांना विधायक विरोधक कसा असावा यासंबंधी कै.ग.प्र.प्रधान यांचा निश्चित उल्लेख करावासा वाटतो. या ठिकाणी ज्या सन्माननीय सदस्यांचा शोक प्रस्ताव मांडण्यात आला आहे त्यांना मी श्रध्दाजली अर्पण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री भाई जगताप (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, कै.भैरोसिंह शेखावत, माजी उप राष्ट्रपती, श्रीमती प्रभा राव, न.म.तिडके, प्रभाकर दस्तुरकर,प.म.पाटील,ताबजीभाई सोळंकी, विनोदकुमार गुप्ता , प्रा.ग.प्र.प्रधान ,केशवराव राणे यांच्या दु:खद निधनाबद्दल माननीय मुख्यमंत्र्यांनी या ठिकाणी शोक प्रस्ताव मांडला आहे त्याला समर्थन देण्यासाठी तसेच त्यावर माझ्या भावना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, दिवंगत सदस्यांतील काही सदस्यांबरोबर सभागृहातील काही ज्येष्ठ सन्माननीय सदस्यांना काम करण्याची संधी मिळाली होती . त्या सदस्याबद्दल त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या होत्या. या भावना व्यक्त करीत असतांना त्यांच्या कामाचा उल्लेखही या ठिकाणी करण्यात आला होता. ज्या सन्माननीय सदस्यांचे दु:खद निधन झाले आहे त्यांचे व्यक्तिमत्व भारतीय समाजाला, भारतीय राजकारणाला दीपस्तंभासारखे होते असे जर मी म्हटले तर ती अतिशयोक्ती होणार नाही. म्हणून त्या संदर्भात मी अधिकचे वक्तव्य करणार नाही.

सभापती महोदय,कै.न.म.तिडके यांचे दु:खद निधन झाले असून कै. न.म.तिडके हे कामगारांचे नेतृत्व करीत होते.कामगारांच्या चळवळीबद्दल त्यांना किती तळमळ होती हे मला त्यांच्या विचारातून जाणवले होते. त्यांनी मला बोलावून माझ्याबरोबर एकदा जे संभाषण केले होते त्यातूनही मला जाणवले होते. त्यासंबंधीचा उल्लेख करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. कै. न.म.तिडके यांच्याबाबतीत उल्लेख करीत असतांना त्यांच्या कार्याबद्दल काही सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला होता. कामगार क्षेत्रात असूनसुध्दा आक्रमक न राहता मृदूभाषी म्हणून शेंवटपर्यंत त्यांचा लौकिक संपूर्ण राज्याला माहीत होता. कामगार मंत्री असतांना त्यांच्या कार्यकाळात कष्टक-यांसाठी अनेक क्रांतिकारक निर्णय घेण्यात आले होते.त्याचा उल्लेख अनेक सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी केला होता. 1988 सालापासून मी कामगार क्षेत्रात काम करण्यास सुरुवात केली म्हणून कामगाराबद्दल त्यांच्या मनात असलेली तळमळ नव्वदच्या दशकात मला बोलून दाखवली होती. 80 च्या दशकात कामगार चळवळीची आणि उद्योगाची धूळधाण झाली होती. त्या काळात काही आक्रमक पवित्रा घेतला गेल्यामुळे लाखो कष्टकरी लोकांचा रोजगार उद्ध्वस्त झाला होता त्यामध्ये गिरणी कामगारांचा समावेश होऊ शकेल तसेच अन्य काही कामगारांचाही समावेश

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

होऊ शकेल. त्या काळात मी सुध्दा या क्षेत्रात संघर्ष करीत होतो. नव्वदच्या दशकात त्यांनी मला असे सागितले की , तुझ्या बरोबर मला काही बाबीवर चर्चा करावयाची आहे तेव्हा चर्चा करण्यासाठी माझ्याकडे ये त्यावेळी .त्यांनी मला असे सागितले की, आयुष्यभर कामगार क्षेत्रात काम करीत असतांना कधीही मला असे जाणवले नाही की,

नंतर श्री.सरफरे

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप...

आक्रमकपणे काहीतरी करावे, आक्रमकपणे कुणाला तरी भरीस पाडावे. परंतु भाई, आज ज्या दिशेने कामगार चळवळ सुरु आहे, कामगारांचे, कष्टकऱ्यांचे प्रश्न ज्या पध्दतीने मांडले जात आहेत त्यासाठी तुम्ही सर्वजण एकत्र या. विशेषत: मुंबईच्या गिरणी कामगारांबाबत भावना व्यक्त करतांना त्यांनी मला बोलून दाखविले की, मी स्वत: कामगार मंत्री असतांनाही या कामगारांना मला न्याय देता आलेला नाही. हे त्यांनी जाहीररित्या कबूल करण्याचे दातृत्व, जाहीर रित्या मान्य करण्याची भूमिका दाखविली ती फार कमी लोकांमध्ये असते. अशाप्रकारे कामगार चळवळीतील एक लोक नेता हरपला आहे.

सभापती महोदय, कै. श्रीमती प्रभाताई राव यांच्या बाबतीत सुध्दा मला सांगितले पाहिजे. मी ताईंना नेहमी गंमतीने म्हणत असे की, मी शाळेत नेहमी हेडमास्तरांना घाबरत असे. त्यानंतर मी तुम्हाला घाबरतो. त्यावेळी त्या हसत मला नेहमी म्हणायच्या की, तू शाळेमध्ये टवाळखोर, व्दाड मुलगा होता, तसाच आताही व्दाड मुलगा आहेस. अशाप्रकारे कामगारांचे अनेक प्रश्न सोडविण्यासंबंधी त्या माझ्याबरोबर चर्चा करीत असत. आणि म्हणून आज या निमित्ताने ताईंच्या त्या वक्तव्याचे मला स्मरण होत आहे. त्या आपल्यामधून निघून गेल्या आहेत. माझ्यातर्फे आणि माझ्या कुटुंबियांतर्फे या सर्व सामान्यामधील असामान्य असलेल्या नेत्यांना माझी आदरांजली व्यक्त करुन माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री श्री. अशोक चव्हाण साहेबांनी श्री. भैरोसिंह शेखावत, माजी उप राष्ट्रपती, श्रीमती प्रभा आनंद राव, माजी वि.प.स., मंत्री व माननीय राज्यपाल, श्री. नरेंद्र महिपती तिडके, माजी वि.प.स. व मंत्री, सर्वश्री प्रभाकर गंगाराम दस्तुरकर, पद्माकर मल्लिकार्जून पाटील, ताबजीभाई मांडाभाई सोळंकी, विनोदकुमार छाजुराम गुप्ता, प्रा. ग. प्र. प्रधान, केशवराव व्यंकटेश राणे, माजी वि.प.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल मांडलेल्या शोकप्रस्तावावर मी श्रध्दांजली व्यक्त करण्यासाठी उभी आहे.

सभापती महोदय, खासकरुन प्रा. ग. प्र. प्रधान सर व श्रीमती प्रभाताई राव, आणि श्री. नरेंद्रजी तिडके यांचा आणि माझा वैयक्तिक परिचय होता. प्रधान सरांच्या वैशिष्ट्याबद्दल सभागृहात खूप बोलले गेले. ज्यावेळी आपण आपल्या आयुष्यामध्ये अशा थोर मान्यवर नेत्यांबद्दल आदरांजली व्यक्त करतो त्यावेळी आयुष्याच्या कोणत्या मुक्कामावर आपण या थोर व्यक्तींकडे कसे पहातो आणि त्यांचे समाजातील स्थान कसे समजून घेतो यामधून बऱ्याचशा गोष्टी शिकण्यासारख्या असतात. प्रधान सरांचा विचार एकांगी नव्हता. मतभेद असले तरी त्या मतभेदांच्या पलिकडे सर्वांना समजून घेण्याची त्यांची भूमिका होती. विशेषत: मला सांगितले पाहिजे की, गेल्या काही वर्षापूर्वी त्यांनी स्वत:हून निवृत्ती स्वीकारली. त्यानंतर सर अजून अंतर्मुख होत चालले होते. त्यांच्या गाजलेल्या पुस्तकांमध्ये "माझी वाटचाल" आणि "साठा उत्तराची कहाणी" यामध्ये त्यांनी विधान परिषदेच्या कामकाजाबाबत काही वैशिष्ट्ये लिहिली आहेत. मी विधानपरिषदेत येऊन चार-पाच वर्षे झाल्यानंतर पुन्हा ती पुस्तके वाचली. त्यावेळी त्या पुस्तकांमध्ये सरांनी म्हटले आहे की, "मी ज्यावेळी विधानपरिषदेमध्ये होतो त्यावेळी सभासदांनी मांडलेल्या विषयांची जास्त दखल राज्यामध्ये घेतली जाते परंतु माझी दखल कां घेतली जात नाही?" यासंबंधी सरांनी लिहिलेले त्यांचे विचार वाचल्यानंतर माझ्या मनामध्ये काही गोष्टी स्पष्ट झाल्या. प्रश्न मांडणाऱ्या सदस्यांच्या पाठिमागे त्या प्रश्नाची ताकद उभी असते, त्यानुसार त्या प्रश्नाचा परिणाम ठरत असतो. एखाद्या प्रश्नावर या सभागृहामध्ये कोण किती वेळ बोलतो, यापेक्षा आपण ज्यांचे प्रतिनिधीत्व याठिकाणी करतो त्याची दखल समाज घेत असतो. मला देखील प्रधान सरांच्या या शब्दांचा अर्थ लक्षात आला. मी प्रधान सरांना भेटायला गेले आणि त्यांना हे उदाहरण दिले त्यावेळी सरांनी मला एक सल्ला दिला की, "प्रत्येकाच्या आयुष्यामध्ये कर्तृत्वाचा एक काळ असतो, ज्यावेळी त्या व्यक्तीच्या कर्तृत्वाचा काळ सुरु

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ KGS/

डॉ. नीलम गोऱ्हे....

असतो त्यावेळी आपल्याला वाटते की, हे कधीच थांबणार नाही. आपणही त्या कर्तृत्वाच्या झोतामध्ये असणार आहोत. परंतु काही काळानंतर त्याच्या आयुष्यातील हा प्रकाशझोत थांबतो. त्यावेळी आपण कुठे थांबले पाहिजे हे ज्याचे त्याला समजले पाहिजे. अशाप्रकारे सरांचे अनुभवांचे बोल आहेत. त्याचप्रमाणे सरांचे दुसरे वैशिष्टय म्हणजे त्यांचे निधन हडपसर येथील आरोग्य मंडळाच्या रुग्णालयात झाले. त्यावेळी त्यांची सेवा करणारे कार्यकर्ते श्री. खंडू पवार हे शेवटपर्यंत त्यांच्याबरोबर होते.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कुटुंबामध्ये स्वत:चा धनसंचय न करता जगता येईल की नाही मला माहीत नाही. परंतु धनसंचय करण्यासाठी माणुसकी सोडणे, असे घडताना दिसते. त्यावेळी प्रा.ग.प्र.प्रधान यांची आठवण इ ाल्याशिवाय रहात नाही. त्यांनी असे सांगितले होते की, माझ्या मृत्यूनंतर माझे कुठलेही स्मारक करण्यात येऊ नये. पण ज्यांना माझी आठवण येईल त्यांनी पाच वृक्ष लावावेत, अशा प्रकारची अपेक्षा त्यांनी आपल्याकडून व्यक्त केली होती. प्रा. ग.प्र.प्रधान यांना मी माझ्या वतीने आणि शिवसेनेच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करते.

श्रीमती प्रभा राव हे एक आगळे-वेगळे व्यक्तिमत्व होते. महिला आयोगाची निर्मिती होत असताना राज्य महिला आयोगाची निमंत्रक म्हणून त्या वेळचे माननीय मुख्यमंत्री श्री. सुधाकरराव नाईक यांनी माझ्यावर जबाबदारी टाकली होती. त्यानंतर राज्य महिला आयोग प्रत्यक्षात तयार झाल्यानंतर श्रीमती प्रभा राव या महिला आयोगाच्या अध्यक्षा म्हणून काम करीत होत्या. त्यावेळी मी महिला आयोगाची सदस्य म्हणून तीन वर्षे काम केलेले आहे. त्यावेळी श्रीमती प्रभा राव यांची अनेक वैशिष्टये लक्षात आली. मला कोणावर वैयक्तिक टीका करावयाची नाही. परंतु कॉंग्रेस पक्षातील अंतर्गत राजकारणाच्या अनेक गोष्टी त्या आम्हाला सांगायच्या. चंद्रपूरला काय झाले? बंगलोरला काय झाले हे त्या दौऱ्याच्या वेळी सायंकाळी आम्हाला सांगायच्या. त्यावरुन कोणत्याही कार्यकर्त्यांला राजकारणात काम करताना किती कठोरपणे आणि ठामपणे काम करावे लागते हे लक्षात यायचे. सन्माननीय सदस्य श्री. हुसेन दलवाई यांनी थोडयावेळापूर्वी म्हटल्याप्रमाणे श्रीमती प्रभा राव यांना काय आवडायचे आणि काय आवडायचे नाही याबाबतच्या काही गोष्टी त्यांच्या मनामध्ये ठाम होत्या. महसूल, शिक्षण. उद्योग, नियोजन अशा अनेक विभागामध्ये काम करण्याचा त्यांचा जो अनुभव होता तो त्यांनी राज्य महिला आयोगाच्या पाठीशी उभा केला. त्या संगीत विशारद होत्या. त्याचबरोबर त्यांच्या मनामध्ये अनेक गोष्टींचा निर्धार होता. एखाद्या कार्यक्रमात किंवा समारंभात श्रीमती प्रभा राव व माझी भेट झाल्यानंतर त्यांनी मला अत्यंत मृदू शब्दात जे काही सांगावयाचे होते ते सांगितले आणि मी ते समजून घेतले. श्रीमती प्रभा राव यांच्या दु:खद निधनाबद्दल मला निश्चितपणे असे वाटते की, दिल्लीतील केंद्रीय नेतृत्वाने त्यांच्यावर जो विश्वास टाकला होता त्याची कारणे त्यांच्या व्यक्तिमत्वामध्ये निश्चितपणे दडलेली होती. त्यांचे दु:खद निधन झालेले आहे. महाराष्ट्रातील सर्व महिलांच्या वतीने मी त्यांना श्रध्दांजली अर्पण करते.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ MMP/

डॉ. नीलम गोऱ्हे....

श्री.नरेंद्र तिडके यांनी कामगारांच्या प्रश्नावर जे काम केलेले आहे त्यातून असंघटीत कामगारांसाठी काम करण्याची स्फूर्ती आपल्याला मिळावी अशी मी अपेक्षा व्यक्त करते. धन्यवाद. जय महाराष्ट्र.

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ MMP/

श्री. विक्रम कळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, या राज्याचे मुख्यमंत्री माननीय श्री. अशोक चव्हाण यांनी या ठिकाणी जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे त्या प्रती मी माझ्या भावना व्यक्त करण्यासाठी या ठिकाणी उभा आहे.

या देशाचे उप राष्ट्रपती श्री. भैरोसिंह शेखावत हे राजस्थानचे सुपुत्र होते. तीन वेळा राज्यस्थानचे मुख्यमंत्री आणि तीन वेळा विरोधी पक्ष नेते म्हणून त्यांनी काम केलेले आहे. अंत्योदय योजनेचे जनक अशी त्यांची ख्याती होती. समाजातील नाहिरे वर्गाचा आवाज उठविणारे नेते म्हणून त्यांची ख्याती होती असे एक उत्तुंग व्यक्तिमत्व लाभलेले कै. भैरोसिंह शेखावत यांचे दु:खद निधन झालेले आहे. मी त्यांना श्रध्दांजली अर्पण करतो.

श्रीमती प्रभा राव या विदर्भातील उत्कृष्ट नेत्या होऊन गेल्या आहेत. प्रभा राव यांनी आंतरराष्ट्रीय महिला परिषदेमध्ये भारताचे प्रतिनिधीत्व केलेले आहे. अत्यंत कडक शिस्तीच्या, खंबीर व तडफदार नेत्या म्हणून त्यांचा नावलौकीक आहे. त्यांची स्मृती अतिशय चांगली होती. एका कार्यक्रमामध्ये माझी आणि त्यांची ओळख झाली होती. एका वर्षा नंतर परत जेव्हा दुसऱ्या एका कार्यक्रमात माझी आणि त्यांची भेट झाली तेव्हा त्यांनी मला अगदी नावानिशी विक्रम कसे काय चालले आहे असे विचारले, तेव्हा मला अतिशय आनंद झाला. अशा पध्दतीने लहान-सहान कार्यकर्त्यांवर लक्ष ठेवणाऱ्या काँग्रेसमधील ज्येष्ठ नेत्या त्या होऊन गेल्या आहेत.

सभापती महोदय,श्री. नरेंद्र तिडके हे सुध्दा विदर्भातील चळवळीतील नेते होते. त्यांचेही दु:खद निधन झालेले आहे.

सभापती महोदय,मराठवाडयातील शिक्षण चळवळीमध्ये काम करणारे श्री. प्रभाकर दस्तूरकर यांचे दु:खद निधन झालेले आहे. त्यांनी आत्महत्या केली अशा प्रकारचे वृत्त आमच्या कानावर आले तेव्हा आम्हाला धक्का बसला. शिक्षण चळवळीमध्ये काम करीत असताना कामगारांच्या संदर्भातील अनेक प्रश्न मांडण्याचे काम त्यांनी केलेले आहे.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे ....

अशा शिक्षण चळवळीत काम करणाऱ्या सन्माननीय श्री. पी. जी. दस्तुरकर यांचे दु:खद निधन झाले. त्याचप्रमाणे मराठवाड्यातील शिक्षण चळवळीतील आमचे नेते श्री. पद्माकर मल्लिकार्जून पाटील यांचे सुध्दा दु:खद निधन झाले. त्यांनी सुध्दा शिक्षण क्षेत्रामध्ये उत्कृष्ट काम केले. शिक्षणाबरोबरच शेतकऱ्यांचे प्रश्न, कामगारांचे प्रश्न या ठिकाणी मांडण्याचे काम त्यांनी सातत्याने केले. शैक्षणिक चळवळीत या दोन्ही नेत्यांनी जे काम केले ते माझ्या सारख्या शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या तरुण कार्यकर्त्याला निश्चितपणे प्रेरणा देणारे आहे.

सभापती महोदय, माजी सदस्य श्री. ताबजीभाई सोळंकी असतील, श्री. विनोदकुमार छाजुराम गुप्ता असतील, श्री. केशवराव राणे असतील किंवा प्रा.ग.प्र.प्रधान सर असतील त्यांचे सुध्दा दु:खद निधन झालेले आहे. प्रा. ग. प्र.प्रधान यांची उत्कृष्ट लेखक म्हणून संपूर्ण महाराष्ट्राला ओळख राहिलेली आहे. अशा सर्व महान विभूतींना शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी बांधवांच्या वतीने मी भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : सभापती महोदय, आदरणीय मुख्यमंत्री यांनी जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर माझे विचार मांडत असताना काही मुद्दे मांडणे गरजचे आहे असे माझ्यासारख्या कार्यकर्तीला वाटते. माजी उप राष्ट्रपती श्री. भैरोसिंह शेखावत हे उत्तुंग व्यक्तिमत्व होते हे जगजाहीर आहे परंतु आदरणीय श्रीमती प्रभा राव यांनी आपल्या पूर्ण आयुष्यात स्त्रियांना पुढे आणण्यासाठी खास प्रयत्न केले आणि त्यांनी नुसतेच प्रयत्न केले नाही तर त्यांना प्रोत्साहित केले. त्याची दोनतीन उदाहरणे मी देऊ इच्छिते. श्रीमती प्रभा राव अखिल भारतीय काँग्रेस पक्षाच्या जनरल सेक्रेटरी होत्या. त्या जनरल सेक्रेटरी असताना माझ्यासारख्या कार्यकर्तीला मराठीबरोबर गुजराथी चांगले लिहिता बोलता येते म्हणून एकदा मला गुजरातच्या दौऱ्यावर घेऊन गेल्या. त्या मला म्हणाल्या की, गुजराथीमधून माणसे जे बोलत आहेत ते सगळे लिहून घे आणि ते लिहून झाल्यानंतर माझ्याबरोबर दिल्लीला आले पाहिजे. मी संबंध कार्यक्रम लिहून घेतला. सांगण्याचा उद्देश असा की, काँग्रेस पक्षामध्ये पुढे येण्यासाठी जेव्हा कार्यकर्ता धडपडत असतो, सगळ्याच पक्षांमध्ये त्यांच्याकडून काम करुन घेतले जाते परंतु त्यांना फारसे पुढे आणण्यामध्ये काही मंडळींचा हात नसतो पण प्रभाताई त्याला अपवाद होत्या. त्या सबंध गुजराथीचे भाषांतर मी सहा तासामध्ये प्रभाताईंना करुन दिले. स्वत: त्या सोनियाजी गांधी यांच्याकडे जाताना मला म्हणाल्या की, तुलाही माझ्याबरोबर आले पाहिजे. सोनियाजी म्हणाल्या की, तुम्ही मला सहा तासामध्ये सबंध ट्रान्सलेशन कसे काय करुन दिले ? त्या म्हणाल्या की, ही ट्रान्सलेटर मी बरोबर घेऊन गेले होते आणि त्यांनी हे सगळे केलेले आहे. असे सांगणाऱ्या प्रभाताई होत्या. 2004 साली विधानसभेच्या निवडणुका झाल्या. त्यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या त्या अध्यक्षा होत्या. मी भांडूप मतदारसंघातून तिकीट मागितले होते. मी मुलुंड मतदारसंघातून तिकीट मागितले नव्हते. तरीही श्रीमती प्रभाताई राव यांचा विश्वास होता आणि त्यांनी सांगितले की, श्रीमती अलका देसाई तिथून निवडणूक लढवतील. तेव्हा मी मुंबईत होते आणि त्यांनी स्वत: दिल्लीवरुन फोन करुन सांगितले की, तुला मुलुंडमधून जागा लढवावयाची आहे आणि यश संपादन करावयाचे आहे. मी थोड्या मताने त्या ठिकाणी अयशस्वी ठरले. तरी सुध्दा कार्यकर्त्याला पुढे घेऊन जाण्याची संधी देण्याची वृत्ती असलेल्या प्रभाताई राव यांच्या मी खऱ्या अर्थाने प्रेमात कधी पडले असेन तर केंद्रामधील

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MMP

श्रीमती अलका देसाई ....

इंदिराजींची सत्ता गेली असताना इंदिराजींच्या बरोबरीने सबंध देशामध्ये श्रीमती प्रभाताई राव फिरत होत्या. कर्नाटकमध्ये त्यांचा दौरा चालू असताना काही नतद्रष्ट लोकांनी इंदिराजींवर दगडफेक केली. समयसूचकता म्हणजे काय असते हे श्रीमती प्रभाताई राव यांच्याकडून शिकण्यासारखे होते. त्या ज्या घराच्या बाजूने जात होत्या त्या ठिकाणी बाहेर एक टोपला लागलेला होता. आमच्या कोकणी भाषेत त्याला पाटी म्हणतात. ती पाटी श्रीमती प्रभाताई राव यांनी घेतली आणि त्यांनी इंदिराजींचे संरक्षण केले. सबंध दगड त्या पाटीवर त्यांनी झेलून घेतले आणि तोच फोटो सर्व वर्तमानपत्रांमध्ये आला होता. त्यावेळी मी नगरसेविका जरी असले तरी श्रीमती प्रभाताई राव यांच्या प्रेमात पडले आणि त्यांच्या बरोबरीने काम केले. सत्ता मिळो अगर न मिळो, प्रामाणिकपणा म्हणजे काय, काँग्रेस पक्ष म्हणजे काय हे प्रभाताईंकडून शिकण्यासारखे होते आणि त्यांनी आम्हाला ते शिकविले. 15 दिवस अगोदर त्या गव्हर्नर बंगल्यावर आल्या असताना त्यांनी मला निरोप दिला.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई...

मी त्यांच्याबरोबर चर्चा करीत असताना काही प्रश्न अनुत्तरित राहिले याचे दु:ख माझ्यासारख्या लहान कार्यकर्तीला झाले आहे.

कै.केशवराव राणे हे त्यावेळच्या रत्नागिरी मतदार संघातून विधानसभेवर निवडून आले होते. अत्यंत मृदू भाषी, सगळयांना बरोबर घेऊन जाणारे नेतृत्व होते. समाजवादी पक्षाचा प्रभाव असलेला आमचा जिल्हा होता. परंतु काँग्रेस पक्ष हा तळागाळापर्यंत पोहोचला पाहिजे. नेहरुजींचे, गांधीजींचे व इंदिराजींचे विचार लोकांपर्यंत पोहोचले पाहिजेत, त्यांच्या विचारांची देवाणघेवाण लोकांमध्ये झाली पाहिजे हे तत्व ज्यांनी मरेपर्यंत जपले ते काँग्रेस पक्षाचे नेते कै.केशवराव राणे यांना सुध्दा मी विनम्रपणे श्रध्दांजली वाहते.

कै.नरेंद्रजी तिडके हे माझ्या वडिलांचे मित्र होते. माझा स्वातंत्र्य सैनिकाच्या घरामध्ये जन्म झ ाला असल्यामुळे सुदैवाने काँग्रेस परिवारामध्ये मला वावरण्याची संधी मिळाली. वडील राष्ट्रीय मिल मजूदर संघाचे पदाधिकारी होते व तिडकेजी हे कामगार मंत्री होते त्यामुळे त्यांचे विचार, आचार व त्यांची बैठक मी जवळून पाहिलेली आहे. कामगारांच्या प्रश्नावर कधीही तडजोड केली नाही. कामगारांच्या प्रश्नाबाबत आक्रमक भूमिका न घेता मृदू भाषेमध्ये कामगारांचे प्रश्न सोडविले होते. असा एक नेता आपल्यातून निघून गेला आहे.

कै.ताबजीभाई सोळंकी, कै.विनोदकुमार गुप्ता आणि या सभागृहातील काही सदस्य आणि मी महानगरपालिकेत काम करीत होतो. कै.ताबजीभाई सोळंकी हे सामान्य माणसासाठी झटणारे नेते होते. वेश्यांना देखील समाजात सन्मानाने जगता यावे यासाठी काम करणारे कै.विनोदकुमार गुप्ता या सर्वांना आपण श्रध्दांजली वाहत आहोत. या दिवंगत नेत्यांना श्रध्दांजली वाहत असताना मी एवढेच म्हणेन की, या नेत्यांनी हाती घेतलेले काम पूर्ण करण्याची जबाबदारी आपल्या सारख्या लहान कार्यकर्त्यांवर येऊन पडते असे मला वाटते. या सगळयांना माझ्यावतीने व राज्यातील तमाम स्त्री वर्गातर्फे श्रध्दांजली वाहते आणि येथेच थांबते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KGS/

सभापती : सन्माननीय मुख्यमंत्री श्री.अशोक चव्हाण यांनी या सदनामध्ये जो दुखवटयाचा ठराव मांडला आहे. या दुखवटयाच्या ठरावाच्या अनुषंगाने मी माझे विचार याठिकाणी मांडतो.

स्व.भैरोसिंह शेखावत हे सामान्यातील सामान्य कुटुंबात जन्माला आले होते. त्यांनी स्वकर्तृत्वाने तीन वेळा राजस्थानचे मुख्यमंत्री पद मिळविले होते. तीन वेळा विरोधी पक्ष नेते म्हणून काम केले होते. नंतरच्या काळात राज्यसभेचे सदस्य म्हणून त्यांनी काम केले होते. 2002 ते 2007 या काळात या देशाचे उपराष्ट्रपती म्हणून देशाचे नेतृत्व केले होते. अत्यंत त्यागी, ध्येयवादी अशाप्रकारचे नेतृत्व दुर्दैवाने आपल्यातून निघून गेलेले आहे.

मी ज्या व्यक्तींना माझे नेतृत्व मानतो त्या व्यक्तींपैकी श्रीमती प्रभा राव ह्या एक होत्या. अत्यंत परखड विचाराच्या होत्या. ध्येयवादावर व विचारांवर अढळ श्रध्दा असणा-या त्या होत्या. श्रीमती इंदिरा गांधी, श्रीमती सोनिया गांधी व काँग्रेस परिवार यांच्याबरोबर विचाराने, आचाराने व कृतीने सातत्याने असणा-या नेत्या होत्या. महाराष्ट्राच्या कानाकोप-यामध्ये स्त्री चळवळ असो की अन्य पक्षाच्या संघटना असोत त्यामध्ये अत्यंत परखडपणे काम करणारे त्यांचे व्यक्तिमत्व होते असे मी मानतो. 1983-84 साली माझ्या मंत्रिमंडळात नव्याने समावेश झाला त्यावेळी मंत्रिमंडळातील ज्येष्ठ मंत्री म्हणून मला त्यांनी अनेक वेळा मंत्री म्हणून काम कसे करावे, लोकांच्या समस्या कशा सोडवाव्या यादृष्टीने अनेक वेळा आपला लहान बंधू या नात्याने मार्गदर्शन केले तसेच माझ्यावर प्रेमही केले. शासकीय कामकाज कसे केले पाहिजे याची जाणीवही करुन दिली होती. दुर्दैवाने त्यांचे अचानकपणे दिनांक 26 एप्रिल, 2010 रोजी निधन झाले आहे.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापती...

स्वर्गीय नरेंद्र महिपती तिडके हे 1952 मध्ये मध्यप्रदेश विधानसभेचे आमदार होते. अत्यंत तरुण वयामध्ये ते त्या विधानसभेचे आमदार झाले. 20-22व्या वर्षी त्यांनी स्वातंत्र्य लढयामध्ये सक्रीय सहभाग घेतला. स्वातंत्र्यासाठी लढताना त्यांनी तुरुंगवास पत्करला. नंतरच्या काळामध्ये महाराष्ट्र विधानसभेवर ते चार वेळा आमदार म्हणून निवडून आले तसेच विधानपरिषदेचे सदस्य म्हणूनही त्यांनी काम केले. मी जेव्हा प्रदेश काँग्रेसचा अध्यक्ष झालो त्यावेळी वडीलकीच्या नात्याने जी चार जबाबदार व्यक्तिमत्वे होती त्यापेक्षी नरेंद्र तिडके साहेब हे एक होते. कठीण परिस्थितीमध्ये मी जेव्हा पक्षामध्ये अध्यक्ष म्हणून संघटना चालवित होतो त्यावेळी मी माझ्या ज्या नेत्यांचा सल्ला घेत होतो त्यामध्ये नरेंद्र तिडके साहेब हे निश्चितच असत. मी त्यांच्या बरोबर जात असे, त्यांच्या बरोबर बोलत असे. सातत्याने संघर्ष करावा असे कोणी सांगितले ? एखाद्या गोष्टीवर निर्णय घेणे सहज शक्य असेल तर तो लगेच घ्यावा असे ते सांगत. तसेच एखाद्या गोष्टीबाबत निर्णय घेणे कठीण असेल तर ती गोष्ट पुढे कशी जाईल याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. तसेच प्रभाताईनी देखील मार्गदर्शन केले. मी नवीन आमदार म्हणून काम करीत असताना नरेंद्र तिडके साहेब हे त्यावेळी कामगार मंत्री आणि ग्रामविकास मंत्री म्हणून काम करीत होते.त्यावेळी त्यांच्या ज्ञानाचा मला सातत्याने उपयोग झाला.

कै. प्रभाकर दस्तूरकर यांचा आणि माझा चांगला परिचय होता. अलिकडच्या काळामध्ये ते मानसिकदृष्ट्या खचलेले वाटत होते. त्यांच्या मृत्यूपूर्वी ते चार-पाच वेळा माझ्याकडे आले होते. माजी आमदारांचे अनेक प्रश्न ते मांडत असत. मी त्यांना सांगितले की, माजी आमदारांच्या प्रश्नांचा सातत्याने पाठपुरावा करावा लागतो. आज मी आमदार असलो तरी उद्या माजी आमदार होणार आहे. तुम्ही हताश आणि नाराज का ? असे मी त्यांना विचारीत असे. पण या प्रश्नाचे उत्तर मला त्यांच्याकडून मिळाले नाही. अनपेक्षितपणे ते आपल्यातून गेले.

कै. ताबजीभाई मांडाभाई सोळंकी हे 1990 आणि 1992 असे दोन वेळा मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था मतदारसंघातून विधानपरिषदेवर निर्वाचित झाले होते. त्यांचे काम मी जवळून पाहिले. मी मंत्री म्हणून काम करीत असताना ते दोन वेळा विधान परिषदेचे सदस्य म्हणून निवडून आले होते. अत्यंत साधेभोळे. ख-या अर्थाने हाडाचा कामगार नेता. सफाई कामगारांचा नेता. त्यांची वागण्या बोलण्याची आणि काम सांगण्याची पध्दत अतिशय विनयशील होती.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती...

कै. विनोदकुमार छाजुराम गुप्ता यांचे काम म्हणजे स्त्रीमुक्ती चळवळ म्हणण्यापेक्षा वेश्या व्यवसायामध्ये दुर्दैवाने अडकलेल्या हजारो तरुणी, ज्यांना कुणाचाच कुठे आधार नाही अशांना आधार देणारे असे हे व्यक्तिमत्व होते. अनेक संकटे आली तरी कुठेही न डगमगता त्या क्षेत्रामध्ये त्यांनी काम केले.

कै. ग.प्र.प्रधानसर हे आपल्यातून निघून गेलेले आहेत. खरे म्हटले तर ग.प्र.प्रधानसर यांचे नाव घेताना या गोष्टीचा अभिमान वाटतो की ते आयुष्यभर चंदनासारखे झिजले आणि समाजाला सगळे दिले. आचार, विचार दिले, ध्येयवाद दिला. ते विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेता होते. अत्यंत मृदू परंतु ठाम विचाराने बोलणारे असे व्यक्तिमत्व. त्यांनी विधान परिषदेमध्ये केलेल्या भाषणांचे विधानपरिषदेतील सन्मानीय सदस्यांनी मनन करणे, वाचणे हीच त्यांना ख-या अर्थाने श्रध्दांजली ठरेल.

कै. केशवराव व्यंकटेश राणे हे माझे व्यक्तिगत ज्येष्ठ मित्र होते. 1980मध्ये जेव्हा मी आमदार होतो त्यावेळी तेही आमदार होते. त्यापूर्वी 1952 आणि 1972 दरम्यान ते आमदार होते.

....नंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती.....

आणि 1988 ते 1990 पर्यंत ते विधानपरिषदेचे सदस्य होते. खऱ्या अर्थाने जूना रत्नागिरी जिल्हा म्हणजे रत्नागिरी-सिंधुदूर्ग या भागाचे परखड नेतृत्व यादृष्टीने कै.केशवराव राणे यांच्याकडे बघणे गरजेचे आहे. सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या निधनानंतर एक चांगला निर्णय घेतला. मी सन्माननीय मुख्यमंत्री आणि सन्माननीय मंत्री डॉ.पंतगराव कदम यांना धन्यवाद देतो. अत्यंत चांगल्या शासकीय इतमामात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करुन त्यांचा सन्मान केला गेला, तो अत्यंत महत्वाचा सन्मान होता.

सन्माननीय सदस्य कै.प.म.पाटील यांचा आणि माझा परिचय नसला तरी ते या सदनाचे सन्माननीय सदस्य होते. या सर्व दिवंगत सन्माननीय सदस्यांना आपण सर्वांनी श्रध्दांजली अर्पण करु या. सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे उभे राहून शोक प्रस्ताव संमत करावा अशी माझी त्यांना विनंती आहे.

(सदस्य उभे राहतात.)

सदस्यांनी खाली बसावे.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला आहे. प्रस्तावाची एक प्रत शोकाकूल कुटुंबियांकडे पाठविण्यात येईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती.....

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सायंकाळी 5 वाजून 10 मिनिटांनी सभागृहाची बैठक पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 4.42 ते 5.10 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

(नंतर श्री.खर्चे....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगिती नंतर)

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. मोहन जोशी)

तालिका सभापती : सनननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, पाशा पटेल, जयंत प्र.पाटील यांनी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव दिलेला आहे त्या प्रस्तावावर आता सभागृहात चर्चा होईल. या चर्चेसाठी एक तासाची वेळ ठरलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी आपला प्रस्ताव मांडावा.

श्री. दिवाकर रावते : महोदय, प्रस्ताव मांडण्यापूर्वी तसेच त्यावर चर्चा सुरु होण्यापूर्वी माझी अशी विनंती आहे की, न्यायालयाने जो निर्णय दिलेला आहे त्याच्याशी संबंधित हा विषय असल्याने तो गृह विभागाशी संबंधित नसून विधि व न्याय विभागाशी संबंधित आहे. म्हणून या चर्चेला उत्तर देखील माननीय विधि व न्याय मंत्र्यांनीच दिले पाहिजे. सभागृहात संबंधित खात्याचे मंत्री उपस्थित नाहीत. दुसरे मंत्री महोदय जरी संयुक्त जबाबदारी म्हणून नोंद घेत असले तरी उत्तर मात्र संबंधित विभागाच्या मंत्र्यांनीच दिले पाहिजे. कारण हा न्यायालयीन लढा असून तो लढा आपण हारलेलो आहोत. तसेच काल माननीय सभापतींकडे आम्ही हा प्रस्ताव दिला तेव्हा सुध्दा हाच आग्रह आम्ही धरला होता की विधि व न्याय मंत्र्यांकडूनच आम्हाला उत्तर मिळाले पाहिजे.

तालिका सभापती : ठीक आहे. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आपला प्रस्ताव मांडावा.

....2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: जेम्स लेनने छत्रपती शिवाजी महाराज व जिजाऊ माँसाहेब यांच्याबद्दल केलेले अवमानकारक व बदनामीकारक लिखाण

मु.शी.: जेम्स लेनने छत्रपती शिवाजी महाराज व जिजाऊ माँसाहेब यांच्याबद्दल केलेले अवमानकारक व बदनामीकारक लिखाण या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, सय्यद पाशा पटेल, जयंत प्र.पाटील वि.प.स. यांचा प्रस्ताव

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो :--

"दिनांक 9 जुलै, 2010 रोजी सर्वोच्च न्यायालयाने अमेरिकी लेखक जेम्स लेन याने लिहिलेल्या "शिवाजी हिंदू किंग इन इस्लामिक इंडिया" या वादग्रस्त पुस्तकावरील राज्य शासनाने घातलेली बंदी उठविण्याचा निर्णय दिलेला आहे आणि या पुस्तकावर बंदी घालताना आवश्यक असलेली प्रक्रिया राज्य सरकारने पूर्ण केली नव्हती असे आपल्या निर्णयात नमूद करुन सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारच्या विधि व न्याय खात्याची बेअब्रू केली आणि पुस्तकातील मजकुरामुळे सामाजिक द्वेष पसरु शकतो ही राज्य सरकारची मागणी देखील सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली आहे आणि सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयानंतर राज्यभरात सर्वत्र संतापाची लाट उसळली आहे आणि सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे शिवरायांसारख्या राष्ट्रपुरुषाचा, राष्ट्रमाता जिजामातेचा आणि त्यांना दैवत मानणाऱ्या कोटयवधी भारतीयांचा अपमान झालेला आहे यावर शासनाने केली कारवाई व उपाययोजना विचारात घेण्यात यावी".

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ...

सभापती महोदय,राज्याच्या नव्हे तर देशाच्या दृष्टीने हा विषय अत्यंत गंभीर आहे. या देशामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जी घटना लिहिली त्या घटनेनुसार प्रत्येक व्यक्तीला समान अधिकार आणि समान स्वातंत्र्य दिलेले आहे. कोणीही कोणा विरुध्द काहीही बोलावे व काहीही लिहावे, काहीही टीका करावी असा समान स्वातंत्र्याचा अर्थ होत नाही. जो देश छत्रपती शिवरायांचा मानला जातो त्या देशामध्येच छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल आक्षेपार्ह लिखाण करुन या देशातील कोटयावधी जनतेच्या भावनेला हात घालण्याचे निंदनीय कृत्य विकृत अमेरिकन लेखक जेम्स लेन याने केलेले आहे. जेम्स लेनने हिंदुस्थानात येऊन छत्रपती शिवाजी महाराजांशी संबंधित माहिती जमा करण्याचा प्रयत्न केलेला आहे. ही माहिती जमा करुन त्याने जून 2003 मध्ये पुस्तक प्रकाशित केले होते. हे पुस्तक 127 पानाचे असून त्या पुस्तकातील 93 क्रमांकाच्या पानावर राजमाता जिजाऊ यांचे चारित्र्य हनन केलेले आहे. ज्यावेळी पुस्तक प्रकाशित केले जाते त्यावेळी पुस्तक प्रकाशित करण्याच्या अगोदर ते तपासल्या शिवाय पुस्तक प्रकाशित करु नये असा नियम आहे. सदर पुस्तकाचे प्रकाशन करु नये याबाबत ऑक्सफर्ड प्रेसने आक्षेप घेऊन पत्र सुध्दा सादर केले होते. असे असतांनाही जून 2003 मध्ये सदर पुस्तक प्रकाशित करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या या देशात आणि राज्यात त्यांच्या विरुध्द व जिजाऊमाते विरुध्द लिखाण करुन पुस्तक प्रकाशित करण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या संदर्भात या देशात अनेक लेखकांनी पुस्तके लिहिली आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेसाठी राज्य कसे चालविले होते, आदर्श राजा कसा असावा याबाबद्दल अनेक लेखकांनी लिखाण केलेले आहे. परंतु ज्या ज्यावेळी विकृत मनोवृत्ती काम करते त्यावेळी त्या विकृत मनोवृत्तीच्या माध्यमातून कोटयावधी माणसांच्या आराध्य दैवताबद्दल कसे लिहिले जाते हे जेम्स लेनच्या पुस्तकावरून दिसून येते. जेम्स लेनने छत्रपती शिवाजी महाराजांचे आणि जिजाऊ मातेचे चारित्र्य हनन करण्याचा जो प्रकार केलेला आहे तो अक्षम्य असा अपराध आहे. त्याने जो अपराध केलेला आहे त्याला कदापीही क्षमा केली जाणार नाही. ज्यावेळी हे पुस्तक छापले गेले त्यावेळी त्या पुस्तकातील आक्षेपार्ह मजकुरावर गदारोळ झाला, संपूर्ण महाराष्ट्रात संतप्त भावना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ...

उमटल्यानंतर राज्य सरकारने 15 जानेवारी 2004 रोजी या पुस्तकावर बंदी आणली होती. 15 जानेवारी 2004 रोजी या पुस्तकावर बंदी आणल्यानंतर या पुस्तकाची विक्री बंद झाली होती त्यावेळेस आम्हाला असे वाटले होते की, आता हे पुस्तक इतिहास जमा होईल. परंतु जशी चांगली मनोवृत्ती या देशात काम करते तशीच विकृत मनोवृत्ती सुध्दा काम करीत असते. व्यक्ती स्वातंत्र्यांचा आव आणून, टाहो फोडून ही विकृत मनोवृत्ती हाय कोर्टात गेली. या विकृत मनोविकृतीच्या विरुध्द शासन हाय कोर्टात योग्य पध्दतीने बाजू मांडू शकले नाही.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

सरकारने कोर्टात केस नीट प्लीड केली नाही. त्यामुळे उच्च न्यायालयात विकृत मनोवृत्तीचा विजय होतो. म्हणूनच या पुस्तकावरील बंदी उठविली जाते. राज्य सरकारवर सर्वात पहिली नामुष्कीची पाळी येथेच आली. यासंबंधी प्रचंड अशी संतापाची लाट महाराष्ट्रामध्ये उमटली. यामुळेच राज्य सरकारला सर्वोच्च न्यायालयात जाणे भाग पडले. असे वाटले होते की, एके ठिकाणी राज्य सरकारचा पराभव झाला. राज्य सरकारची नामुष्की झाली, बेअब्रू झाली. मागच्याला ठेच पुढचा शहाणा या उक्तीप्रमाणे राज्य सरकार सर्वोच्च न्यायालयात जाताना डोळ्यात तेल घालून, चांगल्या पद्धतीने केस मांडेल असे वाटले होते. परंतु तसे झाले नाही. राज्य शासन छत्रपती शिवाजी महाराजांचा सन्मान करेल असे वाटले होते. या कामापेक्षा अजून दुसरी कुठलीही प्रॉयॉरिटी असू शकत नाही. सर्वोच्च न्यायालयाचा निकाल आपल्या बाजून कसा लागेल याचा विचार राज्य सरकारने करायला पाहिजे होता. पण अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली पुस्तकावरील बंदी उठविली गेली. पुस्तक प्रसिद्ध होऊ नये यासाठी प्रयत्न झाला. पण ते प्रसिद्ध केले गेले. आता तिसऱ्यांदा दिनांक 9 जुलै 2010 रोजी सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला चपराक दिली. ही चपराक राज्य सरकारला नाही. छत्रपती शिवाजी महाराजांसंबंधी आदर असणाऱ्या कोट्यवधी माणसांच्या भावनांना ठेच पोचणारी आहे. देश आपलाच आहे. कायदे आपलेच आहे. नागरिक आपलेच आहेत. कायदे बनविणारे आपलेच आहेत. कायदेमंडळे आपलीच आहेत. असे असताना आपल्याच देशामध्ये, आपल्या आराध्य दैवतेबद्दल विकृत गोष्ट होते. तिचे समर्थन कोर्टाच्या माध्यमातून केले जाते, ते चुकीचे आहे.

सभापती महोदय, माझ्याकडे एक कात्रण आहे. 9 जुलै रोजी निकाल लागला. त्यावेळी उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्री.बी.जी.कोळसे-पाटील यांनी जे मत व्यक्त केले ते मी येथे कोट करणार आहे. "विकृत जेम्स लेनच्या पुस्तकावरील बंदी उठविण्याचा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय पूर्णपणे घटनाविरोधी असून तो धक्कादायक आहे." अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली अराजक असा हा निर्णय असल्याचे परखड मत उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती बी.जी.कोळसे-पाटील यांनी व्यक्त केले आहे. जेम्स लेन याने छत्रपती शिवाजी महाराज व माँ साहेब जिजाऊंवरील

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

बदनामकारीक विधाने रस्त्यावर फिरत असताना लोकांत ज्या अफवा आहेत त्यावर आधारित लिहिलेली आहेत, त्याने हे ही मान्य केले आहे. असे असताना सुप्रीम कोर्टाने हा त्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यांचा मूलभूत हक्काचा भाग आहे, असे म्हटलेले आहे. हा निर्णय देताना कलम 19(2) मध्ये जे निर्बंध आहे त्याकडे कोर्टाने पूर्ण दुर्लक्ष केले आहे. आमची महाराष्ट्र सरकारला विनंती आहे की, त्यानी ताबडतोब सुप्रीम कोर्टात चूक दुरूस्त करण्यासाठी अर्ज करावा व हा निर्णय बदलून घ्यावा. हे उच्च न्यायालयाच्या माजी न्यायधिशांनी व्यक्त केलेले मत आहे. खरे म्हणजे 9 जुलैला ज्या दिवशी निकाल लागला त्याच दिवशी राज्याचा मुख्यमंत्र्यांनी प्रतिक्रिया द्यायला पाहिजे होती. राज्यभर असंतोषाचा ठोम उसळला. जेम्स लेनचे पुतळे जाळायला लागले. लोक लाथाबुक्क्यांनी त्याला मारायला लागले. त्याला फासावर लटकावयला लावले. लोक मंत्र्यांच्या गाड्या अडवायला लागले. मंत्र्यांना घेराव घालायला लागले. त्यावेळी महाराष्ट्रच्या सरकारला जाग आली आणि मग मुख्यमंत्री यांनी सांगितले की, या प्रकरणासंबंधी आम्ही कायदे तज्ज्ञांचा सल्ला आम्ही घेऊ. मुख्यमंत्री नांदेड येथे गेले असता त्यांनी पत्रकारांना असे सांगितले की, अमेरिकन लेखक श्री.जेम्स डब्ल्यू लेन यांच्या "शिवाजी, द हिंदू किंग इन इस्लामिक इंडिया" या वादग्रस्त पुस्तकावरील बंदी उठविण्याच्या सर्वोच्च न्यायालयाने जो निर्णय घेतला आहे. राज्य सरकारने या पुस्तकाच्या विरोधात बंदी घातली होती.

यानंतर श्री.अजित....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखनासाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर..

या पुस्तकातून छत्रपती शिवाजी महाराजांची बदनामी होत असल्याचा आक्षेप राज्य सरकारने घेतला होता. न्यायालयाच्या निर्णयानंतर सर्वच राजकीय पक्षांनी हे पुस्तक विकू देणार नाही असा आक्रमक पवित्रा घेतला, त्यामुळे आणखी हे प्रकरण चिघळण्याची शक्यता आहे. माननीय मुख्यमंत्री म्हणतात, आम्हाला न्यायालयाच्या निर्णयाचा आदर आहे. जेम्स लेनच्या पुस्तकाबाबत महाराष्ट्रातील जनतेच्या भावना तीव्र असल्याचे माननीय मुख्यमंत्री श्री.अशोक चव्हाण यांनी सांगितले. त्यामुळे कायद्याचा अभ्यास करुन योग्य तो निर्णय घेण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. माननीय सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आल्यानंतर माननीय मुख्यमंत्री महोदयांना जाग आली आणि त्यांना वाटले की, हे काही चांगले नाही. मी जास्त काही बोलणार नाही. हा विषय चर्चा करण्यासारखा नाही. परंतु महाराष्ट्रातील नव्हे तर देशातील कोट्यावधी जनतेला समजले पाहिजे की, यामध्ये राज्य सरकारची भूमिका काय आहे ? छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल जो मजकूर लिहिला आहे तो मजकूर काढून टाकला जाणार आहे की तसाच ठेवला जाणार आहे ? सर्वोच्च न्यायालय पुस्तकावरील बंदी उठवित आहे तर निदान त्या पुस्तकातील पृष्ठ क्रमांक 93 वरील मजकूर काढून टाकावा अशी विनंती आपल्या वकिलांना सर्वोच्च न्यायालयात केली असती तर सर्वोच्च न्यायालयाने विनंती मान्य देखील केली असती. परंतु अशाप्रकारची विनंती देखील करण्यात आली नाही. जेम्स लेनने पुस्तकात काय लिहिले आहे हे अजूनही महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेला माहीत नाही. जेव्हा माहीत होईल तेव्हा संपूर्ण महाराष्ट्र पेटल्याशिवाय राहणार नाही हे सरकारने लक्षात घेतले पाहिजे. आम्ही चर्चा जास्त लांबवणार नाही. सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिलेला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान झालेला आहे. मॉ जिजाऊसाहेबांचे चारित्र्य हनन झालेले आहे. या सर्व गोष्टींची आपण दखल घेतली नाही तर महाराष्ट्रातील दहा कोटी जनता षंड आहे, नपुसंक आहे अशाप्रकारचा एक मेसेज जाईल. असा मेसेज जाऊ द्यायचा नसेल तर योग्य वेळी कारवाई झाली पाहिजे.

माननीय मुख्यमंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, आपल्या बाजूच्या सदस्यांच्या भावना देखील तीव्र आहेत. आमच्यादेखील भावना तीव्र आहेत. हा कोणा एका पक्षाचा विषय नाही.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर..

छत्रपती शिवाजी महाराज रयतेचे आराध्य दैवत आहे. या आराध्य दैवतेचा अपमान होणार असेल तर तो कदापि सहन केला जाणार नाही. वेळ पडल्यास कायद्यामध्ये दुरुस्ती करावी. वाटल्यास कठोर निर्णय घ्यावा. परंतु ताबडतोब पुस्तकातील बदनामीकारक मजकूर काढून टाकला पाहिजे अशी आमची या प्रस्तावाच्या माध्यमातून मागणी आहे. प्रस्ताव आणण्याचा मूळ हेतू हा की, या प्रकरणी राज्य सरकारने आपली भूमिका स्पष्ट केली पाहिजे. कोण हा जेम्स लेन ? सन 2004 च्या निवडणुकीत जेम्स लेनच्या नावावर आपण मत मिळविली. त्यास मुसक्या बांधून आणू असे गृह मंत्र्यांनी सांगितले. त्यास मुसक्या बांधून आणण्याचे सोडाच, परंतु त्याने लिहिलेल्या पुस्तकावर सर्वोच्च न्यायालयाने शिक्कामोर्तब केलेले आहे. तेव्हा ॲड.गुरुनाथ कुलकर्णी आपण काय करणार आहात ? छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान आपण सहन करणार आहात काय ? राष्ट्रमाता जिजाऊसाहेबांचे चारित्र्यहनन आपण सहन करणार आहात काय ? जेम्स लेन यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि जिजाऊसाहेबांबद्दल जे लिहिले ते आपल्याबद्दल लिहिले असते तर काय वाटले असते याचा देखील थोडा विचार करावा. मी जास्त वेळ घेणार नाही. या प्रस्तावासाठी फक्त एक तास दिलेला आहे. या प्रकरणी सरकारने आपली भूमिका स्पष्ट करावी. सरकारने सर्वोच्च न्यायालयास विनंती करावी की, पुस्तकावरील बंदी उठविली तरी कोणत्याही परिस्थितीत पृष्ठ 93 वरील मजकूर काढून टाकावा. कारण पृष्ठ 93 वरील पानाव्यतिरिक्त अन्य कोठेही आक्षेपार्ह मजकूर लिहिलेला नाही अशी माझी माहिती आहे. माझी माहिती कदाचित चुकीची असू शकते. दुसऱ्या बाजूने विचार केल्यास हे पुस्तक इंग्रेजी भाषेत लिहिलेले असल्यामुळे संपूर्ण जगाला छत्रपती शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वाबद्दल माहिती मिळेल. परंतु कोणत्याही परिस्थितीत पुस्तकातील आक्षेपार्ह मजकूर टाकून टाकलाच पाहिजे अशी माझी विनंती आहे. या पुस्तकाच्या निमित्ताने जो काही कठोर निर्णय घ्याल त्या कठोर निर्णयासोबत विरोधी पक्ष सुध्दा राहील हेही मी या निमित्ताने सांगून माझे भाषण पूर्ण करतो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

अशुद्धीत पत्र / शुद्धीपत्र नाही

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी) : मी सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, या चर्चेसाठी एक तासाची वेळ ठरलेली आहे. या प्रस्तावावर बोलण्यासाठी माझ्याकडे 14 सन्माननीय सदस्यांची नावे आलेली आहेत. तेव्हा प्रत्येक सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात आपले विचार मांडावेत जेणेकरुन अन्य सन्माननीय सदस्यांना देखील आपले विचार मांडण्याची संधी मिळेल.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हुसेन दलवाई : सभापती महोदय, विरोधी पक्षातील एका सन्माननीय सदस्यांने भाषण केल्यानंतर सत्ताधारी पक्षातील सदस्याला बोलण्याची संधी मिळाली पाहिजे.

श्री.दिवाकर रावते :सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री जर या प्रस्तावाला उत्तर देणार असतील तर सत्ताधारी पक्षातील सन्माननीय सदस्यांनी बोलणे गैर आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या विषयावरील चर्चा कधी घ्यावयाची हे ठरविण्यासाठी सभागृहाची बैठक तहकूब करण्यात आली आणि माननीय सभापतींच्या दालनात चर्चा झाली होती त्यावेळी प्रत्येक पक्षातील एका सन्माननीय सदस्यांनी बोलावे असे बंधन घालण्यात आले होते त्याचबरोबर ज्यांनी नियम 289 अन्वये प्रस्ताव दिला आहे त्याना बोलण्यासाठी अग्रक्रम दिला जाईल असेही ठरविले गेले होते.

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी) : ठीक आहे. आता सन्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते यांनी भाषण सुरु करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2..

श्री.दिवाकर रावते (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय,जेम्स लेन यांनी लिहिलेल्या पुस्तकावरील बंदी सुप्रीम कोर्टाने उठविल्याच्या संदर्भात या ठिकाणी मांडण्यात आलेल्या प्रस्तावावर बोलण्यासाठी मी उभा आहे. सभापती महोदय, जेम्स लेनच्या पुस्तकात त्याने जो काही उल्लेख केला होता त्याबाबतीत त्याला या पूर्वीही दोष दिला होता तसेच पूर्वीही जोंडे मारले होते आणि आजही मारत आहोत. जेम्स लेन याने छत्रपती शिवाजी महाराजांच्या चारित्र्यावर जे काही शिंतोडे उडविण्याचा प्रयत्न केला होता त्याबद्दल जेम्स लेनचे पुतळे त्याही वेळेस जाळले होते तसेच भांडारकरांची इन्स्टिटयूट तोडण्यात आली होती .या सदनामध्ये त्यासंबंधीची चर्चासुध्दा झाली होती. जेम्स लेनच्या पुस्तकावर राज्य सरकारने बंदी घातली होती परंतु ही बंदी सुप्रीम कोर्टाने उठवली होती त्या संदर्भातील तांत्रिक आणि कायद्यासबंधीचा विषय आहे. या प्रकरणी मारामा-या होत आहेत परंतु त्या संदर्भात गृह विभागाशी संबंधित आजचा विषय नाही.

सभापती महोदय, सर्वोच्च न्यायालयाने या पुस्तकावरील बंदी उठविण्याचा निर्णय दिला असल्यामुळे त्यासंबंधीची या सदनामध्ये चर्चा उपस्थित केलेली आहे. ॲडव्होकेट जनरल यांच्या संदर्भातील जो विषय आहे तो वादातीत आहे. ॲडव्होकेट जनरल यांनी या सदनामध्ये एकाच प्रकरणात दोनदा मत दिले होते त्याची नोंद आमच्याकडे आहे.तो एक वेगळा विषय आहे. अनुशेषाच्या बाबतीत त्यांनी एकदा एक मत दिले होते आणि दुस-या वेळेस कॉन्ट्रीडिक्टरी दुसरे मत दिले होते.ॲडव्होकेट जनरल श्री.वाहनवटी यांनी एक मत दिले होते आणि त्याच मतावर त्यांनी दुसरे मत दिले होते. सरकारच्या बाजूने त्यांना मत द्यावेच लागते. ही इज पेड बाय द गव्हर्नमेन्ट.सरकारचे मीठ खात असल्यामुळे ते खाल्लेल्या मीठाला जागतात व वकिली गहाण ठेवून काम करतात .

सभापती महोदय, आता जे ॲडव्होकेट जनरल आहेत त्यांच्यावर माझा आक्षेप आहे. या पूर्वी मी आमदार होतो. परंतु नंतर मी पुन्हा निवडून आलो आहे.मी पुन्हा शपथ घ्यावयास नको होती.परंतु माझी नवीन टर्म सुरु झालेली असल्यामुळे मी पुन्हा शपथ घेतली होती. माझे प्रश्न लागले नाहीत. दिनांक 7 जुलै 2010 पर्यंत माझी मुदत होती त्यानंतर 10 जून 2010 ला मी पुन्हा निवडून आलो. आमदारकीचा माझा पुर्नजन्म झाला होता त्यामुळे मला पुन्हा शपथ घ्यावी लागली ही कायद्यातील तरतूद असून तांत्रिक बाब आहे .त्यामुळे ही तांत्रिक बाब पूर्ण केल्याशिवाय त्याला अर्थ राहत नाही. ही बाब कायदेशीर असल्यामुळे जी बाब आम्हाला लागू आहे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ....

तीच ॲडव्होकेट जनरल यांनासुध्दा लागू आहे.सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनथ कुलकर्णी या विषयावर नक्की प्रकाश टाकू शकतील असे मला वाटते. ही कायदेशीर बाब असून ती कोणालाही नाकारता येणार नाही.राज्यात नवीन सरकार आल्यानंतर ॲडव्होकेट जनरल यांनी राजीनामा द्यावयाचा असतो परंतु ॲडव्होकेट जनरल यांनी राजीनामा दिला नाही.विद्यमान ॲडव्होकेट जनरल यांनी 2009 मध्ये नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर राजीनामा द्यावयास पाहिजे होता आणि पुन्हा त्यांची नव्याने नेमणूक करावयास पाहिजे होती. ज्याप्रमाणे निवडून आल्यानंतर पुन्हा आमचा शपथविधी झाला त्याप्रमाणे ॲडव्होकेट जनरल म्हणून पुन्हा आपल्याला तीच व्यक्ती हवी असेल तर त्यांची पुन्हा नव्याने नियुक्त करावी लागते. त्यासाठी नवीन जी.आर .काढावा लागतो.परंतु त्याप्रमाणे करण्यात आले नाही.ॲडव्होकेट जनरल म्हणून त्यांनी आपले काम सुरु ठेवण्याच्या बाबतीत संकेताच्या विरुध्द तुम्ही काम केले होते.या राज्याचे ॲडव्होकेट जनरल श्री.वहानवटी हे आता केन्द्रामध्ये गेले आहेत. आताचे ॲडव्होकेट जनरल हे त्यांचे विश्वासू सहकारी आहेत. त्यामुळे श्री.वहानवटी जे काही म्हणतील त्याला आताचे ॲडव्होकेट जनरल "होय" म्हणतील. केन्द्र जे काही म्हणेल ते यांनाही मान्य राहणार आहे.याबाबतीत आम्ही अनुभव घेतलेला आहे.श्री.वहानवटी यांच्या म्हणण्याला मान डोलवणारे आताचे ॲडव्होकेट जनरल आहेत त्यामुळे केन्द्र सरकारने जे काही ॲफिडेव्हीट सुप्रीम कोर्टात सादर केलेले आहे ते नाकारण्याची हिंमत आताचे ॲडव्होकेट जनरल करणारच नाहीत.

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

उच्च न्यायालयामध्ये आमचे ॲडव्होकेट जनरल हे बिल्डरच्या झोपडपट्टी पुनर्वसनाच्या विरोधात स्वत: दावा लढले. ॲडव्होकेट जनरल सरकारच्या विरोधात बिल्डरच्या वतीने लढले. त्याचा परिणाम असा झाला की, ॲडव्होकेट जनरल पदावरील व्यक्तीने शासनाच्या विरोधात याचिका द्यावी हे कोणत्या नियमात बसते? असे न्यायालयाने त्यांना विचारले. सरकारचे ॲडव्होकेट जनरल हे सरकारच्या विरोधात लढतात तेव्हा न्यायालय आमच्या ॲडव्होकेट जनरलवर ताशेरे मारते. त्यांचे आताचे अस्तित्व हे कायद्याला धरुन नाही. मी जोपर्यंत सभागृहात शपथ घेत नव्हतो तोपर्यंत मी आमदार नव्हतो. जो सरकारच्या विरोधात पैशासाठी बिल्डरच्या बाजूने लढतो, आणि त्याच्यावर न्यायालय ताशेरे मारते. त्यावरुन आमच्या असे लक्षात आले की, आम्ही जेव्हा जेव्हा उच्च न्यायालयामध्ये जातो तेव्हा तेव्हा सतत आपल्याला अपयश येते. त्यामध्ये बेस्ट फाईव्हचा मुद्दा असेल, जेम्स लेनचे प्रकरण असेल. यामध्ये कुणी तरी कर्ता-करविता विधी व न्याय विभागाच्या वकिलामार्फत हे सर्व प्रकरण शिजवीत आहे.

हे जे घडले आहे त्याच्या बाजूने सरकारमध्ये बसलेली सर्व मंडळी आहेत असे मी कधीही म्हणणार नाही. किंबहुना, आमच्या भावनांपेक्षा माननीय महसूल मंत्री श्री. नारायण राणे यांनी म्हटल्याप्रमाणे एक टक्का त्यांच्या भावना जास्त आहेत. ते टक्क्यामध्येच बोलतात त्यामुळे ते एक टक्का बोलले. आमच्यापेक्षा त्यांच्या भावना एक टक्का जास्त आहेत हे आम्ही नाकारले नाही, आणि आम्ही तुम्हाला दोष दिला नाही. "वयम पंचाधिकम शतम" म्हणून आपण सर्वजण या प्रश्नावर लढत आहोत असे माझे वाक्य आहे. अशावेळी या राज्याच्या अस्मितेकरिता तुमच्या लढयाबरोबर आम्ही लढतो आणि आमच्याबरोबर तुम्ही लढता असे आम्ही ज्यावेळी विरोधी पक्षांच्या बाकावरुन बोलतो त्यावेळी सरकारच्या बाजूने निंदनीय पध्दतीने माननीय श्री. नारायण राणे यांनी जी वक्तव्ये केली ती अत्यंत अश्लाघ्य होती, ती मी मांडणार आहे. बोलण्याच्या ओघामध्ये, खिजविण्याच्या ओघामध्ये सर्व काही बोलता येते, परंतु अपुऱ्या माहितीवर कधी-कधी उताणेही पडावे लागते. त्यामुळे ॲडव्होकेट जनरलच्या विषयावर मी असे काय म्हणालो? सभापती महोदय, जेम्स लेनच्या पुस्तकावरील बंदी उठविली गेली ती कां उठविली गेली हे मला अजून समजले नाही? माननीय न्यायालयाच्या कोणत्याही निर्णयावर टिका करण्याचा मला पूर्ण अधिकार आहे. परंतु मला न्यायालयावर टिका करता येत नाही. ॲड. गुरुनाथजी कुलकर्णी माझे काही चुकत असेल तर मला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ KTG/

श्री. दिवाकर रावते....

सांगा. आपण आमच्या या सभागृहाचे ॲडव्होकेट जनरल आहात. घटनेच्या 14 व्या कलमानुसार हा निर्णय दिला गेला आहे. हा निर्णय दिला गेलाच कसा? त्यावेळी मी घटनेचे 14 वे कलम उघडून वाचले. त्यामध्ये असे म्हटले आहे की, "राज्य कोणत्याही व्यक्तीस भारताच्या राज्य क्षेत्रामध्ये कायद्यानुसार समानता अथवा कायद्याचे संरक्षण नाकारीत नाही". मुळात माझा असा प्रश्न आहे की, हा जेम्स लेन भारतीय नागरीक आहे काय?

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : आर्टिकल 14 हे इक्वॅलिटीच्या बाबतीत आहे. आणि आर्टिकल 19 नुसार त्याठिकाणी विविध प्रकारचे स्वातंत्र्य दिले आहे.

श्री. दिवाकर रावते : मी इक्वॅलिटीचाच विषय मांडीत आहे. हे मान्य आहे, परंतु कुणाला"? भारतीय नागरीकाला आहे. या देशामध्ये जो जन्मला त्याच्याकरिता ही घटना बनविली आहे. ही घटना ओबामा यांच्याकरिता नाही. जगातील कोणत्याही माणसाकरिता ही घटना बनविली नाही. याचे गांभीर्य आपण लक्षात घ्या. या घटनेतील तरतुदीप्रमाणे जर उद्या घडले तर बांगला देशातील नागरिकांना सुध्दा आपण समानता देणार काय? या जेम्स लेनचा आणि आमचा संबंध काय? एक संशोधक म्हणून परदेशातून आला, संशोधन केले, गरळ ओकून हा हरामखोर निघून गेला. आणि अशावेळी माननीय सर्वोच्च न्यायालय घटनेतील या तरतुदीप्रमाणे जर त्यांना संरक्षण देणार असेल तर आमचे ॲडव्होकेट जनरल काय करीत आहेत? त्यांनी माननीय सर्वोच्च न्यायालयाला विचारले काय? ही घटना भारतीय नागरिकांकरीता लागू आहे, जेम्स लेनकरिता लागू नाही. ही गोष्ट न्यायालयामध्ये कां सांगण्यात आली नाही याचे विधी व न्याय खात्याकडून आम्हाला उत्तर मिळाले पाहिजे. जर परदेशातील नागरिकांना आमच्या देशातील घटना लागू व्हावयास लागली तर आज परप्रांतियांच्या घुसखोरीने महाराष्ट्राचे वाटोळे झालेच आहे. आवो जावो, तुम्हारा राज. कुठले बंगला देशी, फंगला देशी उदध्वस्त लोक आपल्या देशामध्ये येतील आणि आपली ही घटना घेऊन आमच्याच उरावर बसतील.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

सभापती महोदय, हा अत्यंत गंभीर असा विषय विधी व न्याय विभागाने का सांगितला नाही? हा मूलभूत प्रश्न आहे. माननीय मंत्रिमहोदय श्री. नारायण राणे यासंदर्भात सकाळी बोलले. त्यामुळे आता ते या ठिकाणी आवर्जून उपस्थित झालेले आहेत. म्हणून मला त्यांना विचारावयाचे आहे. सरकारची बाजू मांडताना ते या ठिकाणी तळमळीने बोलले होते. त्यांनी तळमळीने असे म्हटले होते की, विरोधी पक्षापेक्षा एक टक्क्याने आमची भावना जास्त आहे. ते एक टक्काच म्हणाले त्यांनी दहा टक्के म्हटले नाही. त्यानंतर त्यांनी जे सांगितले ते माझ्या दृष्टीने महत्वाचे आहे. त्यांनी असे म्हटले की, "गेले दोन-तीन दिवस हे असे कां घडले याचा आम्ही शोध घेत आहोत." सर्वोच्च न्यायालयाने कर्तृत्ववान विधी व न्याय विभागाच्या पार्श्वभागावर जेव्हा कोर्टाचा ठसा उमटवला तेव्हा सरकारची धावपळ सुरु झाली. सरकारमध्ये असलेल्या मंत्र्यांबद्दल तसेच शासनाच्या भावनेबद्दल विरोधी पक्षाच्या बाकावरुन किंवा इतर कोणीही अनादर व्यक्त केला नाही. सरकार चालवत असताना तुम्ही कितही प्रामाणिकपणे चालवत असलात तरी अधिकारी त्यांच्या पध्दतीने वागतात आणि शासनाला तोंडावर उताणे पाडतात, ही यातील महत्वाची गोष्ट आहे. शासन जर दोन-तीन दिवस शोध घेत होते तर त्याबाबतीत माझा प्रश्न आहे. सर्वोच्च न्यायालयात कोण गेले? तर सरकार गेले. कशामुळे गेले? तर मुंबईच्या उच्च न्यायालयामध्ये अभिव्यक्ती स्वातंत्र्यांकरिता संघराज रुपवते आणि श्री. पटवर्धन यांनी याचिका दाखल केली. श्री. संघराज रुपवते म्हणजे आदरणीय रुपवते साहेबांचे चिरंजीव. मला त्यांच्याबद्दल व्यक्तिगत काही बोलावयाचे नाही. पण या महाराष्ट्राच्या मातीत जन्मलेल्या माणसांना छत्रपती शिवरायांच्या अवमानाबद्दल काही वाटत नाही आणि ते सर्वोच्च न्यायालयात जातात, ही शरमेची बाब आहे. उच्च न्यायालयाने सरकारच्या विरोधामध्ये जेम्स लेनच्या पुस्तकावरील बंदी उठविली. त्यानंतर त्याच्या विरोधात शासन सर्वोच्च न्यायालयात गेले. मला माननीय मंत्रिमहोदय, श्री. नारायण राणे यांना असा प्रश्न विचारावयाचा आहे की, 2004-2005 ला या पुस्तकावर बंदी घालण्यात आली. मला नक्की तारीख आठवत नाही पण साधारणत: 2005 च्या सुमारास उच्च न्यायालयाने ती बंदी उठविली. महाराष्ट्रात प्रचंड असा असंतोष निर्माण होईल आणि आता जी परिस्थिती निर्माण झालेली आहे तशा प्रकारची परिस्थिती निर्माण होऊ नये म्हणून आधीच सर्वोच्च न्यायालयात जाऊन बंदी उठविण्याला स्थगिती घेतली. म्हणजे शासनाची बंदी चालू होती. प्रश्न असा आहे की, 2005 ते 2010 पर्यंतच्या मधल्या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

काळात या खात्याच्या माननीय मंत्रिमहोदयांनी मॉनिटरिंग करावयास पाहिजे होते. याबाबतीत विधी व न्याय विभागाच्या संबंधित वकिलांनी काय केले हे आम्हाला समजून घ्यावयाचे आहे. सन्माननीय मंत्रिमहोदयांनी यासंदर्भात किती बैठका घेतल्या? सभापती महोदय, सर्व माननीय मंत्रिमहोदयांच्या दृष्टीने हा गंभीर विषय आहे. शासन चालवत असताना अधिकारी किती गाफीलतेने तोंडघशी पाडतात हा गंभीर विषय आहे. त्या संदर्भात शासनाला निर्णय घ्यावयाचा आहे. केवळ समोरासमोर चर्चा करुन चालणार नाही. छत्रपती शिवाजी महाराजांच्या बदनामीबाबतचे जे पाप आपल्या डोक्यावर आलेले आहे त्याला तुम्हाला आणि आम्हाला सामोरे जावे लागत आहे. त्यासाठी जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांच्या बाबतीत काय कारवाई करणार याचे उत्तर माननीय मुख्यमंत्र्यांनी या ठिकाणी द्यावे. सभापती महोदय, या सगळया प्रकरणाच्या बाबतीत महाराष्ट्र पेटून उठला होता. होय, भांडारकर संस्थेची तोडफोड केली असे न सांगता जनतेच्या भावना लक्षात घेऊन या पुस्तकाच्या अमेरिकेतील प्रकाशकांनी आम्ही तुमची माफी मागतो. आम्ही हे पुस्तक वितरणातून मागे घेतो. असे लेखी अधिकृत पत्र शासनाला पाठविलेले आहे. हे पत्र घेऊन शासन सर्वोच्च न्यायालयात गेले असते आणि सांगितले असते की, या पुस्तकावरील बंदीचा प्रश्न नाही. आता हे प्रकाशन मागे घेतलेले आहे. सभापती महोदय, अशा प्रकारचा खुलासा विधी व न्याय विभागाने सर्वोच्च न्यायालयाला दिला काय? विधी व न्याय विभागाने तसा खुलासा दिला नसेल तर तो गंभीर गुन्हा आहे. आज या प्रश्नाच्या बाबतीत या सदनाचा वेळ घेण्यात येत आहे. महाराष्ट्रात आगडोंब उसळलेला आहे तो उसळला असता काय? प्रकाशकाचा माफीनामा, प्रकाशन मागे घेण्याचे लेखी दिलेले पत्र विचारात घेतले तर आज ते पुस्तक अस्तित्वात नाही.

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

यानंतर श्री. बरवड...

श्री. दिवाकर रावते .....

प्रश्न असा निर्माण होतो की, यासंदर्भामध्ये विधी खात्याने काय केले ? आपली जागरुकता किती नव्हती हे मी सांगण्याचा प्रयत्न करीत आहे. कृपाकरुन आपल्याला दोष देत आहे असे समजू नका. दोष असेल तर तो स्वीकारण्याची तयारी आपण ठेवली पाहिजे. आपण राज्यकर्ते आहात. आपल्याकडून चुका होत नाहीत असे नाही. विरोधी पक्ष ते सांगण्याचा प्रयत्न करतो त्यावेळी त्याला राजकारण म्हणून संबोधण्याचा प्रयत्न करु नका. हा व्देष आहे किंवा हे धार्मिक आहे हा विषय मी मांडत नाही. या घटना हिंदुस्थानामध्ये घडल्या असतील तर हिंदुस्थान सरकारला हे ठणकावून सांगण्याची जबाबदारी आपली होती. आजच्या 'सामना' दैनिकामध्ये यासंदर्भात एक अग्रलेख आलेला आहे. त्या अग्रलेखामध्ये फार चांगले म्हटले आहे. त्यामध्ये असे म्हटले आहे की, "महंमद पैगंबर व इस्लामच्या बदनामीसंदर्भात खळबळ उडविणाऱ्या सर्व इंग्रजी पुस्तकांवर आजही हिंदुस्थानात बंदी आहे. सलमान रश्दीच्या 'द सॅटॅनिक व्हर्सेस'वर बंदी आहेच व या बंदीसाठी लाखो मुसलमान जिहादचे नारे देत मुंबईच्या आझाद मैदानावर तेव्हा जमले होते. सरकारने त्यांच्या धर्मांध झुंडशाहीपुढे अखेर गुडघे टेकले व धार्मिक सलोखा बिघडेल तसेच मुसलमान समाजाच्या भावना दुखावतील या सबबीखाली पुस्तकावर बंदीहुकूम बजावला. डेन्मार्कमध्ये पैगंबरावर काढलेल्या एका व्यंगचित्रामुळे हिंदुस्थानातील मुसलमानांच्या भावना दुखावतील म्हणून या कुणीही न पाहिलेल्या एका व्यंगचित्रावरही इकडे बंदी घातली पण शिवरायांच्या बाबतीत मात्र वेगळा न्याय." आपल्याकडे काही संबंध नव्हता पण बंदी घातली. हे सत्य आहे. त्यांच्या भावना भडकतील म्हणून संपूर्ण हिंदुस्थानामध्ये जी बंदी घातली जाते ती शिवरायांच्या बाबतीत महाराष्ट्रात बंदी आणि बाकी ठिकाणी बंदी नाही असे योग्य होईल काय ? या भारत सरकारने अशा प्रकारची बंदी घालून मुस्लीम समाजाच्या भावना दुखावल्या जातील एवढी जी जाणीवपूर्वक काळजी घेतली तशी मराठी माणसांच्या भावनांची, महाराष्ट्राच्या अस्मितेची काळजी घेतली जात नाही. मग असे वाटते की, दंगाधोपा केल्याशिवाय यांना जाग येत नाही का, हा प्रश्न निर्माण होतो. Are you compelling the people to come on streets? लोकांना भावना भडकवून हे करावयास लावणार आहात काय ? जो न्याय त्यांना आहे तो न्याय या हिंदुस्थानातील आम्हाला का नाही, हा प्रश्न आम्हाला भेडसावतो. मुसलमानांना न्याय दिल्याचे आम्हाला दु:ख नाही. आपण सर्वधर्मसमभाव

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG

श्री. दिवाकर रावते ....

याबाबत बोलता. सर्व धर्माला सन्मान दिला पाहिजे. मी घटनेतील जे 14 वे कलम वाचले त्याच्याखाली तेच आहे. त्यामध्ये धार्मिक संबंध आहे. 15 वे कलम तेच आहे. सर्वांच्या धर्माला समान मान आणि सन्मान देत असताना शिवरायांबद्दल तुमच्या आणि माझ्यासह या महाराष्ट्रातील प्रत्येक घरामध्ये हा प्रचंड असा स्फोटक चिडीचा जो उद्रेक निर्माण झाला आहे, जो ज्वालामुखी भडकतो आहे तो कधी फुटून रस्त्यावर येईल याची वाट बघत बसला आहात काय, हा प्रश्न आहे. म्हणून या चर्चेच्या निमित्ताने मी एवढेच सांगू इच्छितो की, जेम्स लेनच्या विषयाच्या संदर्भात सरकारने योग्य पावले उचलली होती. बंदी घातली होती. न्यायालयाने ती बंदी अयोग्य ठरविली असेल तर त्याबाबत कायदेशीर कार्यवाही काय करावयाची हा पुढचा विषय आहेच पण इतर धर्माच्या बाबतीत भावना दुखावतील म्हणून बंदी घातली जाते. बांगला देशची एक लेखिका आहे तिला हिंदुस्थानामध्ये तोंड लपवून फिरावे लागते. तिला संरक्षण देण्यासाठी कोणताही प्रांत तयार होत नाही, ही परिस्थिती आहे. अशा वेळेला हिंदुस्थान सरकारने संपूर्ण देशामध्ये बंदी घातली पाहिजे ही परिस्थिती आहे. महाराष्ट्रामध्ये हे पुस्तक विकले जाणार नाही, कोणत्याही स्टॉलवर येणार नाही असे माननीय मुख्यमंत्री म्हणाले त्याबद्दल त्यांना धन्यवाद देतो पण हे पुस्तक हिंदुस्थानातील कोणत्याही बुक स्टॉलवर असता कामा नये म्हणून या पुस्तकावर संपूर्ण देशात बंदी घातली गेली पाहिजे याकरिता हे सरकार काय करणार आहे, हा प्रश्न या ठिकाणी निर्माण होतो. या पुस्तकाने या महाराष्ट्रामध्ये अत्यंत लांच्छनास्पद परिस्थिती तुम्हाला आणि आम्हाला असह्य पध्दतीने भोगावी लागत आहे. वेदना निर्माण होत आहेत. याबाबतीत सरकार म्हणून दोष आपल्यावर घ्यावयाचा की नाही हे आपण ठरवावे पण जो अधिकारी याला जबाबदार आहे त्या अधिकाऱ्यावर कारवाई आपण जाहीर करणार की, नाही हा प्रश्न निर्माण होतो. नाही तर चर्चा झाली, उत्तर झाले, तुम्ही तुमच्याकडे आणि आम्ही आमच्यायकडे, उद्यापासून कामाला सुरुवात, कसली अस्मिता आणि कसले भांडण, कसला तंटा ? असे होणार नाही. आज संपूर्ण गावागावामध्ये केवळ पक्ष नाही तर सर्वच लोक तीव्रतेने याचा निषेध करण्याकरिता जेम्स लेनचा पुतळा जाळत आहेत. या सरकारच्या विरोधात व्यक्त केलेल्या प्रतिकात्मक भावना आहेत.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

या पुस्तकाचा निषेध आपण सर्वांनीच केला पाहिजे. हा सरकारचा दोष आहे, त्याचा दोष आहे असे मी म्हणणार नाही. या घटनेचा निषेध करण्यासाठी राष्ट्रवादी पक्ष रस्त्यावर उतरला आहे काय, काँग्रेसचे कार्यकर्ते उतरले आहेत का ? कोणत्या जिल्हयात या दोन्ही पक्षांनी संताप व्यक्त केला आहे ते सांगावे. उलट विरोधी पक्ष आपला संताप व्यक्त करीत आहे. हा संताप कोणता पक्ष म्हणून नाही तर निषेध व्यक्त केला जात आहे. हा संताप सरकारमध्ये सामील असलेल्या पक्षाकडून रस्त्यावर उतरुन व्यक्त होताना दिसत नाही. म्हणून कळत नकळत ही जबाबदारी शासनावर येत आहे. ही वेळ विधी व न्याय खात्याने माननीय मुख्यमंत्र्यांवर आणली आहे. त्यामुळे याला जबाबदार असणारे विधी व न्याय खात्याचे मंत्री श्री.राधाकृष्ण विखे-पाटील यांनी जबाबदारी स्वीकारतो आणि राजीनामा देतो असे सांगावे. केंद्रातील दोन मंत्र्यांनी राजीनामे दिले होते, त्यापैकी एका मंत्र्यांचा राजीनामा स्वीकारला गेला आणि एका मंत्र्यांचा राजीनामा स्वीकारला नाही. या प्रकरणाची मंत्री महोदय श्री.राधाकृष्ण विखे-पाटील यांनी जबाबदारी स्वीकारावी. छत्रपती शिवाजी महाराजांचे चारित्र्यहनन करणारा निर्णय माझ्या कारकीर्दीमध्ये होत असेल, माझ्या खात्याच्या अपयशामुळे सरकारवर ही वेळ येत असेल तर त्याची नैतिक जबाबदारी स्वीकारुन मी राजीनामा देतो असे सांगावे. या निमित्ताने आम्ही राज्याच्या कायदा मंत्र्यांचा राजीनामा मागत आहोत. धन्यवाद, जय हिंद, जय महाराष्ट्र

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते यांनी जो प्रस्ताव मांडलेला आहे त्याच्यावर बोलण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, जेम्स लेन या परदेशी लेखकाने 2003 साली 'द हिंदू किंग इन इस्लामिक इंडिया' या नावाचे पुस्तक लिहिले. ते प्रकाशित झाल्यानंतर या महाराष्ट्रामध्ये आगडोंब उसळला. छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल व जिजामाता यांच्याबद्दल या पुस्तकामध्ये अत्यंत वाईट व गलिच्छ शब्दामध्ये बदनामीकारक लिखाण करण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांना मानणा-या कोणत्याही माणसाला ही बदनामी सहन झाली नाही त्यामुळे मोठया प्रमाणावर उद्रेक झाला, त्या उद्रेकाची दखल महाराष्ट्र शासनाने घेऊन या पुस्तकावर बंदी घातली होती. ती बंदी आता सुप्रीम कोर्टाने उठविली आहे. जेम्स लेन या परदेशी लेखकाने या पुस्तकात जिजाऊ व महाराजांची बदनामी केलेली आहे. ते गृहस्थ या महाराष्ट्रामध्ये व पुण्यामध्ये एक नाही तर सोळा वर्षे वास्तव्याला होते. या 16 वर्षामध्ये त्यांनी ज्या पध्दतीने माहिती घेतली त्या माहितीच्या आधारे पुस्तक लिहिले आहे, त्याला कोणत्याही प्रकारे क्षमा असू शकत नाही. परंतु कोणत्या आधारावर हे पुस्तक लिहिले, कोणाच्या माहितीवरुन पुस्तक लिहिले हा सगळयात महत्वाचा मुद्दा आहे. हा मुद्दा आपण, महाराष्ट्र शासनाने दुर्लक्षित केला आहे. हा मुद्दा बाजूला केला आहे. यासंबंधी आम्ही अनेक वेळा, अनेक लोकांनी मागण्या केल्या आहेत, परंतु त्याकडे दुर्लक्ष केले गेले. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी भाषण केले त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. या पुस्तकावरुन या राज्यात आगडोंब उसळला आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे आपल्या सर्वांचे आदर्श आहेत. त्या आदर्शावर घाला घातला असल्यामुळे कोणी शांत बसू शकत नाही असे सन्माननीय विरोधी पक्ष नेते आणि त्यांचे सर्व सहकारी म्हणत आहेत. शिवाजी महाराजांच्या चारित्र्यहननामुळे ज्यांचा राग अनावर झाला, त्यांच्या भावनेचा उद्रेक झाला आणि त्यांनी भांडारकर नावाच्या संस्थेवर हल्ला केला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.शिगम.....

(श्री. विनायक मेटे...

जेव्हा त्यांनी हल्ला केला. त्यावेळी पैशामध्ये किती नुकसान झाले याचे सगळे मोजमाप झाले आणि चारित्र्य हनन किती मोठे झाले यावर मात्र कोणी चकार शब्दही काढला नाही. उलट आंतरराष्ट्रीय विमानतळावर जेव्हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयाचे अनावरण झाले त्यावेळी तत्कालीन पंतप्रधान सन्माननीय अटल बिहारी वाजपेयी यांनी या पुस्तकावर जी बंदी घातली त्याबाबत निर्भत्सना केली.

श्री. पांडुरंग फुंडकर : बंदीच्या बाबतीत निर्भत्सना केलेली नाही. या सदनामध्ये जेव्हा चर्चा झाली त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे हे या सदनाचे सदस्य नव्हते. तसेच जी व्यक्ती येथे नाही त्या व्यक्तीच्या नावाचा उल्लेख करुन चुकीची विधाने करणे बरोबर नाही. सन्माननीय सदस्य कशाच्या आधारे बोलत आहेत ?

श्री. हुसेन दलवाई : चुकीचे काही नाही. श्री. अटल बिहारी वाजपेयी यांनी विधान केले होते.

श्री. विनायक मेटे : मला बोलू द्यावे. मी चुकीचे काही बोलत नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : या चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांना राजकारण आणायचे आहे काय ?

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य तसेच सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे हे एकाच वेळी बोलत असतात.)

श्री. विनायक मेटे : तत्कालीन पंतप्रधानांनी जेव्हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयाचे अनावरण केले त्यावेळी अशा प्रकारचे वक्तव्य केले होते. छत्रपती शिवाजी महाराजाबद्दल प्रेम असणा-या ख-या कार्यकर्त्यांनी बीडमध्ये जेव्हा गोंधळ घातला त्यावेळी तत्कालीन पंतप्रधानांनी आपले शब्द मागे घेतले. आपण राजकारणासाठी जे प्रेम दाखवता ते आपण बंद केले पाहिजे. फुकटचा पुळका आणणे बरोबर नाही. लांबच्या गोष्टी सांगत नाही.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलू लागतात.)

श्री. दिवाकर रावते : सन्माननीय सदस्यांनी "फुकटचा पुळका" असा शब्द प्रयोग केलेला आहे तो योग्य नाही. तो कार्यवृत्तातून काढून टाकावा.

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते आणि सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे हे एकाच वेळी एकमेकांना उद्देशून बोलत असतात.)

....नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अशोक चव्हाण : सन्माननीय सभापती महोदय, या सर्व प्रकरणामध्ये अनेकवेळा सभागृहात आणि सभागृहाबाहेरही चर्चा झालेली आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, या पुस्तकाच्या संदर्भात जनतेच्या भावना अतिशय तीव्र आहेत आणि या पुस्तकावर बंदी घालण्याबाबत सर्वांचेच एकमत आहे. या अगोदर जी विधाने ज्या ज्या नेत्यांनी केली, कोण काही बोलले असेल, न बोलले असेल It is a matter of records. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते, सन्माननीय विरोधी पक्षनेते यांनी सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांच्या वक्तव्याबद्दल आक्षेप नोंदविलेला आहे. आपण रेकॉर्ड तपासून पहावे. वस्तुस्थिती असेल तर कोणाला आक्षेप घ्यायचे कारण नाही. वस्तुस्थिती नसेल तर आक्षेपार्ह मजकूर रेकॉर्डवरुन वगळण्यास हरकत नाही.

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी) : रेकॉर्ड तपासून घेण्यात येईल आणि आक्षेपार्ह मजकूर असेल तर वगळण्यात येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सन्माननीय सदस्यांनी राजकीय भाषण करु नये.

श्री.विनायक मेटे : मी राजकीय भाष्य अजिबात केलेले नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : आम्ही राजकारण केलेले नाही.

श्री.विनायक मेटे : आम्हीही अजिबात राजकारण करीत नाही. विरोधी पक्षनेत्यांना राजकारण का दिसायला लागले हे मला कळून येत नाही. मी काही चुकीचे बोललेलो नाही. काही मंडळी फुकटचा पुळका आल्यासारखे वागत असतील, बोलत असतील असे म्हणण्यामध्ये काय चुकीचे आहे? ज्यावेळी हे पुस्तक प्रकाशित झाले त्यावेळी बाहेर जो उद्रेक झाला, भांडारकर संस्थेवर जो हल्ला झाला तो का झाला हे सुध्दा समजून घेण्याची गरज होती. हे पुस्तक बदनामीकारक आहे. या पुस्तकाच्या लिखाणासाठी माहिती पुरविणारे सुध्दा जेम्स लेनएवढेच जबाबदार आहेत. जेम्स लेन यांना मदत करणारे जे लोक आहेत त्यांची यादी या पुस्तकामध्ये दिलेली आहे. ज्यांनी ज्यांनी मदत केली त्यामध्ये श्री.दिलीप चित्रे, श्री.बहुलकर, श्री.जयंत लेले, श्री.भास्कर चंदावरकर व अन्य मंडळींचा समावेश आहे. जेम्स लेनसह या लोकांवर सुध्दा शासनाने कारवाई करणे गरजेचे होते. यादृष्टीने शासनाने पुढे पाऊल उचललेले नाही. काही हालचाल केलेली नाही. माझी या निमित्ताने मागणी आहे की, जेम्स लेन यांनी अतिशय विकृत लिखाण केलेले आहे, त्यांना मदत करणारे जे जे कोणी असतील त्या सगळ्यांवर कारवाई केली गेली पाहिजे. त्यांनी पुस्तकात जे काही लिहिले आहे त्याला कोणताही पुरावा नाही. माझ्याकडे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे.....

सामना या दैनिकात प्रसिध्द झालेल्या अग्रलेखाची प्रत उपलब्ध आहे. या अग्रलेखामध्ये म्हटले आहे की, संध्याकाळच्या गप्पांमधून हे लिखाण केले गेले आहे. समर्थन कशाचे करायचे हाही मुद्दा महत्वाचा आहे. शासनाने या सर्व लोकांवर निश्चितपणे कारवाई केली पाहिजे. मी महाराष्ट्र शासनाचे अभिनंदन करतो. शासनाने त्वरित या पुस्तकावर बंदी घातली. पुढे बंदी का उठविली गेली? कशामुळे बंदी उठली? याचा तपास करणे आवश्यक आहे. सुप्रीम कोर्टाने निकालपत्रात म्हटले आहे की, आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यात आलेली नाही म्हणून बंदी उठविण्यात येत आहे. हे कायदेशीर प्रक्रियेचे काम कोणी करायचे होते? सुप्रीम कोर्टातील खटला चालविण्याचे काम कोण करीत होते? माझ्या माहितीप्रमाणे महाराष्ट्र सरकारच्या वतीने हा खटला लढविण्याचे काम बिहारमधील नवीन ॲडव्होकेट असलेल्या अपराजिता सिंग या मुलीकडे सोपविण्यात आले होते.

(नंतर श्री.खर्चे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे .....

दुसऱ्या बाजूला प्रकाशकाच्या बाजूने नामवंत वकील राम जेठमलानीसारखे मोठमोठे वकील आणि आपल्या बाजूने नवीन वकील बाजू मांडतात ही किती लाजिरवाणी गोष्ट आहे.....

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : महोदय, चुकीचे रेकॉर्डवर राहू नये म्हणून मी सांगू इच्छितो की, सर्वोच्च न्यायालयात आपली बाजू मांडण्यासाठी नवीन वकील नव्हते तर ज्येष्ठ वकील श्री. हरिश साळवे व त्यांचे ज्युनियर वकील श्री. नाफडे असे कुशल वकील आपल्या वतीने या केसमध्ये काम पाहत होते. ज्यावेळी अंतिम निर्णय झाला तेव्हा क्लोजिंग रिमार्क्स सुध्दा त्यांचेच आहेत. श्री. नाफडे हे प्रत्यक्ष कोर्टात सुध्दा हजर होते. सन 2005 पासून ते गव्हर्नमेंट प्लिडर म्हणून काम करीत होते.

श्री. विनायक मेटे : महोदय, माननीय मंत्री महोदय जरी सांगत असले तरी माझी माहिती अशी आहे की श्री. नाफडे हे ज्येष्ठ वकील असले तरी तीन चार दिवस ही केस चालली आणि ते शेवटच्याच दिवशी आले होते. हे सर्व असले तरी आपल्या बाजूने योग्य पध्दतीने युक्तीवाद करु शकले नाहीत ही वस्तुस्थिती नाकारुन चालणार नाही. अशा प्रकारच्या सर्व गोष्टी आहेत त्याकडे लक्ष देण्याची गरज आहे. एवढी महत्वाची केस, राज्याच्या अस्मितेशी संबंधित असणारी केस आपण का हरतो ? आपला विधि व न्याय विभाग काय करतो याचाही विचार केला पाहिजे. दिल्लीचे आपले आयुक्त काय करता ? तसेच तेथे आपले जे वकील आहेत ते काय करता ? याचाही विचार होणे आवश्यक आहे. कारण हा साधासुध्दा विषय नाही तर राज्याच्या अस्मितेचा प्रश्न आहे. एवढ्या गंभीर विषयाच्या बाबतीत आपण कमी पडलो ही गोष्ट या राज्याला भूषणावह नाही हेच या निमित्ताने मी सांगू इच्छितो.

श्री. उल्हास पवार : महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी बोलताना श्री. दिलीप चित्रे, भास्कर चंदावरकर यांच्या नावाचा उल्लेख केला. अर्थात लेखकाने कोणाचे नाव लिहावे हा त्याचा प्रश्न आहे पण अत्यंत पुरोगामी विचाराची ही माणसे होती. ते लोक दुर्दैवाने आज हयात नाहीत. तुकोबांचे अभंग ज्यांनी जगभर पसरविले अशा या महान लोकांचा सभागृहात अशा प्रकारे उल्लेख होतो हे योग्य नाही. म्हणून हा उल्लेख कामकाजातून काढून टाकावा अशी माझी विनंती आहे.

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे : महोदय, माझी स्पष्टपणे अशी भूमिका आहे की, सुप्रीम कोर्टाने बंदी उठविण्यासंबंधीचा जो निकाल दिलेला आहे त्यासंदर्भात योग्य व आवश्यक ती सर्व कायदेशीर मदत काय घेता येईल ती घेऊन पुन्हा या वादग्रस्त पुस्तकावर बंदी कशी लादता येईल यादृष्टीने जरुर प्रयत्न करावा आणि जे जे कोणी यामध्ये जबाबदार असतील त्यांच्यावर कारवाई करावी, एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

यानंतर श्री. जुन्नरे ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) सभापती महोदय, "दि हिंदू किंग इन इस्लामिक इंडिया" या पुस्तकाच्या संदर्भात या सभागृहात तिस-यांदा चर्चा होत आहे. माझे मित्र सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी जी मागणी केलेली आहे त्या मागणीचा मी पुनरुच्चार करणार आहे. भांडारकर इंस्टिट्युटने ज्या ज्या लोकांची नावे दिलेली होती त्यासंदर्भात शासनाने का चौकशी केली नाही ? भांडारकर इंस्टिट्युटने ज्यांची नावे दिली होती त्यामध्ये तथ्य आहे की, नाही हे पाहण्याचे काम राज्य शासनाचे नव्हते काय ? या विषयाच्या संदर्भात मागे जेव्हा चर्चा इ ाली होती त्यावेळी माननीय गृहमंत्री श्री. आर.आर.पाटील यांनी सांगितले होते की, "जेम्स लेनला अमेरिकेतून मुसक्या घालून येथे आणले जाईल व पूर्णपणे चौकशी केली जाईल" हा जेम्स लेन कोणाचेही नाव सांगेल ते बरोबर आहे की, नाही हे पाहण्याचे काम शासनाचे नाही काय ?

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, अतिशय गंभीर विषयावर या ठिकाणी चर्चा सुरु आहे असे असतांना या विषयाला कलाटणी मिळते आहे. हा विषय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर आणि सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी गंभीर पणे मांडला व शासनाला त्यांनी मार्गदर्शन सुध्दा केलेले आहे. या पुस्तकावर कायमची बंदी आणण्यासाठी किंवा हे पुस्तक पुढील काळात विकले जाणार नाही यादृष्टिकोनातून सन्माननीय सदस्यांनी सूचना केली तर चांगले होईल. या ठिकाणी सन्माननीय गृहमंत्री श्री. आर.आर.पाटील यांचा काही सुध्दा संबंध येत नाही. हा विषय विधी व न्याय विभागाचा आहे. ही चर्चा गंभीरपणे व्हावी व हा विषय लवकर संपवावा अशी माझी आपल्याला विनंती आहे.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या विषयावर मी गंभीरपणेच बोलतो आहे. माननीय राणे साहेब या ठिकाणी गृहमंत्री श्री. आर.आर.पाटील यांना सपोर्ट करीत आहेत त्यामुळे मी त्यांचे अभिनंदन करतो. परंतु या ठिकाणी आपण जसे माननीय श्री. आर.आर.पाटील साहेबांना सपोर्ट करीत आहात तसाच सपोर्ट आपण मंत्रिमंडळात केला तर बरे होईल. या विषयाच्या संदर्भात मी दोनच मुद्यावर विचार मांडणार आहे. या विषयाच्या संदर्भात राज्यशासनाने पूर्णपणे चौकशी केलेली नाही. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी सांगितले ते खरे आहे. ज्यांना महाराष्ट्र माहीत नाही, ज्यांना महाराष्ट्राबद्दल प्रेम नाही अशांना तुम्ही या प्रकरणात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील.....

वकील नेमता ? आपल्याकडे किती तरी विद्वान वकील आहेत ते आपली बाजू सुप्रीम कोर्टात चांगल्या प्रकारे मांडू शकले असते. ज्यांना छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल प्रेम आहे, ज्यांना छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास माहिती आहे अशा वकिलांना आपण न नेमता बिहार राज्यामधील कोणी तरी सिंग ही व्यक्ती या विषयाच्या संदर्भात आपली बाजू मांडणार असेल तर ते चुकीचे होईल.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (विधि व न्याय मंत्री) : सभापती महोदय, ज्यावेळेस सुप्रीम कोर्टात केस लढली जाते त्यावेळेस सरकारच्या पॅनलमध्ये जे वकील असतात त्यामध्ये मराठी-अमराठीचा विषय आणणे चुकीचे आहे. माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, या विषयाच्या संदर्भात आमचा थेट संबंध येत नाही. परंतु राज्य सरकार मध्ये काम करीत असतांना सामूहिक जबाबदारी म्हणूनच मी या ठिकाणी बोलत आहे. श्री.नाफडे हे एक मोठे विधी तज्ञ असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण मंडळी काम करीत असून राज्य सरकारच्या वतीने प्रभावीपणे बाजू मांडण्याचा त्या ठिकाणी प्रयत्न झालेला आहे. सन्माननीय सदस्यांचा वेगळा आक्षेप असेल तर त्याला आमची काही हरकत नाही परंतु संबंधित वकील मंडळी मराठी नाही असा विनाकारण मुद्दा उपस्थित करणे चुकीचे आहे.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी असे म्हणालो होतो की, ज्यांना छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल आदर आहे, ज्यांना छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास माहिती आहे त्यांनी जर सुप्रीम कोर्टात बाजू मांडली असती तर या केसमध्ये वेगळी परिस्थिती निर्माण झाली असती.

यानंतर श्री. भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील....

माझा दुसरा मुद्दा असा आहे की, राज्य शासन राज्यासाठी करोडो रूपये खर्च करीत असते. .....(अडथळा)..... सभापती महोदय, मी अनेकदा दिल्ली येथील महाराष्ट्र सदनामध्ये जातो. तेव्हा तेथील लॉ डिपार्टमेंटचे ऑफिस बघतो. तेथे कमिशनरसह सगळे अधिकारी-कर्मचारी बसलेले असतात. पण तेथील धूळ सुद्धा साफ केलेली नसते. श्री.राणे साहेब हल्ली आपण महाराष्ट्र सदनामध्ये कमी उतरता. तिथली परिस्थिती जाऊन आपण बघावी. आज राज्य शासनाचे धिंडवडे निघत आहेत. प्रत्येक कोर्टामध्ये आपली हार होत आहे. मी मोजकेच बोलत आहे. जेवढे बोलता येईल तेवढेच बोलतो. आज चर्चा ही आहे की, राज्य शासन कायद्याच्या दृष्टीने अपुरे पडले आहे. आज पण निकाल लागला. आमच्या मोबाईलवर मेसेज आला की, राज्य शासनाने बाजू बरोबर मांडली नाही, म्हणून उद्या केस लागली आहे. हे राज्याला भूषणावह आहे काय ? करोडो रूपये आपण लॉ डिपार्टमेंटवर खर्च करतो.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, चुकीचे रेकॉर्डवर येत आहे. प्रत्येक विभागाची एक जबाबदारी असते. विनाकारण एका विभागासंबंधीची अपुरी माहिती घेऊन त्यावर भाष्य करीत राहणे हे योग्य नाही. या प्रस्तावाला सन्माननीय गृहमंत्री उत्तर देणार आहेत. माझी देखील उत्तर देण्याची तयारी आहे. माझी उत्तर देण्याची तयारी नाही असे मानण्याचे काही एक कारण नाही. आज सर्वोच्च न्यायालयामध्ये आपली एका प्रकरणामध्ये सुनावणी सुरू आहे. यासाठी शिक्षण विभागाने स्पेशल कौन्सिल नेमले आहे. त्यांनी त्यांचे वकील नेमले आहेत. ऑर्ग्युमेंट अपुरे राहिले आहे ते उद्या कन्टीन्यू होणार आहे. एखाद्या केसची सुनावणी सुरू असताना त्यावर आपण आजच मत व्यक्त करणे बरोबर नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी काही चुकीचे बोललो नाही. मला जो काही मेसेज आला आहे, तो मी सांगितला. मेसेज चुकीचा असेल तर आपण त्याच्यावर कारवाई करावी. मी चुकीचे बोललो असेन तर खाली बसतो. आम्ही देखील या सभागृहामध्ये 10-12 वर्षे घालविली आहेत. मंत्रिमहोदय, राज्य शासनाचे लॉ डिपार्टमेंट प्रभावी नाही. एका वकिलाची एका क्षेत्रामध्ये मोनोपॉली असते. आपणही सहकार क्षेत्रामध्ये काम करतात. सावंत बंधू यांची सहकार क्षेत्रात

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.....

मक्तेदारी आहे. मंत्रिमहोदय ते आपले देखील वकील आहेत. त्यांची ठराविक फी आहे. फौजदारी वकील, दिवाणी वकील वेगळे असतात. हे लॉ डिपार्टमेंट बघणार आहेत की नाही. मी निश्चितपणे सांगतो की, यामध्ये राज्य शासन अपुरे पडले आहे. ..... (अडथळा) .... अशा प्रकारचे कॉमेंटस करणार असाल तर ते बरोबर नाही. मी फक्त तीन मिनिटे बोललो आहे. ठराव मी मांडला आहे. ठरावावर पहिले नाव माझे आहे. या सदनातील नवनिर्वाचित सदस्य श्री.हुसेन दलवाई हे भांडारकरांचे जावई आहेत. त्यांना सगळे माहीत आहे. मी अनेक वेळा त्यांच्याशी चर्चा केलेली आहे. सदर माहिती कोणामार्फत मिळाली याबाबतची चौकशी गृह मंत्र्यांना सीबीआय मार्फत करायची असेल तर श्री.हुसेन दलवाई हे आपल्याला चांगली मदत करू शकतात. या प्रकरणासंबंधी या सदनामध्ये 2-3 वर्षापूर्वी चर्चा झालेली आहे.

यानंतर श्री.अजित...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

राज्य शासन कोणत्याही बाबींकडे गांभीर्याने पाहत नाही आणि कोर्टाचे निकाल लागल्यानंतर दखल घेते. आम्ही याठिकाणी चर्चा करतो त्याची दखल अधिवेशन संपल्यानंतर घेतली जात नाही म्हणून आम्हाला येथे अशा पध्दतीने बोलावे लागत आहे. ज्यांनी कोणी जेम्स लेनला माहिती दिली त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे. त्यांनी माहिती दिली असे सिध्द झाले तर महाराष्ट्रातील जनता त्यांना महाराष्ट्रात राहू देणार नाही याची आम्हाला खात्री आहे. या प्रकरणी राज्य शासन किती गतीने काम करणार आहे हे आम्हाला या चर्चेच्या निमित्ताने कळले पाहिजे एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हुसेन दलवाई (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, याठिकाणी जी चर्चा सुरु आहे ती महाराष्ट्राच्या आणि देशाच्या दृष्टीने अतिशय दु:खकारक आणि संतापजनक आहे. जेम्स लेन यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना "हिंदू किंग" संबोधून सुरुवातीलाच त्यांचा अपमान केला गेला आहे. छत्रपती शिवाजी महाराज रयतेचे राजे म्हणूनच आम्हा सर्वांना प्रिय आहेत. सर्व समाजाला एकत्र घेऊन जाणारा राजा त्या काळात झाला आणि ज्याने जुलमी राजवटीला आव्हान देऊन स्वराज्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला हे त्यांचे मोठेपण आहे जे या पुस्तकाच्या टायटलमध्ये येत नाही. "हिंदू किंग इन इस्लामिक इंडिया" असे त्या पुस्तकाचे टायटल आहे. कोणत्याही मुस्लिम राजाने इस्लामिक इंडिया असा उल्लेख न करता हिदुस्थान असा उल्लेख केलेला आहे. "फोडा आणि जोडा" ही ब्रिटीश नीती आहे. तीच नीती जेम्स लेन येथे वापरत आहेत असे दिसून येते. मी कोणत्याही प्रकारचे राजकारण करु इच्छित नाही किंवा राजकारणामध्ये जाणार नाही. या संदर्भात माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील यांच्याबरोबर मी भरपूर भाषणे केलेली आहेत. सन 2004 ची निवडणूक जिंकण्याकरिता आम्ही या मुद्याचा वापर केला हे तितकेच खरे आहे. ही चर्चा निर्माण करण्याचे काम त्यावेळेला वाजपेयी सरकारने केले होते. मी त्याबद्दल आता चर्चा करु इच्छित नाही. समोरच्या बाकावरील सन्माननीय सदस्यांनी चिडू नये. जेम्स लेन याने पुस्तकात जो उल्लेख केलेला आहे त्याचा उल्लेख मी येथे करणार नाही. त्या पुस्तकातील सुरुवातीचे एक वाक्य मी वाचतो म्हणजे् आपल्या सर्वांच्या लक्षात येईल. त्यांनी म्हटले आहे की, "महाराष्ट्र स्टेट जोक्स...." महाराष्ट्रातील कोण लोक जोक्स करतात ? सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी जी मागणी केली त्यास माझा पाठिंबा आहे. भांडारकरांच्या नावाची जी इन्स्टीटयुट आहे त्या भांडारकरांचे विचार सर्वांना एकत्र घेऊन जाण्याचे होते. ते गांधीवादी विचारांचे होते. भांडारकर हे संस्कृत भाषेचे प्रकांड पंडित होते. भांडारकरांच्या संस्थेमध्ये कोण घुसले आहेत ज्यांनी अशातऱ्हेची चुकीची माहिती दिली याची चौकशी होणे आवश्यक आहे. आपण जेम्स लेनला कशाला दोष द्यायचा ? तो अमेरिकन माणूस आहे. हे एक जबरदस्त राष्ट्र निर्माण व्हावे आणि या देशाची जगामध्ये प्रचंड अशी शक्ती निर्माण व्हावी असे त्याला वाटत नाही. त्यांचे बॉम्ब गोळे येथे येण्याऐवजी आम्हीच येथे आपसात भांडत करीत राहावे अशा तऱ्हेचे जे प्रयत्न केले जातात त्याच्यातला हा एक भाग आहे हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हुसेन दलवाई.....

छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान तर झालाच आहे, परंतु त्यांच्या मातोश्री जिजाऊ यांचा फार मोठा अपमान झालेला आहे. "लिव्हींग इन रिलेशन" या देशाच्या संस्कृतीमध्ये नाही. ही पध्दत आम्हाला मान्य नाही. ज्यांच्या देशात असे प्रकार चालतात त्यांना काही वाटत नसेल, परंतु आम्हाला जरुर वाटते...

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्यांनी येथे उल्लेख केला की, "... हे आम्हाला मान्य नाही. या पुस्तकाच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला तेव्हा आपले केंद्रातील सरकार झोपले होते काय ? केंद्र सरकारने अजून पर्यंत जाब का विचारला नाही ? त्या संदर्भात अमेंडमेंड का आणीत नाही ? शाहबानोच्या बाबतीत अमेंडमेंड आणली आणि एक पत्नीव्रत असलेल्या रामाच्या देशामध्ये अशाप्रकारचा निर्णय देणाऱ्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाविरुध्द केंद्र सरकार काही बोलत नाही.

यानंतर श्री.गायकवाड..

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ..

अशा प्रकारचा विषय येथे काढू नये.

श्री.हुसेन दलवाई : सभापती महोदय, मला जे काही बोलावयाचे आहे ते बोलण्यासाठी कृपया आपण मला संरक्षण द्यावे.

श्री.नारायण राणे : सभापती महोदय,...

श्री.हुसेन दलवाई : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री श्री.नारायण राणे यांना मी सांगू इच्छितो की यावर मला बोलू द्यावे.

श्री.नारायण राणे .सभापती महोदय, लेम्स लेन याने छत्रपती शिवाजी महाराजांच्या बद्दल पुस्तकामध्ये जे काही लिहिले होते त्या मजकुराच्या खोलात कोणीही जाऊ नये. अशी माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे.

श्री.हुसेन दलवाई : ठीक आहे. माननीय मंत्रिमहोदयांची विनंती मला मान्य आहे.

श्री.नारायण राणे :सभापती महोदय, हे पुस्तक महाराष्ट्रात आणि देशात विकले जाऊ नये यासाठी सरकारने आणि महाराष्ट्र राज्याने काय करावे याबाबतीत कोणाला बोलावयाचे असेल तर ते बोलू शकातात परंतु पुस्तकातील एकही वाक्य या ठिकाणी उच्चारले जाऊ नये असे मला वाटते. त्यामुळे पुस्तकात लिहिलेले वाक्य आपल्या तोंडून येणे म्हणजे जेम्स लेनने लिहिल्या पेक्षा महान पाप आहे असे आमचे मत आहे. त्यामुळे त्या पुस्तकातील वाक्याचा या ठिकाणी कोणताही उल्लेख करण्यात येऊ नये. जर कोणी तो उल्लेख केला असेल तर ते वाक्य कामकाजात ठेवू नये अशी माझी विनंती आहे.

श्री.हुसेन दलवाई : सभापती महोदय, मला हे पूर्णपणे मान्य असून मी देखील पुस्तकातील मजकुराचा उल्लेख केला नाही. मला एवढेच म्हणावयाचे आहे की या विषयामध्ये समाजाच्या भावना गुंतलेल्या आहेत. आम्ही छत्रपती शिवाजी महाराजांना आराध्य दैवत मानतो त्याच्या संदर्भात अशा प्रकारचा उल्लेख कोणीही करता कामा नये. हे मी केवळ त्यांच्या बाबतीतच म्हणतो असे नाही तर सगळयाच्या बाबतीत मी तेच म्हणणार आहे. मुहंमद पैगंबराचा आपण उल्लेख केला आहे. महंमद पैगंबराबद्दल काही आक्षेपार्ह मजकूर लिहिला गेला तर त्यामुळे त्या समाजाच्या लोकांच्या भावना भडकतात. आपल्या देशात लिखाण स्वातंत्र्य, भाषण स्वातंत्र्य, संचार स्वातंत्र्य दिलेले असले तरी प्रत्येक व्यक्तीने अत्यंत जबाबदारीने वागले पाहिजे असे देखील घटनेत पुढील कलम आहे व ते कलम सर्वांनी स्वीकारले पाहिजे असे मला पुन्हा म्हणावयाचे आहे. ...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हुसेन दलवाई....

सभापती महोदय,या देशामध्ये कोणीही उठले आणि कोणत्याही व्यक्तीविरुध्द बोलले तर समाजातील लोकांच्या भावना भडकल्या जातात समाजासमाजामध्ये वाद निर्माण होतात. छत्रपती शिवाजी महाराजांच्या बाबतीत कोणीही आक्षेपार्ह मजकूर लिहू नये तसेच इतरांच्या बाबतीत सुध्दा तसेच लिहिण्यात येऊ नये असेच माझे म्हणणे आहे. या प्रकरणी सरकारने काहीही प्रयत्न केले नाहीत असे म्हटले जाते ते मात्र बरोबर नाही. या ठिकाणी घटनेतील 14 व्या कलमाचा उल्लेख केलेला आहे त्यामध्येच एक मेख आहे. त्या बाबतीत आवश्यकता भासल्यास कायदा बदलण्यात यावा. सरकारने त्याप्रमाणें करावे अशी मी सरकारला विनंती करीन. केन्द्र सरकारने या पुस्तकाच्या प्रती वितरित होणार नाहीत या बाबतीत दक्षता घ्यावी. ऑक्सफर्ड प्रेसने जरी हे पुस्तक प्रकाशित केलेले असले तरी त्यांनीही असे सागितले होते की या भागामध्ये हे पुस्तक वितरित केले जाणार नाही. त्याचप्रमाणे जेम्स लेन याने देखील या प्रकरणी माफी मागितली आहे.या पुस्तकावर राज्य सरकारने बंदी घातली होती परंतु सुप्रीम कोर्टाने ती बंदी उठवली होती या निमित्ताने हा विषय पुन्हा निर्माण होणार नाही यादृष्टीने सरकारने खबरदारी घ्यावी. त्याचप्रमाणे समाजाने हा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने सहकार्य करावे असे मी आवाहन करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी): या विषयाच्या संदर्भात माननीय सभापतीच्या दालनात चर्चा झाली होती त्यावेळी माननीय सभापतींनी या चर्चेसाठी एक तासाची वेळ दिली होती. ती वेळ संपून गेलेली आहे. या प्रस्तावावर बोलण्यासाठी सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांचे नाव आहे त्यामुळे त्यांचे भाषण आता सुरु होईल आणि त्यांचे भाषण संपल्यानंतर माननीय मंत्री महोदयाचे उत्तराचे भाषण सुरु होईल.

श्री.दिवाकर रावते : आमच्या पक्षाच्या वताने एका सन्माननीय सदस्याला बोलण्याची संधी द्यावी.

तालिका सभापती : माझ्याकडे 14 सन्माननीय सदस्यांनी नावे दिली आहेत. त्यानुसार प्रत्येक पक्षातील एका सन्माननीय सदस्याला बोलण्याची संधी दिली आहे.

...3....

अशुद्धीत मत / शुद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : प्रत्येक पक्षातील एक सन्माननीय सदस्य बोलले आहे. आता श्री.पाशा पटेल देखील बोलणार आहेत तेव्हा आमच्या पक्षातील एका सान्माननीय सदस्याला बोलण्याची संधी द्यावी. अशी माझी आपल्याला विनंती आहे.

तालिका सभापती : दोन दोन मिनिटामध्ये त्यांनी आपले विचार पूर्ण करावेत.

श्री.दिवाकर रावते : तो नंतरचा प्रश्न आहे.

श्री. पाशा पटेल : सभापती महोदय माझ्या ऐवजी श्री. धनंजय मुंडे बोलतील.

तालिका सभापती : ठीक आहे. आता सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांनी भाषण सुरु करावे.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी फक्त दोन मिनिटांमध्ये माझे विचार याठिकाणी मांडणार आहे. जेम्स लेनच्या या पुस्तकाच्या विरोधात शासनाच्या वतीने सर्वोच्च न्यायालयामध्ये जो वकील ही लढाई लढत होता त्या दिवशी ऑक्सफर्ड प्रकाशनचे या देशातील प्रतिनिधी मंजरखान यांनी हे पुस्तक प्रकाशित करणार नाही अशाप्रकारचे माफीचे शासनाला दिलेले पत्र शासनाने जर त्या दिवशी दिले असते तर आज या विषयावर सभागृहामध्ये चर्चा करण्याची आपणावर पाळी आली नसती. आणि या पुस्तकावरील बंदी उठली नसती. आज हिंदवी स्वराज्याच्या, आराध्य दैवताच्या बाबतीत असे लिखाण केले जाते आणि ते लिखाण करण्याचे स्वातंत्र्य परदेशातील एका लेखकाला मिळते ही अतिशय दुर्दैवी बाब आहे. या संदर्भामध्ये भारताच्या घटनेमध्ये काय सांगितले आहे या विषयामध्ये मी जाणार नाही. त्याबाबत माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी आपल्या भाषणामध्ये सांगितले आहे. पुस्तकावरील बंदी उठविण्यात आली ती चुकीची असून ती टाळता येऊ शकली असती, तिला शासन कुठेतरी जबाबदार आहे हे याठिक्राणी प्रामाणिकपणे सांगितले पाहिजे. दुसरे असे की, माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी विनाकारण हा विषय दुसरीकडे नेला. या सभागृहामध्ये या विषयावर अनेक मान्यवर वक्ते बोलल्यानंतर मी बोलण्याचा विचार केला नव्हता. परंतु माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी श्रध्देय अटलबिहारी वाजपेयी यांचा जो संदर्भ दिला. तो देतांना ते म्हणाले की, भांडारकर संस्थेवर हल्ला झाल्यानंतर आक्षेपार्ह मजकूर वर्तमानपत्रामध्ये छापून आला. श्रध्देय अटलजी एवढेच म्हणाले की, "विचारोंकी लड़ाई, विचारों से होगी" माननीय श्री. मेटे साहेबांना कदाचित हे माहित नसावे. श्रध्देय अटलजींच्या मनामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांबाबत आदर होता.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, माझ्या बाबतीत चुकीचे बोलले जात आहे.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, या देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर या राज्यामध्ये पहिल्यांदा अशी एक घटना घडली की, ज्यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक सोहळयाला 350 वर्षे पूर्ण झाली त्यावेळी या हिंदुस्थानचे एकमेव तत्कालीन प्रधानमंत्री श्रध्देय अटलजी वाजपेयी यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या सिंहासनाला मुजरा केला होता. त्यामुळे कुणाबद्दलही अशाप्रकारे बोलणे उचित होणार नाही. आपण सत्ताधारी पक्षाचे सदस्य आहात. या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MMP/

श्री. धनंजय मुंडे...

सभागृहाच्या माध्यमातून अशाप्रकारे उल्लेख करणे योग्य नाही. छत्रपती शिवाजी महाराजांच्या बाबतीत जे आक्षेपार्ह लिखाण केले गेले आहे त्यावर या देशामध्ये बंदी घालण्याबाबत या शासनाने पावले उचलावीत एवढी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, याठिकाणी नियम 289 अन्वये चर्चा उपस्थित करण्यामागील महत्वाचे कारण असे की, काही प्रश्नांबाबत याठिकाणी स्पष्टपणे खुलासा झालेला नाही. माननीय विधी व न्याय मंत्री श्री. राधाकृष्ण विखे पाटील सभागृहात अनुपस्थित आहेत. माननीय महसूल मंत्री श्री. नारायण राणे हे सभागृहात उपस्थित आहेत. तरीसुध्दा मला माननीय विधी व न्याय मंत्री श्री. राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडून उत्तर अपेक्षित आहे. याचे कारण असे की, महाराष्ट्र शासनाचे वकील, महाराष्ट्र शासनाचे अभिवक्ते ॲड. संजय खर्डे यांनी दिलेली माहिती दैनिक पुढारीने प्रसिध्द केली. त्यात म्हटले आहे की, या पुस्तकाच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयामध्ये राज्य सरकारची याचिका तग धरु शकली नाही. याचे कारण या पुस्तकावर बंदी कां घातली होती हे त्या याचिकेमध्ये प्रभावीपणे मांडण्यात आले नव्हते. सभापती महोदय, खरे म्हणजे कुणीही वकील न्यायालयामध्ये आपली भूमिका जितक्या प्रभावीपणे मांडतो त्यावर न्यायालयाचा निकाल लागत असतो. ज्यावेळी सन 2003 मध्ये जेम्स लेनच्या या पुस्तकातील आक्षेपार्ह मजकुराचा विषय समोर आला त्यावेळी समाजामध्ये प्रचंड प्रक्षोभ निर्माण झालेला दिसला. त्यानंतर 2004 मध्ये या पुस्तकाच्या सर्व प्रती जप्त करण्याचे आदेश राज्य सरकारकडून देण्यात आले. त्यावेळी पुस्तकाचे लेखक जेम्स लेन यांच्याकडून माफीनामा आल्यानंतर कुणाच्याही भावना आम्हाला दुखवयाच्या नाहीत असे या पुस्तकाचे प्रकाशक म्हणाले होते. त्यानंतर आनंद पटवर्धन आणि संघराज रुपवते यांनी ही याचिका दाखल केली.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MMP/ KGS/ प्रथम श्री. सरफरे.... 18:35
डॉ. नीलम गोऱ्हे...

त्यावेळी तेथल्या तेथे बाजू मांडली गेली असती तर आज चार वर्षानंतर या याचिकेला ताबडतोब निकाली लावणे शक्य झाले असते. शासन ज्यावेळी सर्वोच्च न्यायालयात जाते आणि आपली भूमिका मांडीत असते त्यावेळी अनेकवेळा आमचा असा अनुभव आहे की, सर्वोच्च न्यायालयात राज्य सरकारचे वकील वेळेवर उपस्थित होत नाहीत. तसेच एखादा ज्युनियर वकील त्याठिकाणी शासनाची बाजू मांडीत असतो त्यामुळे त्याला पुरेशी माहिती नसते. जेम्स लेनच्या पुस्तकाचा वाद एखादवेळी ताबडतोब संपेलही. कारण माझ्या माहितीप्रमाणे संबंधित प्रकाशकाने जाहीर केलेले आहे की, त्यांनी सगळया प्रती मागे घेतलेल्या आहेत. एकही प्रत ते भारतात ठेवणार नाहीत. या पुस्तकावरील फक्त महाराष्ट्रातील बंदी पुरेशी नाही तर देशभर ही बंदी लागू झाली पाहिजे.

सभापती महोदय, माझा दुसरा मुद्दा असा आहे की, सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी याठिकाणी जे सांगितलेले आहे त्याबद्दल मी पुण्यातील एक आमदार व नागरिक असल्यामुळे मला असे वाटते की, जेम्स लेनच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांना ती माहिती नेमकी कोणाकडून आणि कशी मिळाली याचा स्त्रोत शोधला गेला पाहिजे. ते स्त्रोत शोधले गेल्यानंतर त्याचे निराकरण व उच्चाटन झाले पाहिजे. तसेच त्याच्याबद्दल वस्तुस्थितीला धरुन आपले म्हणणे मांडून एकदाच काय तो समाचार घेतला गेला पाहिजे.

सभापती महोदय, माझा तिसरा मुद्दा असा की, प्रत्येक वेळी मुका माणूस, बहिरा माणूस, भाषा येत नसलेला माणूस न्यायालयात गेला तर त्याची बाजू ऐकली जाणार नाही. त्याप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल असलेल्या आमच्या भावना आम्ही सर्वोच्च न्यायालयापर्यंत पोहचवू शकत नाही... महाराष्ट्राची बुध्दी कुठे तरी कमी झालेली आहे की काय अशी मला शंका येते. मला याबाबतीत असे सूचवावयाचे आहे की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या महतीची माहिती देण्यासाठी मुंबईत एक जागतिक परिषद घेण्यात यावी. आणि त्या परिषदेत नेपोलियन पासून ते चीनच्या राजा पर्यंत जगभरातील सर्व राजांमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे काय वैशिष्टय आहे हे जगाच्या कानाकोपऱ्यात सकारात्मक पोहचविण्याची आपली ऐतिहासिक जबाबदारी आहे. कोणीही येऊन आपटीबार काढायचा त्यानंतर आपण तोफ डागायची त्यानंतर ब्रम्हांस्त्र काढायचे या ऐवजी छत्रपती शिवाजी महाराजांची माहिती योग्य रीतीने सर्वां पर्यंत पोहचविणे ही देखील राज्य शासनाची आणि सर्व आमदार महोदयांची जबाबदारी आहे. जेम्स लेनच्या पुस्तकाच्या निमित्ताने मला याठिकाणी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे....

अशी सूचना करावयाची आहे की, अमेरिकेतील आणि यु.के.मधील संशोधकांपर्यंत राजा शिवछत्रपतींची माहिती व्यवस्थितपणे पोहचविता आली पाहिजे. आज इतिहास संशोधकांचे अनेक वेगवेगळे गट आहेत. अनेक वेगवेगळया भूमिका मांडणारे लोक आहेत. मला सन्मानीय सदस्य श्री. विनायक मेटे यांना सांगावयाचे आहे की, आपण स्वत:दिल्लीतील एखाद्या टिपिकल ऐतिहासिक परिषदेला गेलात तर तुम्ही चप्पल काढल्या शिवाय बाहेर येणार नाही. कारण लोक अधिकृतरीत्या अनेक गोष्टी त्याठिकाणी मांडत असतात. त्याचा प्रतिवाद आपल्याला विचाराने देखील केला पाहिजे. हा विचाराने प्रतिवाद करीत असताना ऐतिहासिक आधार योग्य पध्दतीने मांडले पाहिजेत. पण आपण कुठे तरी कमी पडत आहोत. परत कोणी तरी जेम्स लेन आला तर पुन्हा कुठल्या तरी गल्लीबोळात आम्ही धावत सुटणार आणि आंदोलन करीत राहाणार काय? परत दहा वर्षाने कोणी तरी संशोधक निपजेल आणि तो जेम्स लेनच्या पुस्तकावर बंदी नसलेल्या देशातील पुस्तकाच्या आधाराने परत छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल बोलेल आणि परत येथील सन्माननीय आमदार भांडायला जातील ही आपली फार मोठी वैचारिक शोकांतिका आहे असे मला वाटते. म्हणून राज्य शासन म्हणून काम करीत असताना देश स्तरावरसुध्दा छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य योग्य पध्दतीने पोहचविणे हे राज्याच्या विकासाच्या दृष्टीने सुध्दा आवश्यक आहे, याकडे मला शासनाचे लक्ष वेधावेसे वाटते. धन्यवाद.

तालिका सभापती (श्री. मोहन जोशी) :शासनाच्या वतीने उत्तर देण्यात यावे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय, सभागृहात उपस्थित नाहीत.

श्री. नारायण राणे : मी उत्तर द्यायला समर्थ आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, वकिलांच्या संदर्भात याठिकाणी स्पेसिफिक उल्लेख करण्यात आला आहे. याचिका टीकणार नाही असे सरकारी अभियोक्ता सांगत आहेत. आम्हाला त्याचे उत्तर मिळाले पाहिजे.

(श्री. राधाकृष्ण विखे-पाटील सभागृहात येतात)

यानंतर श्री. बरवड...

अशुद्धित प्रत / परिपक्वासाठी नाही

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात)

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिलेली आहे.

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, या ठिकाणी अमुकच मंत्र्यांनी उत्तर दिले पाहिजे असे नाही. सामूहिक जबाबदारी म्हणून कोणीही मंत्री उत्तर देऊ शकतो. सभापती महोदय, मुद्दा असा आहे की, सन्माननीय सदस्य बोलण्यासाठी उभे आहेत. त्यांना अजून या विषयावर बोलावयाचे आहे. आम्ही कोणीही मंत्री उत्तर देऊ शकतो. या विषयावर सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे त्यावर मी उत्तर देण्यासाठी उभा आहे. सन्माननीय सदस्यांचे असे म्हणणे आहे की, संबंधित मंत्रिमहोदयांनी उत्तर द्यावे. सन्माननीय सदस्यांनी बोलताना माझे नाव घेतले होते म्हणून मी आपल्याला सांगेन की, 'पुढारी' दैनिकामध्ये आलेली जी बातमी आहे की, आम्ही सुप्रीम कोर्टामध्ये बाजू मांडण्यामध्ये कमी पडलो म्हणून ती बंदी उठविली गेली, यासंबंधीचा उल्लेख आणि मजकूर सन्माननीय सदस्यांनी वाचला. परंतु त्यांच्या म्हणण्यात सुध्दा तथ्य नाही. यामध्ये काही कायदेशीर गोष्टी आहेत. कारण आपण जी बंदी घातली होती आणि त्यावेळी जी केस दाखल केली होती त्यामध्ये कलम 153 आणि अन्य कलमे लावली होती त्या मुद्यावर हायकोर्टात हरल्यानंतर आपण सुप्रीम कोर्टात गेलो. त्या ठिकाणी महाराजांचे कर्तृत्व यावर चर्चा नव्हती. बंदीसाठी जी कलमे आपण लावलेली होती त्या कलमाच्या मेरीटवर चर्चा झाली. आपण जे म्हणाला त्याबाबत उत्तरात आम्ही अजून काही म्हणालो नाही. आम्ही कोठे कमी पडलो का, वकील कोणता द्यावयाचा होता, हा मुद्दा वेगळा आहे. जी कलमे लावून ती केस फाईल झाली होती त्याच्या मेरिटवर त्या ठिकाणी चर्चा झाली. महाराजांचे कर्तृत्व या गोष्टीची चर्चा त्या ठिकाणी होत नाही. फक्त जी कलमे लावलेली होती ती कलमे आणि आपण केलेली बंदीची मागणी योग्य होती काय याच्या मेरिटवर चर्चा झाली आणि ती सुप्रीम कोर्टाच्या जज्जमेंटमध्ये आलेली आहे. म्हणून 'पुढारी'मध्ये आलेली जी बातमी आहे त्याबाबत सांगू इच्छितो की, बातम्या खऱ्या किंवा चुकीच्या असू शकतात. म्हणून बातमीच्या आधारे सगळ्याच गोष्टी खऱ्या आहेत अशा पध्दतीने आरोप करु नये एवढीच विनंती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) सभापती महोदय, या चर्चेच्या निमित्ताने आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे. मी दोनच मिनिटामध्ये माझे बोलणे संपविणार आहे. एक महत्वाचा पायाभूत विचार या सगळ्या चर्चेमध्ये व्हावयास पाहिजे की, लेखन स्वातंत्र्य म्हणून ज्याचा ढोल बडविला जात आहे त्याचा अर्थ स्वैराचार असा करुन जर कोणी विकृत लिखाण करणार असेल तर त्याच्यावर बंदी घालण्याची जबाबदारी प्रामुख्याने या शासनाचीच आहे. मघाशी सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे हा जो कोणी विकृत लिखाण करणारा स्वत:ला इतिहास संशोधक म्हणवतो त्याने त्याच्या शीर्षकामध्येच अशा पध्दतीने त्याची मांडणी केलेली आहे की, त्याचा हेतू काय होता हे त्या शीर्षकावरुन पुरेसे स्पष्ट होते. अशा लोकांना आपल्या देशामध्ये आपण स्वातंत्र्याचा वापर करु देतो आणि इतर देशांमध्ये आपल्याला जावयाचे असेल त्यावेळी व्हिसासारख्या विषयामध्ये अनेक बंधने असतात. अशा लोकांना आपल्या देशामध्ये येण्याचा जो व्हिसा मिळतो त्यासंबंधातील जी यंत्रणा आहे त्यामध्ये याचा अभ्यास आपल्या शासनाकडून होणार आहे की, नाही हा खरा प्रश्न निर्माण होतो. खरे म्हणजे राज्यकर्त्यांनी जाणतेपणाने राज्य कारभारावर लक्ष ठेवणे आवश्यक असते आणि राज्यकारभार म्हणजे केवळ दिवाबत्ती, रस्ते याच गोष्टी नाहीत तर त्याच्याही पलीकडे असलेली महत्वाची राज्याची जी संस्कृती आहे तिचे रक्षण करण्याची जबाबदारी शासनकर्त्यांची असते. कारण हा काही केवळ मराठी भाषेचा प्रश्न नाही. जेम्स लेन म्हणतात की, ऐतिहासिक दस्तऐवजाचा अभ्यास केला. मुळात हे दस्ताऐवज त्यांना इंग्रजीमध्ये उपलब्ध झाले असण्याची शक्यता नाही. म्हणून अशा घटना ज्यावेळी घडतात त्यावेळला आपण करेक्टीव्ह मेझर्स म्हणजे आता दुरुस्ती काय करावयाची याबद्दल अधिक चर्चा करीत असतो पण प्रिव्हेंटीव्ह मेझर्स म्हणजे अशा गोष्टी घडूच नयेत म्हणून जी यंत्रणा तयार करावयास पाहिजे त्याकडे शासनाने अधिक लक्ष द्यावयास पाहिजे. याकडे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छितो आणि शासन याबाबत निश्चित पावले टाकील अशी आशा व्यक्त करुन माझे दोन शब्द संपवितो.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी) : यानंतर मंत्री महोदयांचे उत्तर सुरु होईल.

(सन्माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील हे उत्तर देण्यासाठी उभे राहतात.)

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, ज्यावेळी आम्ही हा प्रस्ताव दिला होता त्यावेळी आम्ही माननीय सभापतींबरोबर चर्चा केली होती. आम्हाला विधी व न्याय खात्याच्या मंत्र्यांकडून उत्तर मिळावे असे आम्ही त्यांना सांगितले होते. आता माननीय महसूल मंत्री श्री.नारायण राणे यांनी असे म्हटले की, अमुक सेक्शनखाली, अमुक निर्णय, अमुक पध्दतीने प्रकरण हाताळले गेले वगैरे वगैरे. कोर्टात जी काही कार्यवाही झाली आहे ती वकिलांमार्फत झाली आहे. तिकडे वकिलांनी काय केले ते त्यांनी सांगितले आहे. विधी व न्याय खात्याचा हा विषय आहे. या विषयाशी गृह खात्याचा काय संबंध आहे ? सन्माननीय मंत्री महोदय श्री.नारायण राणे यांनी असेही सांगितले की, सेक्शन चुकीचा लावल्यामुळे हे सर्व झालेले आहे.

श्री.नारायण राणे (बसून) : चुकीचा सेक्शन लावला असे मी म्हणालो नाही. तेथे कोणत्या सेक्शनवर चर्चा झाली त्याचा मी उल्लेख केला आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सेक्शनचा जो घोळ झाला आहे त्यासाठी संबंधित सचिव जबाबदार आहेत. त्या सचिवांवर शासन काही कारवाई करणार असेल तर सन्माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी चर्चेला उत्तर द्यावे. कोर्टामध्ये जो सबंध घोळ चालला आहे त्याची नैतिक जबाबदारी स्वीकारुन कायदा मंत्र्यांचा आम्ही राजीनामा मागत आहोत. या प्रकरणी कायदा मंत्र्यांनी उत्तर द्यावे असा आमचा पहिल्यापासून आग्रह आहे.

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, या सभागृहाचे कामकाज नियमाने चालवावयाचे असेल तर एखाद्या चर्चेला अमूक मंत्री महोदयांनीच उत्तर द्यावे अशी मागणी करता येणार नाही.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून बोलत असतात.)

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, या पुस्तकावर गृह विभागाने बंदी आणली आहे. विधानसभेच्या सभागृहामध्ये सन्माननीय गृहमंत्र्यांनी उत्तर दिलेले आहे. त्यामुळे अमुक मंत्र्यांनीच उत्तर दिले पाहिजे असा हट्ट धरता येणार नाही.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून बोलत असतात.)

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MMP/

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, ज्यावेळी माननीय सभापती महोदयांच्या चेंबरमध्ये चर्चा झाली होती त्यावेळी हा विषय कायद्याशी संबंधित असल्याने या चर्चेला कायदा मंत्र्यांनी उत्तर द्यावे अशी आम्ही मागणी केली होती. जर कायदा मंत्री अनुपस्थित असते तर मंत्रिमंडळातील संयुक्त जबाबदारी म्हणून अन्य मंत्र्यांना उत्तर देता येईल. परंतु आता सभागृहात सन्माननीय कायदा मंत्री उपस्थित आहेत. त्यामुळे या चर्चेला सन्माननीय कायदा मंत्र्यांनीच उत्तर दिले पाहिजे. हा न्यायालयाशी संबंधित प्रश्न आहे. दोन्ही न्यायालयात सरकारचा पराभव झालेला आहे, तेथे पराभव का झाला याचे उत्तर कायदा मंत्रीच देऊ शकतील. कायदा व सुव्यवस्थेचा येथे कोणताच विषय येत नाही.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की, याविषयी सरकारची जी भूमिका आहे ती सभागृहासमोर मांडण्यास काहीच हरकत नाही. परंतु या संपूर्ण प्रक्रियेमुळे राज्यात असंतोष निर्माण झाला, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला, उद्रेक झाला या सर्व पार्श्वभूमीवर विधानसभेत चर्चा झाली आहे. सन्माननीय गृहमंत्र्यांनी विस्ताराने जेम्स लेन यांच्या पुस्तकावर बंदी घालण्यापासून ते संपूर्ण प्रक्रियेपर्यंतचे उत्तर दिले आहे. गृह विभागाच्या वतीने व सामान्य प्रशासन विभागाच्या वतीने या संपूर्ण प्रक्रियेचे कामकाज झालेले आहे. विधी व न्याय विभागाचा रोल सल्ला देण्याचा आहे व तशी भूमिका या खात्याची होती.

यानंतर श्री.शिगम.....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखाही नाही

(श्री. राधाकृष्ण विखे-पाटील....

शासन म्हणून आम्ही एकत्रितपणे भूमिका स्वीकारलेली आहे. मी विभागाच्या जबाबदारीतून बाजूला जात नाही. या संपूर्ण प्रकरणी गृह आणि सामान्य प्रशासन विभागाकडून पाठपुरावा झाल्यामुळे सन्माननीय गृहमंत्र्यांना विनंती करण्यात आली होती की, त्यांनी या विषयावर बोलावे. माननीय गृहमंत्र्यांनी या विषयावर विधानसभेमध्ये विस्ताराने उत्तर दिलेले आहे. याबाबतीत विधी व न्याय खात्याच्या संदर्भात काही मुद्दा उपस्थित झाला तर त्याबाबतीत खुलासा करण्याची माझी तयारी आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या ठरावाची व्याप्ती सीमित आहे. शासनाने घातलेल्या बंदीच्या संदर्भात सरकारचा उच्च न्यायालयामध्ये, सर्वोच्च न्यायालयामध्ये पराभव का झाला ? सर्वोच्च न्यायालयाने बंदी का उठविली ? या संदर्भात विधी व न्याय मंत्र्यांनी खुलासा करावयास पाहिजे. या ठिकाणी बोलताना कोणत्याही सन्मानीय सदस्यांनी राज्यामध्ये कुठे कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झालेला आहे, कुठे लाठीमार झाला आहे, कुठे जाळपोळ झाली आहे याचा उल्लेख केलेला नाही. आपल्या सरकारला सर्वोच्च न्यायालयामध्ये अपयश का आले ? केस नीट प्लीड केली गेली की नाही का ? या संबंधी खुलासा होणे आवश्यक आहे. हा विषय विधी व न्याय विभागाशी संबंधीत असल्यामुळे विधी व न्याय मंत्र्यांनी उत्तर दिले पाहिजे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (विधी व न्याय मंत्री) : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात शासनाने आपली भूमिका या ठिकाणी मांडलेली आहे.जेम्स लेन याने छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल आक्षेपार्ह लिखाण केल्याबद्दल संपूर्ण राज्यामध्ये गदारोळ झाला. या पुस्तकावर सरकारने बंदी घातल्यानंतर ही बंदी उठविण्याच्या संदर्भात मागणी केली गेली. ऑक्सफर्ड प्रिंटींग प्रेस यांनी ते पुस्तक प्रकाशित केले होते. त्यांनी न्यायालयाच्या संदर्भात आव्हान केले नव्हते. पण उच्च न्यायालयात सरकारची भूमिका मांडत असताना उच्च न्यायालयाने सरकारच्या विरोधात निकाल दिला. त्याविरुध्द आपण सर्वोच्च न्यायालयात गेलो. छत्रपती शिवाजी महाराजाबद्दल विस्ताराने बोलण्याची आवश्यकता नाही. कारण छत्रपती शिवाजी महाराज हे आपणा सर्वांचे दैवत आहे. आपण सर्वांनी राजकारणाच्या पलीकडे जाऊन विचार केला पाहिजे. जेम्स लेन पुस्तकाच्या संदर्भात 2003मध्ये पब्लिशिंग हाऊसने हे पुस्तक सर्क्युलेशन मधून काढून घेण्याबाबत राज्य सरकारला कळविले होते. जेम्स लेनने आक्षेपार्ह मजकूर लिहिला त्याबद्दल त्यांचा माफीनामा सरकारकडे प्राप्त झाला होता. ही सर्व कागदपत्रे उच्च न्यायालयामध्ये ॲड कुंभकोण साहेबांनी सादर केली होती. उच्च न्यायालयामध्ये सरकारने प्रभावीपणे आपली बाजू मांडली होती. सर्वोच्च न्यायालयामध्ये ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. हरीष साळवे यांनी बाजू मांडली होती. तसेच नामवंत वकील नाफडे यांनीही त्यांच्या बरोबरीने या प्रकरणी काम पाहिलेले होते. म्हणजे कोणी तरी छोटे वकील सरकारने नेमले होते असे नाही. या संपूर्ण प्रकरणी ॲड. नाफडेसाहेबांनी सरकारची बाजू प्रभावीपणे मांडली. ऑक्सफर्ड प्रिंटींग प्रेसचे पत्र, जेम्स लेनचे पत्र हे डॉक्युमेण्ट कोर्टाच्या रेकॉर्डवर आहे. बाहेर असे सांगण्याचा प्रयत्न केला गेला होता की, सरकार कुठे तरी कमी पडले. नामदार सर्वोच्च न्यायालयाने जो मुद्दा उपस्थित केला तो महत्वाचा होता. या प्रकरणी दोन जातीमध्ये किंवा समाजामध्ये तणाव निर्माण होऊ शकतो का ? किंवा छत्रपती शिवाजी महाराज हे एका विशिष्ट समाजाचे आहेत काय ?...

....नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / अशुद्धीसाठी नोंदी

या संदर्भात राज्य सरकारने आपली भूमिका मांडावी. या सगळ्या बारकाव्यात जाताना शिवाजी महाराज हे आपल्या सर्वांचेच दैवत आहे. राज्य सरकारला पुढे जायचे असेल तर स्टेट ॲक्टमध्ये काही अमेंडमेंट करुन केंद्राची मान्यता घ्यावी लागेल. तामीळनाडू राज्याने ज्याप्रमाणे स्टेट ॲक्ट अमेंड करुन केंद्राची मान्यता घेतली तशा पध्दतीने राज्य सरकारला प्रयत्न करावे लागतील. सन्माननीय मुख्यमंत्री आणि सन्माननीय गृहमंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे राज्य सरकारने यासंबंधी ॲडव्होकेट जनरल यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली आहे. त्या समितीमध्ये अतिरिक्त मुख्य सचिव (गृह) व विधी व न्याय विभागाचे प्रधान सचिव यांचाही समावेश आहे. त्यांनी या सगळ्या प्रश्नाचा अभ्यास करावयाचा आहे. राज्याच्या अनुषंगिक बाबीसंबंधी अशा काही लोकांकडून लिखाण केले जाते, आक्षेपार्ह गोष्टी केल्या जातात या संदर्भात कायद्यात दुरुस्ती करावी लागेल. त्यासाठी स्टेट ॲक्टमध्ये अमेंडमेंट करावी लागेल. त्या संदर्भात ही समिती राज्य सरकारला शिफारस करणार आहे. सुप्रीम कोर्टाच्या या निर्णयानंतर तामीळनाडू राज्याच्या धर्तीवर अधिक प्रभावी कायदा आणण्यासाठी राज्य सरकार पुढील अधिवेशनामध्ये निश्चित कायद्यात आवश्यक ती दुरुस्ती करणार आहे. पुन्हा असे प्रकार घडणार नाहीत या संदर्भात कारवाई केली जाणार आहे. राज्य सरकार बाजू मांडण्यामध्ये हायकोर्टात कमी पडले, सुप्रीम कोर्टात कमी पडले अशी कोणतीही गोष्ट घडलेली नाही. केवळ वृत्तपत्रात बातमी आली म्हणून राज्य सरकार आपली बाजू मांडण्यात कमी पडले हे म्हणणे चुकीचे आहे. मी अतिशय नम्रपणे सभागृहाला आश्वासित करु इच्छितो की, अत्यंत प्रभावीपणे राज्य सरकारने आपली बाजू मांडत असताना "...under Section 95 of IPC it is necessary to specify amongst which two religious or caste groups enmity would be created." या पुस्तकामुळे समाजामध्ये दुही माजणार आहे, महाराज हे विशिष्ट समाजाचे आहेत असे सरकारने लिहून देणे अभिप्रेत असेल तर त्याबाबत सन्माननीय सदस्यांनी मार्गदर्शन करावे. सभागृहात सन्माननीय सदस्यांची अशी भूमिका असेल, सरकारला तशी सूचना करणार असाल की, महाराज हे विशिष्ट समाजाचे आहेत तर पुस्तकावर बंदी आणणे सोपे होईल. कायद्याच्या कक्षेत बाजू मांडूनही सुप्रीम कोर्टाच्या निकालानंतर असे लक्षात आले की, आपले सध्याचे काही कायदे यादृष्टीने परिपूर्ण नाहीत. त्यासाठी स्टेट ॲक्टमध्ये अमेंडमेंट केल्यानंतर केंद्राची मान्यता घ्यावी लागेल. ती मान्यता घेण्याची राज्य सरकारची तयारी आहे. पुढील हिवाळी अधिवेशनात कायद्यामध्ये तशी दुरुस्ती करणार आहोत.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय मंत्रीमहोदय सभागृहाची दिशाभूल करीत आहेत. मी उपस्थित केलेल्या प्रश्नाचे उत्तर मंत्रीमहोदयांकडून अपेक्षित आहे. ॲडव्होकेट जनरल यांच्या संदर्भात मी प्रश्न उपस्थित केला होता. त्याबद्दल मंत्रीमहोदयांनी खुलासा केला पाहिजे. आता शासनाने त्यांच्याच अध्यक्षतेखाली समिती नियुक्त केली आहे. ॲडव्होकेट जनरल यांची नियुक्ती कायदेशीर आहे की नाही, हा मुद्दा मी उपस्थित केला होता. मी याठिकाणी सांगितले होते की, अमुक अमुक पुस्तकावर केवळ इस्लामी समाजाच्या भावना भडकतात म्हणून संपूर्ण देशात बंदी घालण्यात आली. म्हणजे कायदा अस्तित्वात आहे. कायदा अस्तित्वात नसेल तर केंद्र सरकारने बंदी का घातली? कन्करन्स लिस्टमध्ये असलेला जो कायदा केंद्राच्या पातळीवर लागू आहे तो या राज्यास लागू असावा यासाठी राज्य सरकारला पाच वर्षे का वाट पहावी लागली? सुप्रीम कोर्टाचा निर्णय आल्यानंतर जाग का आली? हा चर्चेचा विषय आहे. आपण मेरिटवर बोलत आहोत. मागील पाच वर्षे राज्य सरकारने प्रयत्न का केले नाहीत? 2005 ते 2010 पर्यंत विभागाच्या अधिकाऱ्यांना जाग का आली नाही? हा विषय आहे. अधिकारी पाप करतात आणि सरकारला तोंडघशी पडावे लागते. राज्य सरकारची कितीही इच्छाशक्ती असली तरी या प्रकरणात कोणते अधिकारी दोषी आहेत हे सभागृहापुढे उघड झाले पाहिजे.

श्री.सय्यद ज़मा : सभापति महोदय, मेरा पॉइंट ऑफ आर्डर है. सभी लोगों की भावनाओं से शासन अवगत है. सन् 2004 से यह केस चालू है. पहले हाईकोर्ट और फिर सुप्रिम कोर्ट में एग्जिस्टिंग लॉ के बारे में इन्टरप्रिटेशन किया गया और इस वजह से हमारा केस कोर्ट में स्टेंड नहीं हुआ. मेरा कहना यह है कि सन् 2004 से 2010 के बीच में सब से अच्छे लॉयर लाकर इस केस की पैरवी क्यों नहीं की गई और तमिलनाडु राज्य के आधार पर महाराष्ट्र राज्य के लिए एक अलग से स्टेट एक्ट बनाने के बारे में ब्यूरोक्रेसी ने क्या कार्यवाही की ? मैं माननीय मंत्री का पूरा आदर करते हुए यह कहना चाहता हूं कि इस मामले में हमें व्यक्तिगत रुप से किसी मंत्री या मुख्यमंत्री के व्यवहार पर आपत्ति नहीं है. हमें आपत्ति है ब्यूरोक्रेसी के कामकाज पर. ब्यूरोक्रेसी, कानून विभाग के अधिकारी, मुख्य सचिव और पॅनल के वकील जिस प्रकार से इस मामले में कार्य कर रहे हैं, उस पर हमें आपत्ति है. वर्तमान में इस प्रकार का कोई कानून नहीं है इसलिए हमारा केस कोर्ट में स्टेंड नहीं हो पाएगा यह बात इन अधिकारियों को समझ में क्यों नहीं आई ? दूसरी बात किताब पर प्रतिबंध करने की है. इस संबंध में जो कानून है, उसके तहत पूरे देश में इस

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सय्यद ज़मा.....

किताब पर प्रतिबंध क्यों नहीं लगाया गया, क्यों जनता की भावनाओं को भड़कने तक इंतजार किया गया ? इसका जवाब देना चाहिए और जिन अधिकारियों ने अपने कर्तव्य का पालन नहीं किया, उनके खिलाफ कार्रवाई होनी चाहिए.

(नंतर श्री.खर्चे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : महोदय, यामध्ये कोणत्या अधिकाऱ्याने हलगर्जीपणा केला असे नाही तर न्यायालयीन प्रक्रियेची ही बाब आहे. ॲडव्होकेट जनरल जे आता जज्ज झालेले आहेत ते श्री. कुंभकोणी साहेब यांनी शासनाच्या वतीने आपली बाजू न्यायालयात मांडली आणि सर्वोच्च न्यायालयात शासनाकडून त्याचा पाठपुरावा झाला. त्याचबरोबर सर्व ॲपॉलॉजी, माफीनामा तसेच ऑक्सफर्ड प्रेसमधून आलेल्या विथ्ड्रॉलच्या संदर्भातील कागदपत्रे सुध्दा कोर्टासमोर आपण मांडली आहेत. अशा प्रकारे कायद्याच्या चाकोरीतील सर्व बाबी आपण पूर्ण करुन सुप्रीम कोर्टासमोर त्या मांडल्या. एखाद्या विशिष्ट समाजाविषयी, धर्माच्या संदर्भात जेव्हा मुद्दा उपस्थित होतो त्याला कायद्याची जोड देण्यात आलेली आहे त्यातून आपण धर्म म्हटला की त्यासंदर्भात सुप्रीम कोर्टाचा निकाल आहे. आता आपण कायद्यात जी सुधारणा करण्याचा विचार करीत आहोत त्या अनुषंगाने शासन पावले उचलत आहेच. तसेच ॲडव्होकेट जनरलची मुदत संपलेली असून नवीन ॲडव्होकेट जनरलची प्रक्रिया कंटिन्यू करायला सांगितले आहे. सध्या जे ॲडव्होकेट जनरल आहेत त्यांचा राजीनामा शासनाकडे आलेला आहे परंतु पुढील निर्णय होईपर्यंत त्यांना कंटिन्यू करण्यासंदर्भात सांगितलेले आहे. (अडथळा) .....सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी तो राजीनामा पटलावर ठेवण्याची सूचना केली असून त्यानुसार हा राजीनामा सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल. अशा प्रकारे प्रामाणिकपण शासन आपली भूमिका पार पाडीत असताना हलगर्जीपणाबद्दल जो उल्लेख झाला त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, विधि व न्याय विभाग तसेच गृह विभागाचे अधिकारी असोत जेव्हा राज्याच्या अस्मितेचा प्रश्न येतो तेव्हा अशा प्रकारची चालढकल कोणीही करणार नाही. तसेच भविष्यातही या पुस्तकावरील बंदी प्रभावीपणे राहील यासंबंधीची सुधारणा करताना राज्यातील जनतेच्या भावना लक्षात घेऊनच पावले टाकली जातील.

श्री. पांडुरंग फुंडकर : माननीय मंत्री महोदयांनी आताच उत्तरात सांगितले की, हिवाळी अधिवेशनात अशा प्रकारे कायद्यात सुधारणा करण्यात येईल. हा प्रश्न इतका महत्वाचा असताना, राज्याच्या अस्मितेचा असताना आणि आज पावसाळी अधिवेशनाचा पहिलाच दिवस असून पुढील दोन आठवडे हे अधिवेशन चालणार आहे. म्हणून याच अधिवेशनात ही सुधारणा आणण्याबाबत ताबडतोब विचार करावा, अशी माझी सूचना आहे.

श्री. उल्हास पवार : महोदय, जो मुद्दा येथे उपस्थित करण्यात आला तो बरोबर आहे की, जात, समाज किंवा धर्माच्या उद्रेकासंबंधी असा एक मुद्दा होता.....

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार....

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्माविषयी, जिजाऊ माते विरुध्द विकृत मनोवृत्तीने जे लिखाण करण्यात आलेले आहे त्या विकृत लिखाणाबद्दल नामदार हायकोर्ट किंवा नामदार सुप्रीम कोर्टाचे काय म्हणणे याबद्दल माननीय मंत्रीमहोदयांनी माहिती दिली तर बरे होईल.

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सुप्रीम कोर्टात आर्टीकल 14 आणि 153 ए इंडियन पिनल कोडला चॅलेंज करण्यात आलेले आहे. व्यक्ती स्वातंत्र्य हे आर्टीकल 19 ए अनुसार मिळते. व्यक्ती स्वातंत्र्य देत असतांना वीथ रिझनेबल रिस्ट्रीक्शन काय आहेत याबाबत राज्य शासन निर्णय घेऊ शकते. माझी माननीय मंत्रीमहोदयांना विनंती आहे की, आपण 153 कलमामध्ये सुधारणा करु शकाल. तामिळनाडू राज्याने 153 कलमात सुधारणा केली असून या सुधारणेला सुप्रीम कोर्टाने आणि केंद्रशासनाने सुध्दा मान्यता दिलेली आहे. त्यामुळे यासंदर्भात राज्य शासन रिव्हयू पिटीशन सुप्रीम कोर्टात दाखल करणार आहे काय ? सदर पुस्तक छापले जाणार नाही, त्याचे वितरण केले जाणार नाही यासंदर्भात ऑक्सफर्ड प्रेसने पत्र दिले असेल तर यासंदर्भातील सर्व माहिती सुप्रीम कोर्टाला फ्रेश देऊन रिव्हयू पिटीशन दाखल केले जाणार आहे काय ? यासंदर्भातील माहिती माननीय मंत्रीमहोदयांनी दिली तर बरे होईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील (गृहमंत्री) : जेम्स लेनच्या पुस्तकाच्या संदर्भात विधानसभेत आणि या सभागृहात सुध्दा बरीच चर्चा झालेली आहे. या पुस्तकाच्या संदर्भात हाय कोर्टाने बॅन उठवल्यानंतर समाजात व्यापक स्वरुपात प्रतिक्रिया उमटल्या व त्यामुळे यासभागृहात ही चर्चा उपस्थित होणे स्वाभाविक आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे सर्वांच्या अस्मितेचे प्रतीक आहेत. दोन्ही सभागृहाच्या दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी या विषयाच्या संदर्भात चांगल्या प्रकारे विचार मांडलेले आहेत. सर्व सन्माननीय सदस्यांची सर्व भाषणे ऐकल्यानंतर छत्रपतींचे व्यक्तिमत्व हे कोणा एका जाती पुरते, धर्मापुरते किंवा एका प्रांतामध्ये न मावणारे आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्वाबद्दल कधी पक्षाच्या दृष्टिकोनातून, जातीच्या दृष्टिकोनातून बघितले जाते. या विषयाच्या संदर्भात आता सविस्तरपणे सांगण्याची आवश्यकता नाही. छत्रपतींनी रयतेसाठी राज्य स्थापन केले आणि युध्द शास्त्राला एक नवे परिमाण प्राप्त करुन दिलेले आहे. जगाच्या पाठीवर एवढे कमी सैन्य दल घेऊन मोठ-मोठी युध्दे करणारा अन्य दुसरा कोणताही योध्दा असू शकत नाही. छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्य कारभार बघितला तर त्यांनी सर्व राज्य कारभार सर्व जाती धर्माच्या लोकांना बरोबर घेऊन केला होता असेच आपल्याला दिसून येते. छत्रपती शिवाजी महाराज हे मराठयांचे राजे होते असे काही लोकांना वाटते परंतु त्यांचा इतिहास न बघता भावना आणि भूमिका व्यक्त केल्या जातात. हे जर खरे असते तर छत्रपती शिवाजी महाराजांना मराठयांबरोबर सुध्दा लढाया कराव्या लागल्या होत्या. छत्रपती हे केवळ हिंदूचे राजे असते तर त्यांना राजे जयसिंग बरोबर लढावे लागले नसते, हिंदू सरदारांबरोबर लढावे लागले नसते.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, जेम्स लेनच्या पुस्तकाच्या संदर्भात आपण तातडीने कोणती कारवाई करणार आहात याची माननीय मंत्रीमहोदयांनी माहिती द्यावी.

श्री. आर.आर.पाटील : या ठिकाणी आम्ही आपले सर्व ऐकत असतो.

श्री. दिवाकर रावते : काय शिवचरित्र ?

श्री. आर.आर.पाटील : मी शिवचरित्र सांगतो आहे की, नाही हे तुम्ही तपासा. छत्रपतींना काही लोक स्वत:च्या मालकीचे समजतात. छत्रपतींच्या बाबतीत काही घडले की, तो केवळ आमचाच हक्क आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे सर्वांचेच आहेत. विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांच्या मनात छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल जितका आदर आहे तितकाच आदर आमच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील.....

मनात सुध्दा आहे. या विषयावर मी एवढयासाठीच उभा आहे की, ज्यावेळेस हे पुस्तक मार्केटमध्ये आले होते त्यावेळेस मी भांडारकर इन्स्टीटयूटला भेट दिली होती. काही तरुणांनी भांडारकर इन्स्टीटयूटवर हल्ला केला होता त्यासंदर्भात पोलिसांनी तपास केला असता असे लक्षात आले की, या हल्ल्यापाठीमागे जेम्स लेनचे पुस्तकच कारणीभूत आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील....

सभापती महोदय, मी विनम्रपणे सांगू इच्छितो की, विरोधी पक्षाने मागणी केली नव्हती. तरी सुद्धा छत्रपतींचे बदनामी करणारे पुस्तक जनतेमध्ये असता उपयोगाचे नाही, म्हणून सरकारने महाराष्ट्रातील तमाम जनतेच्या भावना लक्षात घेऊन पुस्तकावर निर्बंध आणले. आज सरकार जवळ जो कायदा उपलब्ध आहे त्यातील 153 (a) हे कलम लावून पुस्तकावर निर्बंध आणले. कोर्टामध्ये वकील लढले की नाही, जेम्स लेन आणि ऑक्सफर्ड प्रेस यांनी जे प्रतिज्ञापत्र दिले होते ते कोर्टामध्ये मांडले की नाही ? या वादात मी पडू इच्छित नाही. पण माहिती न घेता काही बातम्या आल्या. त्याच्यावर विश्वास ठेवून अनेकांनी आपल्या भावना आणि मत व्यक्त केले. मी खात्रीने सांगतो की, ऑक्सफर्ड प्रेस आणि जेम्स लेन यांनी सरकार मार्फत प्रतिज्ञापत्र केले होते ते कोर्टामध्ये सादर करण्यात आले होते. वकिलांच्याबाबतीत श्री.राधाकृष्ण विखे-पाटील साहेंबानी सांगितले आहे. श्री.कुंभकोणी साहेब हे उच्च न्यायालयाचे जज झाले. ते स्वत: ॲडव्होकेट जनरल होते. ही केस सरकारच्या दृष्टीने देखील प्रतिष्ठेची होती. त्यामुळे आमचे वकील देखील कोर्टात अत्यंत तातडीने, ताकदीने लढले. निकाल झाला आहे. त्याची कारणे देखील मी सांगणार आहे. सुप्रीम कोर्टामध्ये ॲड.नाफडे यांच्या सारखा सिनिअर कौन्सिल नेमण्यात आला. त्यांच्या मार्फत सर्वोच्च न्यायालयात देखील सदर केस ताकदीने लढली गेली. आज आम्ही आमच्या प्रशासनाला नावे ठेवत आहोत की, या संदर्भातील कायदा का नाही ? दोन जाती-जातींमध्ये, दोन धर्मीयांमध्ये जर कोणी संघर्ष पेटविण्याचा, भडका उडविण्याचा प्रयत्न केला तर आज आपल्या कायद्यामध्ये तरतुदी आहेत. तशा लिखाणावर, चित्रावर कोणाच्या धार्मिक भावना दुखावल्या गेल्या तर त्यावर निर्बंध आणण्याचे अधिकार आपल्याकडे आहेत. पण महापुरूषांची कोणी बदनामी केली तर असे लिखाण, असे साहित्य, असे चित्र थांबविण्याचा कोणताही कायदा आज आपल्याकडे नाही. केंद्र सरकारमध्ये देखील अशा प्रकारचा कायदा नाही. त्यामुळे उपलब्ध कायद्यातील कलमे लावून या पुस्तकावर निर्बंध आणले गेले. आपली कारवाई सुप्रीम कोर्टामध्ये टिकली नाही. आता पुस्तकावरचे निर्बंध उठविले आहेत. अजून आपला नवा कायदा झालेला नाही. आजच मला

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...

ऑक्सफर्ड प्रेसने फॅक्स पाठवून लेखी कळविले आहे की, 2003 साली या पुस्तकाचे सर्क्युलेशन त्यांनी बंद केले आहे. त्यांनी वितरित केलेली पुस्तके कलेक्ट करून कोर्टामध्ये जमा केलेली आहेत. त्यांनी अशीही हमी दिली आहे की, हे पुस्तक आम्ही नव्याने छापणार नाही. आज हायकोर्टाचा स्टे नाही. तो उठला आहे. निर्बंध उठले आहेत. पण ज्यांनी हे पुस्तक प्रकाशित केले त्यांनी सांगितले आहे की, 2003 सालापासून आम्ही या पुस्तकाचे कुठेही सर्क्युलेशन केलेले नाही. नव्याने हे पुस्तक छापणार नाही. या पुस्तकाची एकही प्रत आमच्याकडे उपलब्ध नाही. ज्या प्रती मार्केटमध्ये उपलब्ध होत्या, त्या कलेक्ट करून कोर्टामध्ये जमा केल्या आहेत. त्यामुळे आपण तातडीने कोर्टामध्ये गेलो नाही तर हे पुस्तक मार्केटमध्ये लोकांना तातडीने उपलब्ध होईल, त्यामुळे छत्रपतींची बदनामी होईल अशी स्थिती बिलकूल राहिलेली नाही. तरी सुद्धा काही प्रश्न हे राजकारणाच्या पलीकडे जाऊन बघितले पाहिजेत. जसे त्यांनी बघितले पाहिजेत तसे आम्ही देखील बघितले पाहिजे. छत्रपतींची बदनामी कोणीही सहन करता उपयोगाची नाही. म्हणूनच या चर्चेचा समारोप करत असताना सदनातील दोन्ही बाजूंच्या सन्माननीय सदस्यांना विनंती आणि आवाहन करणार आहे की, जेम्स लेन सारखी हिंमत पुन्हा कोणी करू नये आणि आमच्या अस्मितेच्या प्रतिकाला कोणी कलंकित करू नये म्हणून जेम्स लेनचा धिक्कार करणारा ठराव आजच सदनामध्ये आपण घ्यावा. त्याचा कठोर शब्दामध्ये आपण सर्वांनी मिळून धिक्कार करावा. जेम्स लेनच्या पुस्तकातील पान क्रमांक 93 वरील ज्या पॅरामुळे छत्रपती आणि जिजामातेची बदनामी झाली आहे, तो पॅरा मी जगामध्ये कुठेही वापरणार नाही, असे कोर्टामध्ये ॲफिडेव्हीट करून दिले आहे. ज्या एका परिच्छेदामुळे जिजामाता आणि छत्रपती यांची बदनामी झाली आहे, तो पॅरा त्याने पाठिमागे घेतला आहे. हे पुस्तक आमच्यामार्फत मार्केटमध्ये येणार नाही, याची हमी ऑक्सफर्ड प्रेसने दिलेली आहे.

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील..

त्यामुळे मधल्या कालखंडात काय होईल याची भीती कुणीही बाळगण्याचे कारण नाही. महाराष्ट्र ज्यांना मानतो, देश ज्यांना मानतो, ज्यांच्याबद्दल आपल्या मनात आदर आहे अशा महापुरुषांची बदनामी कोणीही करु नये आणि भविष्यात अशाप्रकारच्या घटना घडू नयेत म्हणून एक कायदा आपण पुढील अधिवेशनात सर्वांनी मिळून करु या. घटनेने सर्वांना मूलभूत हक्क दिलेले आहेत. प्रत्येकाला लिखाण स्वातंत्र्य आहे, भाषण स्वातंत्र्य आहे. घटनेच्या विसंगत कायदा होता कामा नये. आपण घाईगर्दीन कायदा केल्यास तो घटनाबाह्य ठरुन तो टिकू शकणार नाही.... सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना मी आपल्यामार्फत सांगू इच्छितो की, आपण काही ऐकून न घेण्याचे ठरविले आहे काय?... आपण बोलता ते सुसंगत आणि आम्ही बोलतो ते विसंगत का ? .....

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी माननीय गृह मंत्र्यांना सांगू इच्छितो की, आपण बोलावयास उभे राहिल्यास आपणास कोणीही थांबवू शकत नाही. परंतु मला थोडे विसंगत वाटले म्हणून मी बोलण्यास उभा राहिलो. आपण याठिकाणी घटना आणि कायद्याबद्दल सांगत आहात हे सर्व ठीक आहे. मी मघाशी माझ्या भाषणात सांगितले की, आपली घटना भारतीय नागरिकांकरिता आहे. जेम्स लेन हा भारताचा नागरिक नाही. त्यास आपली घटना लागू नाही. आपणास जे विचार व आचार स्वातंत्र्य मिळालेले आहे ते जेम्स लेनला लागू नाही. घटनेच्या आधारावर जेम्स लेन कसा काय वाचू शकतो हे मी सांगितले. आपण पुन्हा घटनेवर आलात. मला हे कळत नाही की, त्यास सरंक्षण कसे मिळते हा आपला मुद्दा आहे, त्याचे उत्तर मिळत नाही. याठिकाणी सांगण्यात आले की, आम्ही मोठे वकील नेमले पण ते करायचे काय आहे, आपला मुद्दा बाजूला राहतो...

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, आणखी खोलात जाण्यात काही अर्थ नाही. या केसमध्ये पिटीशनर कोण आहेत, पब्लिकेशन कोणी केले ते पहावे, या सर्व गोष्टी पाहून सन्माननीय सदस्य बोलले तर अधिक चांगले होईल. तेव्हा सदनाला एवढेच सांगू इच्छितो की, या प्रकरणी संपूर्ण अभ्यास करुन पुढील अधिवेशनात कायदा आणला जाईल. या प्रकरणी प्रशासनाला दोष देऊन चालणार नाही. प्रशासन कायदे करीत नाही. आपल्याकडे अशा स्वरुपाचा कायदा असावा. आम्ही सत्तेत असलो तरी या दृष्टीने विचार करण्यास आम्ही कमी पडलो हे आम्ही कबूल करतो. परंतु सरकार एखाद्या विषयाबाबत कायदा करीत नसेल तर अशासकीय विधेयक आणून

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील..

विरोधकांनी सरकारला अनेक कायदे करण्यास भाग पाडले आहे. तेव्हा आपण सर्वांनी मिळून हा कायदा केला नव्हता हे सर्वांनी समजून घ्यावे. या संदर्भात लवकरच कायदा आणला जाईल आणि यापुढे अशाप्रकारे कोणत्याही महापुरुषाची बदनामी महाराष्ट्रात होणार नाही याची दक्षता आम्ही घेऊ. मी या संदर्भात काल प्रेसला सांगितले, सदनाला देखील सांगतो की, देशातील आणि महाराष्ट्रातील कोणत्याही महापुरुषाची बदनामी होऊ नये म्हणून देशाने देखील कायदा करावा अशी राज्य शासनामार्फत केंद्र शासनाला विनंती करण्यात येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, जेम्स लेनने लिहिलेल्या पुस्तकातील पृष्ठ क्रमांक 93 वरील मजकूर काढून टाकण्याबाबत शासन रिट पिटीशन करणार आहे काय ? ...

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, संबंधित प्रकाशन कंपनीने आम्ही ते पुस्तक पुन्हा छापणार नाही, त्याचे सर्क्युलेशन करणार नाही असे लेखी कळविले आहे. जेम्स लेनने देखील कोर्टास कळविले आहे की, जगात ते पुस्तक सर्क्युलेट केले तर पृष्ठ 93 वरील बदनामीकारक मजकूर ठेवणार नाही...

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, जेम्स लेनने जे पुस्तक लिहिले त्यास कोणी माहिती पुरविली याबाबत शासनाकडून काहीही सांगण्यात आलेले नाही. कारण अशाप्रकारची प्रवृत्ती वाढू नये यासाठी संबंधितांवर कारवाई झाली पाहिजे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, या पुस्तकाच्या अनुषंगाने सरकारने जेम्स लेनवर गुन्हा दाखल केला, त्यावेळी ज्यांची नावे त्यामध्ये होती त्यांच्याकडे विचारणा करण्यात आल्यानंतर त्यांनी अशाप्रकारची माहिती उपलब्ध करुन दिली नसल्याचे सांगितले. जेम्स लेनला नेमकी कोणी माहिती दिली हे जाणून घेण्यासाठी जेम्स लेन ताब्यात येणे आवश्यकता आहे. परंतु तो अमेरिकेचा नागरिक असल्यामुळे .. (अडथळा).. काल बाळासाहेब ठाकरे म्हणाले की, कोणी हिंदी गाणे वाजविले तर मिरचीची धुरी दिली जाईल. याचा अर्थ उलटे टांगून मिरचीची धुरी देणार काय ? आजपर्यंत अशी धुरी कोणाला दिली होती काय ? श्री.गोपीनाथ मुंडे म्हणाले होते की, एन्रॉन प्रकल्प अरबी समुद्रात बुडवू. ते एन्रॉन प्रकल्प क्रेनने उचलून अरबी समुद्रात टाकणार होते काय ? दाऊदला मुसक्या बांधून आणू असे सांगितल्यावर म्हशीच्या तोंडाला मुसक्या बांधतात तशा

अशुद्धलिखित प्रत / मुद्रितशोधनासाठी नाही

श्री.आर.आर.पाटील..

मुसक्या बांधणार काय ? शब्दापाठीमागच्या भावना लक्षात घ्यायच्या असतात. कोणीही शब्दश: अर्थ घ्यायचा नसतो.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...

हे मी आपल्याला सांगावयास नको. श्री.गोपीनाथ मुंडेसाहेब सभागृहात असे म्हणाले होते की, मी दाऊदला मुस्क्या बांधून फरफटत आणीन. त्याप्रमाणे त्यांनी आणले होते काय ?

सभापती महोदय, काही प्रमाणात त्या दोघांचाही माझ्यावर प्रभाव असल्यामुळे मी त्या शैलीत बोलत आहे.

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी) : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे.

सभा□ह□पुढील □म□ज संपलेले आहे. सभा□ह□ची बैठ□ आता स्था□ित होत आहे. उद्या मंगळवार, दि□ि□ 13.7.2010 रोजी स□ाळी 10.30 ते दुपारी 12.30 पर्यंत सभागृहाची विशेष बैठक भरेल या वेळेत कर्नाटक सीमा वाद या प्रस्तावावर चर्चा होईल आणि सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.00 वाजता पु□ः भरेल.

(सभा□ह□ची बैठ□ 7 वाजू□ 21 मि□ि□टां□ी, मंगळवार, दि□ि□ 13.7.2010 च्या स□ाळी 10.30 वाजेपर्य□त स्था□ित झाली)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही